रणजित सिंह

राष्ट्रीय चरित्रमाला

रणजित सिंह

देवराज सूद

अनुवाद

जी. व्ही. वैद्य

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

ISBN 81-237-3787-4

पहिली आवृत्ती : 1971 (*शके* 1893)
चौथे पुनर्मुद्रण : 1991 (*शके* 1913)
पाचवे पुनर्मुद्रण : 2002 (*शके* 1923)

Ranjit Singh *(Marathi)*

रु. 30.00

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क
नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.

अनुक्रमणिका

एक

पूर्वस्थिती

पाच नद्यांचा प्रदेश म्हणजे पंजाब. पंजाबचा विकास इतिहासकालात कसकसा होत गेला आणि वर्तमान पंजाबच्या घडणीमध्ये त्या विकासाचा महत्त्वपूर्ण वाटा कोणता आहे त्याची माहिती करून घेण्यासाठी पंजाबच्या इतिहासाचे, आणि त्यातही महाराज रणजितसिंह यांच्या उदय–उत्कर्षापूर्वीच्या काही दशकांचे विहंगमावलोकन करणे आवश्यक आहे. देशाच्या शरीरात राजधानीचे स्थान हृदयाप्रमाणे असते. भारताच्या राजधानीस वायव्येकडून पोहोचण्याचा मार्ग पंजाबातून जातो. साहजिकच दिल्लीवर त्या दिशेने झालेल्या स्वाऱ्यांचे अनिष्ट परिणाम पंजाबला प्रत्येक वेळी जास्तजास्त प्रमाणात भोगावे लागले. भारतातील संपत्तीच्या ख्यातीने परकीय शत्रूंना कित्येकदा आकर्षित केले; तर काही वेळा एतद्देशीय राजांनी एकमेकांचे पाय ओढण्यासाठी त्यांना आपण होऊन पाचारण केले. मोगल, पर्शियन किंवा अफगाण हे सगळे आक्रमक मुसलमान होते. त्याचा परिणाम असा झाला की अल्पावधीत पंजाबच्या लोकसंख्येत धर्मांतरित मुसलमानांचा बराच भरणा झाला. यामुळे तेथे हिंदू–मुस्लिम समस्या निर्माण झाली. आणि तिने आपली कृष्णछाया पुढे दीर्घकाळपर्यंत पंजाबच्या व देशाच्याही इतिहासावर टाकली. आणि एतद्देशीय राजे आणि आक्रमक सुलतान यांच्या स्वार्थी महत्त्वाकांक्षा व विरोधी धार्मिक श्रद्धा यांच्यामुळे कोणतेही जनहित साधले गेले नाही.

आंतरजातीय एकता आणि सामंजस्य यांचा नवा संदेश घेऊन गुरू नानक (1469 ते 1539) पंधराव्या शतकात अवतरले. हिंदू आणि मुसलमान ह्या दोघांचाही देव समान, एकच आहे या एकेश्वरवादाचा उपदेश त्यांनी केला. त्यांच्यावर हिंदू भक्त आणि मुस्लिम सूफी या दोघांचा सारखाच परिणाम झाला होता. पूजा-अर्चायुक्त भक्तीच्या सगुण स्वरूपापेक्षा तिच्यामागील उद्देश जास्त महत्त्वाचा असतो असे ते सांगत. जातीयवादाचा धिक्कार करून त्यांनी धर्मनिरपेक्ष धोरण आदर्श मानले. त्यांच्या उदार आणि सर्वस्पर्शी दृष्टिकोणामुळे त्यांना खूप मोठ्या

संख्येने अनुयायी लाभले. विविध धर्मांतील निवडक तत्त्वांचा अंगीकार करून त्यांनी एकत्रित केलेल्या नवविचारांना त्यांच्या नंतरच्या गुरूंनी प्रगल्भता आणि स्थिरता मिळविली. या संदर्भात शीखांचे पाचवे गुरू अर्जुनदेव (1563-1606) यांचा उल्लेख अवश्य केला पाहिजे. अमृतसरच्या 'दरबारसाहेब' या शीख मंदिराची पायाभरणी त्यांनी मुसलमान संत मियाँ मीर यांच्या हस्ते केली. त्याचप्रमाणे 'ग्रंथसाहेब' या शीख धर्मग्रंथात त्यांनी हिंदूमुसलमान संत-महंतांच्या वाणी-विचारांचा समावेश केला. थोडक्यात, नव्या श्रद्धांचा हा पंथ मुस्लिमविरोधी नव्हता. आधुनिक काळात ज्याला मानवतावाद म्हटले जाते त्याचे ते एक प्रारंभिक प्रकटीकरण होते. एक मानव म्हणून प्रत्येक व्यक्तिमात्राने स्वतःशी आणि त्याचप्रमाणे इतरांशीही शांततेने, समन्वयाने व सामोपचाराने वागावे असेच कोणताही खरा धर्म शिकवीत असतो.

पण रोमनांच्या काळात सुरुवातीस ख्रिश्चनांची जी स्थिती झाली तशीच शीख धर्मगुरू आणि त्यांचे शिष्य यांची त्या वेळी झाली. कारण तत्कालीन नागरी सत्तांना त्यांच्या उद्देशांबद्दल शंका येऊ लागल्याने त्यांनी त्यांचा छळ आरंभला. अकबराखेरीज, प्रत्येक मोगल राजाने नानक पंथीयांना निर्दयतेने वागविले. गुरू अर्जुनदेवांना मरण आले ते जहांगीराच्या हातून. आणि औरंगजेबाने तर नववे गुरू, तेज बहादूर यांना फासावर लटकाविले! पण हुतात्म्यांच्या रक्तात भावी प्रेरणेची सुप्त बीजे नेहमीच साठविलेली असतात. त्यामुळे शीख गुरू आणि त्यांचे अनुयायी यांना दडपण्याचा मोगलांनी जितका प्रयत्न केला तितक्या नव्या धैर्याने आणि जिद्दीने उसळून प्रत्येक वेळी शीखांनी त्यांच्या क्रूरतेशी सामना केला. प्रतिकाराच्या त्या चळवळीने आस्ते-आस्ते लष्करी वळण घेतले. आणि मोगलांची असहिष्णुता व हटवादी धर्मान्धता रोखण्यासाठी 'खालसा दल' अस्तित्वात आले. आपल्या पित्याच्या हौतात्म्याचा बदला घेण्याच्या इराद्याने आणि धर्मवेड्या औरंगजेबाच्या छळापासून हिंदू धर्माचे रक्षण करण्याच्या इच्छेने, दहावे गुरू गोविंदसिंह यांनी मोगल आव्हान स्वीकारले. त्यांनी आपल्या अनुयायांना शिस्तबद्ध शिपाई बनविले, व एक निश्चित कार्यक्रम आखला. अन्यायाचा नायनाट करण्याच्या उद्देशाने हाती घेतलेले हे धर्मयुद्ध गोविंदसिंहांना तसे महागच पडले. कारण त्यांची चारही मुले मुसलमानांच्या हत्यारांना बळी पडली. आणि स्वतः त्यांचाही खून दोन मुस्लिमांकडूनच झाला. तथापि त्यांच्या सततच्या प्रतिकाराने मोगल साम्राज्याचा विनाश अलीकडे खेचला गेला यात शंका नाही.

बंदा बहाद्दर हा गुरू गोविंदसिंहांचा लष्करी वारस. त्याने मोगलांविरुद्ध अधिक तीव्रतेने लढा चालू ठेविला आणि काही वेळा मोगलांचा पराभवही केला.

पण अखेर तो पकडला गेला व इतर शेकडो शीख शिपायांसह त्याला दिल्लीस आणण्यात येऊन हालहाल करून मारण्यात आले. स्वतःच्या हाताने आपल्याच मुलाचा वध केला पाहिजे असाही एक हुकूम मोगलांनी बंदा बहाद्दरवर बजाविला होता! पंजाबातही, मोगलांचा गव्हर्नर शीखांचा छळ अशाच निर्घृणतेने करीत होता.

यानंतर इतर कारणांनी मोगल सत्तेच्या ऱ्हासाला पंजाबात, भारतात व इतरत्रही सुरुवात झाली. 1739 मध्ये नादिरशहाने पर्शियाहून पंजाबमार्गे दिल्लीला धडक दिली. आणि स्वैराचाराने भरपूर लुटालूट केली. हजारो कैदी आणि लूट घेऊन तो आस्तेआस्ते परत जात असता काही शीख गनीमांनी त्यातली काही लूट परत हस्तगत केली. यामुळे शीखांचा आत्मविश्वास बळावला आणि त्यांनी गनिमीकाव्याची लढत तशीच चालू ठेविली. अहमदशहा अब्दालीने भारतावरील नऊ स्वाऱ्यापैकी पहिली स्वारी 1747 मध्ये केली. तेव्हाही त्याच युद्धतंत्राचा अवलंब शीखांनी केला. त्यांना अब्दालीपुढे माघार घ्यावी लागली; पण तो परतत असता शीखांनी त्याला हैराण करून सोडले आणि त्याची रसदही तोडली. अब्दालीच्या स्वाऱ्यांनी पंजाबात मोगल सत्ता खिळखिळी केली. त्यामुळे शीख सत्तेच्या उदयाचा पाया रोविला जाण्यास अनायासे सहाय्य झाले.

अशा परिस्थितीत सत्तेची पोकळी गनिमी शीखांच्या नेत्यांकडून भरली जाणे अपरिहार्य होते. तसे शीख नेते त्या वेळी बरेच होते; आणि ते एकमेकांच्या बरोबरीने व आपापल्या परीने स्वतंत्रही होते. काही विशिष्ट समान रज्जूंनी ते सगळे संघटित झालेले होते. रक्तसावर्ण्यामुळे एकवंशीयता असलेल्या अशा शीख संघटनेला *मिसल* असे नाव होते. हा शब्द मूळचा पर्शियन असून त्याचा अर्थ (एकमेका) समान असा आहे. अशा बारा संघटना त्या काळी अस्तित्वात होत्या. प्रत्येकीला एक असा नेता असे की जो उत्तम शिपाईगडी असूनही त्याने आपले वैयक्तिक श्रेष्ठत्व कृतीने सिद्ध केलेले असे. बाणाने झाडाला आरपार भोक पाडणे, किंवा एका जबरदस्त ठोशात वाघ ठार करणे अशा शौर्यावरून त्याचे श्रेष्ठत्व ठरे. मोगल सत्तेचा ऱ्हास झाला तेव्हा पंजाबात अशाच छोट्या सरदार–जहागीरदारांचा अंमल होता आणि त्या प्रत्येकाजवळ (मिसलजवळ) स्वतःचे सैन्यही होते.

अशा त्या बारा संघटनांची (मिसल) नावे, त्यांच्या श्रेष्ठत्वानुसार अशी : फुलकिअन, अहलुवालिआ, भांगी, कन्हया, रामगढिआ, सिंगपुरिआ, क्रोरासिंगिआ, निशाणिआ, सुकेरचकिआ, दुलेवाला, नाक्काई आणि शहीद. ह्यापैकी सहा

संघटनांची सत्ता सिंधू व सतलज या नद्यांमधील 'मझा' प्रदेशावर होती आणि बाकीच्या सहांची सतलज व यमुना नद्यांमधील 'माळवा' प्रदेशावर होती.

पतियाळा, जिंद, नाभा, भादौर आणि मालोद येथे राज्य करणाऱ्या फुलकिअन संघटनेतील सर्वजण एकवंशीय होते. प्रबळ अशा भांगींच्या (भांग पिण्याची सवय असलेल्या) ताब्यात लाहोर, अमृतसर आणि पश्चिम पंजाबचा बराचसा भाग होता. कन्हया संघटना तशीच प्रबळ होती. तिने हिमालयाच्या पायथ्याच्या प्रदेशावर आपला ताबा ठेवला होता. त्याशिवाय रणजितसिंहांशी विवाहसंबंध जोडल्यामुळे कन्हयांचे महत्त्व वाढले होते. अहलुवालिआंचा अंमल रावी व बियास नद्यांमधील प्रदेशावर प्रस्थापित झाला होता आणि कपुरथळा हे त्यांचे मुख्य ठाणे होते. सुकेरचकिआंच्या ताब्यात मात्र फक्त गुजराणवाला हे गाव आणि त्याच्या अवतीभोवतीची काही खेडी होती.

ह्या संघटना एकमेकांपासून अलिप्त, पृथक होत्या असे मात्र म्हणता येणार नाही. मोगल किंवा अब्दाली यांच्यासारख्या समान शत्रूंशी जेव्हा लढा द्यावा लागे तेव्हा त्या एकत्र येत. पण एरवी मात्र आपापसात भांडत. अर्थात ही भांडणे जमीनी, गावे, संपत्ती यांच्यावरून बहुधा उद्‌भवत. त्यामुळे एकाच्या ताब्यातला प्रदेश पुष्कळदा दुसऱ्याकडेही जाई. अशा परिस्थितीत काही कमजोर संघटना इतर बलवान संघटनांकडून संरक्षण मागत व त्या संरक्षणासाठी *राखी* कर देत. संघटनेतील अनुयायी आपल्या प्रमुखाला एखादा घोडा, बंदूक त्याच्या मागणीप्रमाणे देत. आणि त्याच्याकडून एखादा प्रदेश लुटण्याचा परवाना मिळवीत. अशी लूट देव, गुरू यांच्या नावाने व गुरूच्या झेंड्याखाली केली जाई.

बळी तो कान पिळी ह्या म्हणीची सत्यता पटविणारी परिस्थिती तेव्हा होती. स्वतःचा जमीनजुमला, गुरेढोरे, एवढेच नव्हे तर आपली बायको सुरक्षित राखण्यासाठी स्वतः पुरेसे बळकट असण्याची गरज त्या परिस्थितीत तीव्रतेने निर्माण झाली होती. अन्यथा बलदंडांच्या पुढ्यात खंडणी मोजण्याशिवाय दुसरा पर्याय नसे. सामाजिक क्षेत्राप्रमाणे सरदार-जहागीरदारांच्या राजकीय संघटनांचे क्षेत्रही तशा स्थितीला अपवाद ठरले नव्हते.

संघटनांचे नेते वर्षातून एकदोनदा अमृतसरला एकत्र येत. त्या वेळी सामुदायिक संरक्षणाची चर्चा केली जाई. ती आवश्यक नसल्यास मग आपापसातील वितुष्टांचा खल केला जाई आणि सुंदोपसुंदी होऊन अनेकदा प्रकरणे हातघाईवरही येत. कोणतीही नियंत्रणे त्यांच्यावर नसती तर त्या वेळच्या समतेच्या कल्पनेतून नगरराज्ये निर्माण झाली असती आणि फुटीरपणाच्या अशा विपर्यासापायी

बाहेरच्या शत्रूचा आयताच फायदा झाला असता. अशा संभाव्य विनाशापासून बचाव करण्यासाठी शीख सरदारांच्या त्या संघटनांना असा एखादा नेता त्यांच्यातूनच पुढे यावयास हवा होता की जो इतर सर्वांना आपल्या कह्यात राखून सबंध पंजाबला एका झेंड्याखाली आणू शकला असता. आणि नियतीने ती जबाबदारी स्वीकारण्यासाठीच जणू रणजितसिंहांना तेथे जन्मास घातले.

दोन

पूर्वज आणि प्रारंभीचा काळ

रणजितसिंहांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे पूर्वज गुराखी होते. गुजराणवालाजवळच्या सुकेरचकचे ते राहणारे. त्या वंशातला बुधसिंह हा थोडाफार नावारूपाला आलेला पहिला पुरुष. त्याला खुद्द गुरू गोविंदसिंह यांनीच शीख धर्माची दीक्षा दिली असे म्हणतात. बुधसिंह साहसी वृत्तीचा होता. तो पुंडाईने लुटालूट करी. त्याला घोड्याचे फार वेड होते. 'देसन' नावाची त्याची एक फार आवडती घोडी होती. तिच्यावर बसून तो रावी, चिनाब, झेलम अशा नद्या पार करी. बुधसिंह 1718 मध्ये वारला. तेव्हा त्याच्या दोन मुलांकडे काही खेड्यांचा वारसा आला. पैकी एका मुलाने, नौधसिंहाने सुकेरचकला एक किल्ला बांधला. हाच नौधसिंह सुकेरचक संघटनेचा संस्थापक. अब्दालीशी झालेल्या चकमकीत 1752 मध्ये तो कामास आला.

त्याच्या पश्चात त्याचा थोरला मुलगा चरतसिंह पूर्वजांचे गाव सोडून गुजराणवाला येथे राहावयास गेला. तेथे त्याने तटबंदी केली. थोड्या दिवसांनी त्याने वझिराबाद, सियालकोट व आसपासची दोन खेडी काबीज केली. अहमदशहा अब्दालीने आपल्या एका स्वारीत गुजराणवालावर हल्ला केला आणि चरतसिंहाची तटबंदी उध्वस्त करून त्याने त्याची मालमत्ता लुटली. पण अब्दाली परत जात असताना गोडीगुलाबीने त्याच्याशी समझोता करून चरतसिंहाने त्या लुटीचा काही भाग परत मिळविला. आणि गुजराणवाला येथे सुस्थित होऊन त्याने तेथे पुन्हा तटबंदी केली. नंतर त्याने आपले लक्ष जम्मूकडे वळविले. अफगाणांच्या स्वाऱ्यांच्या उपद्रवाला कंटाळून अनेक गर्भश्रीमंत पंजाबी कुटुंबे जम्मूकडे गेली होती व तेथे स्थायिक झाली होती. जम्मूला लूट करताना तेथील भांगी संघटनेच्या लोकांनी त्याला विरोध केला. तेव्हा त्यांच्याशी झालेल्या एका झटापटीत, आपल्या बापाप्रमाणे, चरतसिंहाला मृत्यू आला.

सुकेरचकिआ संघटनेचे पुढारीपण त्यानंतर चरतसिंहांचा तरुण मुलगा

महानसिंह याच्याकडे आले. तो बापासारखाच साहसी व महत्वाकांक्षी होता. त्याच्या आईने त्याचे लग्न फुलकिअन संघटनेच्या जिंद येथील नेत्याची कन्या राज कौर हिच्याशी लावून दिल्यामुळे सुकेरचकिआ संघटनेचे बळ वाढण्यास तो नवा नातेसंबंध उपयुक्त ठरला. महानसिंहाने आणखी शिबंदी करून आपल्या पदरी सशस्त्र सैन्य वाढविले. लष्करी मजबुती केल्यावर त्या परिसरातील अनेक खेडी त्याने हस्तगत केली; व आपल्या वडिलांप्रमाणे जम्मूकडे मोर्चा वळविला. तेव्हा तेथील डोग्रा प्रमुखाला पळून जाणे भाग पडले. त्या दिग्विजयामुळे सुकेरचकिआंचा आब व दबदबा वाढला. तशाच एका स्वारीवरून परतत असताना त्याला पुत्रजन्माची सुवार्ता समजली. त्याने नवजात पुत्राचे नाव 'बुधसिंह' (बुद्धी, शहाणपण असलेला) ठेवण्याचे ठरविले. पण आपला रणातील जय (जित) लक्षात घेऊन नंतर ते नाव बदलून त्याने 'रणजितसिंह' असे दुसरे अधिक अन्वर्थक नाव ठेविले.

जिंद नजीकच्या बुद्रुखान खेड्यात 13 नोव्हेंबर 1780 मध्ये राज कौरच्या पोटी रणजितसिंहांचा जन्म झाला. काही इतिहासकार तो दिनांक 2 नोव्हेंबर व जन्मस्थळ गुजराणवाला मानतात. महिलेने पहिल्या प्रसूतीचे वेळी आपल्या माहेरी जाण्याचा प्रघात पंजाबात रूढ असल्यामुळे आधी उल्लेख केलेला दिनांक आणि स्थळ अधिक बरोबर असावेत. रणजितसिंहांच्या बालपणीच्या हकीकतींचा तपशील फारसा उपलब्ध नाही. पण त्याला जो एकमेव अपवाद आहे तो म्हणजे त्यांना झालेला देवीचा आजार. देवी आल्यामुळे त्यांच्या डाव्या डोळ्यातील नजर गेली. आणि त्यांचा चेहराही व्रणामुळे विद्रूप झाला. बूटे शहा यांनी उपलब्ध केलेल्या हकीकतीनुसार असे कळते की लहानपणी रणजितसिंह आपल्या सवंगड्यांसह पोहण्यासाठी चिनाब नदीवर जात असत आणि स्वतःबरोबर आणिलेले पैसे व वस्तू त्यांना वाटून टाकीत असत.

एके ठिकाणी अशीही माहिती मिळते की, गुजराणवाला येथील एका धर्मशाळेत रणजितसिंह शिकण्यासाठी जात; पण शिकण्यात त्यांचे मन मुळीच रमेना. आणि बाप सदा लढायांत गुंतलेला; तर आई झनान्यात अडकलेली. त्यामुळे मुलाच्या शिक्षणाची काळजी घेण्यास त्यांना फुरसतच मिळत नसे. त्या दिवसांतील शीख सरदारांचे क्रीडाप्रेम आणि शिकारीची हौस ह्या गोष्टी रणजितसिंहांच्या बालमनाला विशेषकरून आकृष्ट करीत. त्याशिवाय शस्त्रे बाळगावीत, त्यांचा उपयोग करावा व तेणेकरून पुढे उत्तम लढवय्ये बनावे याकडे तरुणांचा जास्त ओढा होता. रणजितसिंह लवकरच निशाणबाजी शिकले. त्यांचे वडील स्वाऱ्यांच्या

वेळी पुष्कळदा आपल्या मुलाला बरोबर घेऊन जात असत आणि त्यामुळे युद्धकलेचाही श्रीगणेशा रणजितसिंहांनी बालपणीच गिरविला.

अवघे 10 वर्षे वय असताना 1790 मध्ये रणजितसिंहांनी आयुष्यातल्या पहिल्यावहिल्या लढाईत यशस्वीपणे भाग घेतला. महानसिंहांनी सोधरन खेड्याला वेढा दिला होता. त्या गावात भांगी संघटनेचा प्रमुख राहत असे. काही महिन्यांनी महानसिंह एकदम आजारी पडला तेव्हा त्याने नेतृत्वाची सूत्रे रणजितसिंहांच्या हाती दिली; व तो गुजराणवाल्यास परतला. पण नेतृत्वातील त्या बदलाचा फायदा उठविण्याच्या इराद्याने भांगी नेत्याने उठावणी केली. त्यासाठी त्याने लाहोरहून कुमक आणविली होती. पण रणजितसिंहांनी त्याचा डाव सपशेल उधळून लावला. ह्या विजयानंतर लगेचच महानसिंहांचे निधन 1792 मध्ये झाले. त्या वेळी त्यांचे वय 27 वर्षे होते.

पुढील वर्षी रणजितसिंहांच्या खुनाचा कट रचण्यात आला. पण त्यातून ते बचावले. एका शिकारीच्या वेळी ते एकटे असता हशमतखान ह्या मुसलमान प्रमुखाने त्यांच्यावर एकदम छुपा हल्ला केला. महानसिंहांनी अनेकदा त्याचा पराभव केला होता. हशमतखानाने उगारलेला पहिला वार रणजितसिंहांनी वरचेवर उडवून लावला. आणि तो दुसरा वार करण्यापूर्वी त्यांनी आपल्या भाल्याने खानाला खतम केले. त्या आणीबाणीच्या प्रसंगी दैव रणजितसिंहांच्या मदतीला धावले नसते तर पंजाबचा इतिहास वेगळाच झाला असता.

रणजितसिंह तेरा वर्षांचे असतानाच त्यांना शिकारीचा नाद लागला. घरच्या दैनंदिन व्यवहारात त्यांचे मन तितकेसे रमत नसे. त्यामुळे ती जबाबदारी त्यांनी आपली आई आणि वडिलांचे कारभारी लखपतराय यांच्यावर सोपविली. महानसिंहांनी एका लढाईत कन्हया संघटनेच्या प्रमुखाचा पराभव केला होता. तेव्हा त्याने आपली नात मेहताब कौर (एका लढाईत ठार झालेला मुलगा, गुरुबक्षसिंह याची मुलगी) रणजितसिंहांना द्यायचे कबूल केले होते. मेहताब कौरची आई सदा कौर हिच्याकडे तिच्या सासऱ्याच्या मृत्यूनंतर संपत्तीचा वारसाहक्क आलेला होता. रणजितसिंहांचे लक्ष घरच्या व्यवहारांकडे विशेष लागत नाही असे पाहून त्यांच्या आईने मुद्दामच त्यांचे लग्न लावून दिले. त्याप्रमाणे बटाला येथे, म्हणजे कन्हया संघटनेच्या मुख्य शहरी रणजितसिंहांचा विवाह झाला. विवाहाच्या वेळी त्यांचे वय जेमतेम 15-16 वर्षे होते. सोहळा मोठ्या थाटाचा होता व त्याला बहुतेक सर्व शीख (मिसल) संघटनांचे तत्कालीन प्रमुख हजर होते.

पण हा विवाह यशस्वी ठरला नाही. आपला पिता गुरुबक्षसिंह यांचा वध

आपल्या पतीच्या हातून झालेला आहे ही गोष्ट वधू विसरू शकली नाही हे कदाचित त्याचे एक कारण असावे. देवीच्या व्रणांमुळे विद्रूप झालेला रणजितसिंहांचा अगदी ओबडधोबड चेहरा हेही त्याचे कारण असू शकेल. अथवा रणजितसिंह आणि सदा कौर ह्या दोघांनीही आपापल्या वंशीय संघटनांच्या प्रगतीच्या दृष्टिकोणातून त्या वैवाहिक संबंधाकडे पाहिले हेसुद्धा एक कारण म्हटले पाहिजे. 1797 मध्ये रामगढियांनी जेव्हा सदा कौरच्या मालमत्तेला धोका निर्माण केला तेव्हा त्यांच्या एका किल्ल्याला वेढा घालून रणजितसिंहांनीच त्या आपत्तीचे निवारण केले.

कन्हया लोक वाटतात तेवढे शूर, बलवान नाहीत; तेव्हा आपण आपली अधिक मजबुती केल्यास आपली जमात सर्वश्रेष्ठ होऊ शकेल हे त्या प्रसंगाने रणजितसिंहांना कळून आले. नवी दोस्ती निर्माण करण्याच्या उद्देशाने त्यांनी 1798 मध्ये नक्किआ संघटनेच्या प्रमुखाच्या बहिणीशी विवाह केला. त्यांच्या आईप्रमाणेच त्यांच्या ह्या द्वितीय पत्नीचेही नाव राज कौर असेच होते. राज कौरने आपल्या वागणुकीने, प्रथम पत्नी मेहताब कौर हिच्यापेक्षा पतीचे जास्त प्रेम संपादन केले आणि त्यामुळे तिला साहजिकच अधिक महत्त्व लाभले. आपणास बाजूला सारून आपले स्थान घेतले गेले ह्या पराजित भावनेमुळे मेहताब कौर बटाल्यास निघून गेली. आणि आपल्या मुलीवरची जावयाची खप्पा मर्जी समजून सदा कौरलाही त्या संघटनेचा फार विषाद वाटला. तथापि मेहताबच्या पोटी येणाऱ्या भावी अपत्यांना हाताशी धरून आपले महत्त्व टिकविण्याचे मनसुबे ती करीत होती.

तत्कालीन शीखांच्या सर्व (मिसल) संघटनांमध्ये स्वतःला श्रेष्ठत्व प्राप्त करून घेण्याच्या महत्त्वाकांक्षेने रणजितसिंह आता प्रेरित झाले होते. ते आपल्या जमातीच्या, कुटुंबाच्या व मालमत्तेच्या सर्व कारभारांत विशेष लक्ष घालू लागले होते. त्या वेळी लखपतराय रणजितसिंहांचे दिवाण होते. पण ते पद आपल्याला मिळावे अशी त्यांचे चुलते दलसिंह यांची फार इच्छा होती. यामुळे त्या दोघांत निर्माण झालेल्या दुफळीमुळेही रणजितसिंहांना घरच्या कारभारात जातीने लक्ष घालणे भाग पडले असावे. कसेही असो; आपण आता केवळ जन्म आणि वारसा यांच्या आधारे आपल्या सुकेरचकिआ संघटनेचेच प्रमुख न राहता, पूर्णपणे स्वतंत्र आणि खरेखुरे प्रमुख बनले पाहिजे असा निश्चय सतरा वर्षांच्या रणजितसिंहांनी केला व त्या दिशेने ते पावले टाकू लागले एवढे खरे.

तीन

प्रारंभीचे दिग्विजय

रणजितसिंहांच्या प्रारंभीच्या विजयांना त्यांच्या कारकीर्दीत विशेष महत्त्व आहे. कारण यशाच्या त्या पायऱ्या चढत चढतच ते आपल्या जीवनात अखेर 'पंजाबचे महाराज' या पदापर्यंत पोहोचले.

अहमदशहा अब्दालीचा नातू शहा झमन आपल्या आजोबांच्या पावलांवर पाऊल टाकून 1795 मध्ये चाल करून झेलम नदीपर्यंत आला. आणि शीखांकडून कडवा विरोध न झाल्यामुळे पुढील दोन वर्षांत (1797 व 1798) तो लाहोरला सहज पोहोचू शकला. तेव्हा दुराणीशी समझोता करणेच इष्ट असल्याचे काही शीख नेत्यांना कळून आले. कारण त्यामुळे त्यांचे प्रादेशिक अधिकार सुरक्षित राहू शकणार होते. समझोता घडून आल्यावर मग झमननेही त्यांना काही देणग्या दिल्या.

झमन परतला तेव्हा झेलमला पूर आला होता. त्यामुळे त्याच्या बारा तोफा पाण्यात बुडाल्या. नदीतून त्या काढून परत दिल्यास त्याबद्दल 'राजा' हा किताब आणि लाहोर शहर रणजितसिंहांना द्यावयाचे झमनने कबूल केले. पंजाबचा तो भाग त्या वेळी रणजितसिंहांच्याच अखत्यारात होता. बारापैकी आठ तोफा हाती लागल्या आणि रणजितसिंहांनी त्या पेशावरला पाठविल्या. ठरल्याप्रमाणे त्यांना लाहोर मिळाले खरे. पण ते घेण्यासाठी त्यांना वेगळे प्रयत्न करावे लागले.

लाहोर

त्यावेळचे लाहोरचे राज्यकर्ते बदफैली व बाहेरख्याली होते. आणि लोक त्यांच्या जुलमाला कंटाळले होते. लाहोर दुराणीकडून रणजितसिंहांना देण्यात आल्याचे तेथील लोकांना समजले तेव्हा 'विमोचक' किंवा त्राता म्हणून त्यांचे स्वागत केले जाईल असे लोकांनी त्यांना कळविले. त्यामुळे रणजितसिंहांनी 6 जुलै 1799 रोजी लाहोरकडे कूच केले. तेव्हा शहराच्या वेशीचे दरवाजे जनतेने अत्यानंदाने खुले केले. आणि भांगी सरदार त्यांच्यादेखत तेथून पळून गेले. मग रणजितसिंहांनी एक खास हुकूम काढला

आणि लाहोर शहर आणि तेथील शहरवासी जनता यांना अत्यंत सहानुभूतीने वागविले जाईल असे जाहीर केले. तसेच सैन्याने लुटालूट अथवा तसे कोणतेही गैरकृत्य केल्यास मुळीच गय केली जाणार नाही अशीही सक्त ताकीद दिली.

दुराणीने लाहोर शहर रणजितसिंहांना देणगी म्हणून दिले यावर काही इतिहासकारांचा विश्वास नाही. आपली सासू सदा कौर हिच्या साहाय्याने रणजितसिंहांनी लाहोर खालसा केले आणि सुकेरचकिआ नेत्यांवर लाहोरवासियांचा विश्वास असल्यामुळे ते शहर हस्तगत करणे रणजितसिंहांना सुलभ झाले असे त्यांचे मत आहे. कसेही असले तरी लाहोरवासियांना सुरक्षितता व स्थैर्य पाहिजे होते व ते रणजितसिंहांनी दिले एवढे खरे. इतकेच नव्हे तर, पिटाळून लावलेल्या भांगी पुढाऱ्यांना त्यांनी नंतर बऱ्यापैकी जहागिऱ्या देऊन त्यांना सहानुभूतीने वागविले.

रणजितसिंहांनी लाहोर ताब्यात घेतल्यामुळे काही शीख आणि मुसलमान यांना मत्सर वाटू लागला आणि त्यांच्या सत्तेला आव्हान देण्याच्या उद्देशाने त्यांनी शेजारच्या राजेलोकांशी हातमिळवणी केली. इ. स. 1800 साली त्यांनी कसूरजवळ भसीन येथे मोठे सैन्य जमविले आणि एका सभास्थानी त्यांना ठार करण्याचा एक कटही रचला होता. पण आपसातील मत्सरामुळे तो फलद्रूप झाला नाही. हे राजेलोक एवढे बदफैली होते की, त्यांच्यापैकी गुलाबसिंह भांगी हा अतिरिक्त मद्यपानामुळेच मरण पावला.

जम्मू

आपल्या पूर्वजांचा कित्ता गिरवून रणजितसिंहांनी स्वतःचे लक्ष आता समृद्ध जम्मूकडे वळविले. जम्मूला कूच करताना प्रथम वाटेवरची दोन गावे त्यांनी काबीज केली. जम्मूच्या राजाने मांडलिक होण्याचे मान्य करून रोकड खंडणीही दिली. भसीनचे काही जहागीरदार गुजराणवालावर हल्ला करण्याच्या बेतात आहेत असे समजल्यावरून, जम्मूहून सियालकोट मार्गे परतताना त्यांनी त्यांच्याशी लढा दिला आणि त्यांचा पराभव केला. कांग्राचा राजा संसारचंद याने सदा कौरचा डोंगरी भागातील काही प्रदेश बळकाविला होता. तेव्हा त्याच्याशीही लढा देऊन रणजितसिंहांनी त्याचाही पराभव केला. नजराणा म्हणून त्यांनी नुरूपूर त्याच्याकडून घेतले.

इ. स. 1802 मध्ये रणजितसिंहांनी चिनिअत जिंकले. या सुमारास कसूरच्या मुसलमान राजाने उंटांचा एक काफिला लुटला होता. तेव्हा कन्हया व अहलुवालिआ संघटनांच्या सहकार्याने रणजितसिंहांनी आपला तोफखाना त्यांच्यावर डागला व त्याला शरण आणिले. 1803 मध्ये त्यांनी मुलतानवर पहिला हल्ला केला

आणि तेथील मुसलमान राजा मुझफरखान याला नामोहरम केले. त्याचप्रमाणे झांगच्या अहमदखानालाही मांडलिक बनविले. ह्या मोहिमेवर असताना रणजितसिंह थेट रावळपिंडीपर्यंत पोहोचले आणि मार्गावरील मुसलमान राजांवर त्यांनी खंडणी बसविली.

नक्किआची राजकन्या राज कौर ही रणजितसिंहांची एक पत्नी. तिच्या पोटी त्यांना 1801 मध्ये पहिला मुलगा झाला. पुढे त्याचे नाव 'खरकसिंह' ठेवण्यात आले. हा पुत्रजन्मोत्सव मोठ्या थाटामाटाने चाळीस दिवसपर्यंत चालू होता. शीख सरदार मंडळींनी रणजितसिंहांना 'महाराज' हा किताब बहाल करण्याचा निर्णय तेव्हा घेतला. आणि वैशाखीच्या सणाच्या दिवशी एक मोठा दरबार भरवून तो किताब त्यांना देण्यात आला. तेथून पुढे त्यांना 'सरकार' असे सन्मानाने संबोधण्यात येऊ लागले. तथापि त्यांनी नाणी पाडली ती गुरू नानक व गुरू गोविंदसिंह यांच्या नावांनी. अजून ती 'नानकशाही' म्हणून ओळखली जातात.

अमृतसर

अमृतसर हा जणू भांगी संघटनेचा बालेकिल्लाच होता. तोही महाराज रणजितसिंहांनी सर केला. पण त्या दिग्विजयाच्या निश्चित दिनांकाबद्दल इतिहासकारांत मतभेद आहेत. एक प्रमुख लेखक सोहनलाल सूरी यांच्या मतानुसार 1805 चा फेब्रुवारी हा त्याचा काल ठरतो. लेपेल ग्रिफिन असे लिहितात की, "भांगी संघटनेच्या प्रमुखाची विधवा, माई सुखन हिच्याकडे महाराज रणजितसिंहांनी 'झमझमा' तोफेची मागणी केली. मागणीचे कारण असे की 1764 मध्ये रणजितसिंहांचे आजोबा चरतसिंह यांनी दुराण्याबरोबर केलेल्या लढायांतील लुटीचा वाटा म्हणून ती तोफ देण्याचे अभिवचन त्यांना मिळाले होते. म्हणून रणजितसिंहांनी तिची मागणी केली. पण ती देण्यास नकार मिळताच रणजितसिंहांनी अमृतसरवर हल्ला चढविला व अवघ्या दोन तासांच्या अवधीत त्यांनी ती भांगींच्याकडून हस्तगत केली. (सध्या ही तोफ लाहोरच्या वस्तुसंग्रहालयाच्यासमोर आहे.)

आता शीखांचे प्रसिद्ध धार्मिक क्षेत्र अमृतसर व त्यांची राजकीय राजधानी लाहोर ही दोन्ही ठिकाणे महाराजांच्या हाती आली. त्यांनी सदा कौर व फत्तेसिंह अहलुवालिआ यांच्याशी दोस्ती संपादन केली होती. जम्मू व कसूरसहित कित्येक राज्यकर्त्यांकडून त्यांना खंडण्या मिळत होत्या. त्याच सुमारास अकाली फुलसिंह महाराजांच्या लष्करी सेवेत दाखल झाला. महाराजांचा मोठा विश्वासू सेनापती म्हणून पुढे तो इतिहासात प्रसिद्धीस आला.

मराठे व ब्रिटिश

इ. स. 1805 मध्ये झांग पादाक्रान्त करून महाराज मुलतानवर चाल करण्याच्या बेतात असता यशवंतराव होळकर व पेंढाऱ्यांचा प्रमुख अमीरखान पंजाबात शिरल्याचे त्यांना समजले. ब्रिटिश कमांडर लॉर्ड लेक हा त्या दोघांचा पाठलाग करीत असून त्याने बियासच्या पूर्व किनाऱ्यावर तळ दिला असल्याचेही त्यांच्या कानी आले. म्हणून महाराज अमृतसरला तडक परतले. आणि होळकर व ब्रिटिश यांच्यांशी कोणत्या स्वरूपाचे संबंध ठेवावेत हे ठरविण्यासाठी त्यांनी शीख पुढाऱ्यांची बैठक बोलाविली. पाठलाग करणारा व केला जाणारा हे दोघेही तसेच पुढे सरकत गेल्यास त्यांचा मुकाबला होऊन पंजाबची भूमी विनाकारण वैराण होईल हा धोका महाराजांनी हेरला. त्याशिवाय त्यांच्याशी सामना देण्याइतके बळही शीखांजवळ नसल्याचे त्यांनी लक्षात घेतले. व म्हणून समझोता घडवून आणण्याचा निर्णय त्यांना गुरुमातेने दिला. त्याप्रमाणे महाराजांनी मध्यस्थी केली. होळकरांना दिल्लीपलीकडचा प्रदेश परत मिळाला. नंतर शीख पुढारी व लॉर्ड लेक यांच्या दरम्यान त्यांनी तह घडविला. त्याप्रमाणे लॉर्ड लेक यांनी आश्वासन दिले की, तह अस्तित्वात असेपर्यंत शीखांच्या प्रदेशात ब्रिटिश सैन्य शिरणार नाही; अथवा त्यांचा प्रदेश बळकाविण्याचा प्रयत्न करणार नाही. त्याशिवाय होळकरांनी आपले सैन्य अमृतसरपासून 30 कोस दूर ठेवावे आणि पंजाबी पुढाऱ्यांनी त्यांच्याशी संबंध न ठेवता त्यांच्या कोणत्याही भानगडीत पडू नये, असेही त्या तहात ठरविण्यात आले.

या एकूण घडामोडींमुळे महाराज रणजितसिंह यांची 'सर्वश्रेष्ठ शीख नेता' ही भूमिका उत्तम रीतीने सिद्ध झाली. त्याच भूमिकेतून त्यांनी नाभा व पतियाळा यांच्यातील प्रादेशिक मालकीबद्दलचा एक लहानसा झगडा मिटविला. महाराजांचा निर्णय पतियाळाच्या बाजूने सोयीस्कर वाटल्यामुळे नाभाला नुकसानभरपाई म्हणून काही गावे देण्यात आली.

या सुमारास नेपाळी सेनापती थापा याने कांग्राच्या किल्ल्याला वेढा दिला होता. राजा संसारचंदाचा भाऊ फत्तेचंद याच्याकडे तो किल्ला होता. त्याने महाराजांच्याकडे मदत मागितली. महाराज तेव्हा जालंदरहून परतत होते. ते एकदम जातीने ज्वालामुखी येथे हजर झाले. त्याबरोबर थापाने वेढा उठविला. याच वेळी व तेथेच महाराजांना एक वार्ता मिळाली. मेहताब कौर प्रसूत होऊन तिला जुळे झाले होते. महाराज लगेच अमृतसरच्या (दरबारसाहेब) मंदिरात गेले व तेथे त्यांनी परमेश्वराला धन्यवाद दिले.

कसूर व मुलतान

कसूरचा राजा वारल्यावर त्याचा धाकटा भाऊ गादीवर आला. तो उन्मत्तपणे वागू लागला. तेव्हा त्याच्या डोळ्यांत अंजन घालणे महाराजांना भाग पडले. म्हणून त्याला पदच्युत करून महाराजांनी कसूरला एका शीख जहागीरदाराची नेमणूक केली. तथापि त्या राजाला व त्याच्या कुटुंबियांना सहानुभूतीने वागवून उदरनिर्वाहापुरती जहागिरी महाराजांनी त्याचेकडे ठेवली. कसूरच्या राजे-जहागीरदारांशी उद्दामपणे वागणाऱ्या मुलतानच्या नबाब मुजफरखानाचीही वासलात महाराजांनी तशीच लाविली असती. पण भावलपूरचा नबाब मध्ये पडला व त्याने त्याच्याकडून महाराजांना खंडणीच्या रूपाने बरीच नुकसानभरपाई देवविली.

यात्रमाणे महाराजांच्या अंमलाखाली अधिकाधिक प्रदेश एकसारखा येत गेला. नारायणगडचा राजा शरण न आल्यामुळे महाराज तेथे गेले व लगेच त्यांनी नारायणगड हस्तगत केले. रहनचा प्रमुख वारल्यावर ते राज्यही महाराजांच्याकडे आले. तथापि त्याच्या कुटुंबाची योग्य तरतूद करण्यास महाराज विसरले नाहीत. याप्रमाणे राज्यविस्तार चालू होता. 1808 मध्ये महाराजांचा अंमल पठाणकोट, चंबा व बशोलीपर्यंत पोहोचला होता. पुढे लवकरच सियालकोट व अखनूरही त्यांच्या ताब्यात आले. अनेक सरदार त्यांना आपणहून शरण आले. शेखुपुऱ्याच्या राजाने विरोध केला. पण त्याचाही फारसा टिकाव लागला नाही.

ब्रिटिश डावपेच

महाराज रणजितसिंह यांच्या सत्तेचा उत्कर्ष याप्रमाणे होत असता यमुना नदीच्या पूर्वेस ईस्ट इंडिया कंपनीचाही अंमल वाढत व विस्तारत होता. आपण कोणती भूमिका स्वीकारावी हे ठरविण्यासाठी सीस-सतलज शीख राजांनी एक बैठक घेतली व संरक्षणाच्या दृष्टीने जॉन कंपनीचा आश्रय घेण्याचे त्यांनी ठरविले. 1808 मध्ये त्याप्रमाणे एक संयुक्त विनंती अर्ज दिल्लीच्या ब्रिटिश रेसिडेंटकडे करण्यात आला. त्याने तो कलकत्त्यास गव्हर्नर जनरलकडे पाठविला. एकूण प्रकारातले इंगित अंगच्या हुषारीने जाणून महाराज रणजितसिंहांनी शीख राजांची एक बैठक अमृतसरला बोलाविली आणि तेथे त्यांच्या शंका-भयाचे निरसन केले. सर्व शीख राजेलोकात एकता, संघटन आणि स्नेहभाव असला पाहिजे याचे फार प्रभावी प्रतिपादन करून आपल्या दृढ स्नेहभावनेचे पारंपरिक प्रतीक म्हणून त्यांनी पतियाळाच्या महाराजांबरोबर आपला फेटाही बदलला.

तुर्कस्तान आणि पर्शिया यांच्या साहाय्याने भारतावर स्वारी करण्याचा

नेपोलिअन बोनापार्टचा मनसुबा जेव्हा भारतातील ब्रिटिशांना समजला तेव्हा एतद्देशीयांशी असलेले आपले अलिप्ततेचे संबंध व मध्ये न पडण्याचे धोरण त्यांनी बदलले. फ्रेंच सत्तेविरुद्ध भारतात संयुक्त आघाडी उभारण्याच्या उद्देशाने त्यांनी लाहोर, काबूल व तेहरान येथे सदिच्छादर्शक शिष्टमंडळे पाठविली. चार्लस मेटकाफ् हा ब्रिटिश राजदूत महाराजांना 1808 च्या सप्टेंबरमध्ये खेमकरण येथे भेटला. महाराजांकडून सहकार्याची याचना करून, नेपोलिअनचा मनसुबा उधळून लावण्यासाठी अफगाणिस्तानवर स्वारी करण्याची गरज त्याने महाराजांना पटवून दिली व त्यांच्या प्रदेशातून आपले सैन्य जाऊ देण्याची परवानगी मागितली. त्यावर, सर्व शीख राज्यांवरील आपले प्रभुत्व मान्य केले जावे आणि शीख राजे व काबूलचा राजा यांच्यामध्ये मतभेद झाल्यास ब्रिटिशांनी तटस्थ राहावे ह्या आपल्या दोन अटी महाराजांनी त्याला सांगितल्या. पण त्या मान्य करण्यासाठी मेटकाफला पुरेसे अधिकार नसल्यामुळे त्याने त्या गव्हर्नर जनरलला कळविल्या.

महाराजांनी आता सीस-सतलज राज्यात एक नवी मोहीम काढली. त्यांच्यापैकी कोणती राज्ये आपल्या राज्याला जोडता येतील याचा अंदाज त्यांना घ्यावयाचा होता. या वेळी फरीदकोट, मालेरकोटला, अंबाला आणि शहाबाद ह्या शहरांतून ते आपले सैन्य घेऊन गेले. नेपोलिअनच्या स्वारीचे ढग आता निवळले होते. तेव्हा ब्रिटिशांनी लगेच ताठ मानेचे धोरण स्वीकारले. महाराजांचे सैन्य चाल करीत गेल्यामुळे भयभीत झालेल्या काही संस्थानिकांना संरक्षण देण्याची तयारी दर्शवून ब्रिटिशांनी त्यांच्या रक्षणार्थ लुधियाना येथे आपले सैन्य रवाना केले. महाराजांच्या महत्त्वाकांक्षेला पायबंद घालण्याचे कामही त्यामुळे साधले जात होते. जी राज्ये आधीपासून स्वतःच्या मालकीची होती, त्यांच्यापुरताच आपला अंमल मर्यादित ठेऊन, अलीकडेच हस्तगत करण्यात आलेली राज्ये रणजितसिंहांनी ज्यांची त्यांना परत करावीत असा आदेश देणारा एक जाहीरनामा ब्रिटिश गव्हर्नर जनरलने काढला. एक प्रकारे ही गोष्ट महाराजांना अपमानास्पद होती. साहजिकच ती त्यांना मुळीच रुचली नाही. 25 एप्रिल 1809 रोजी त्यांनी ब्रिटिशांशी एक तहनाम्याचा करार केला. त्यामुळे इतकेच झाले की फुलकिअन राज्यातून त्यांना आपले सैन्य माघारी घ्यावे लागले. बाकीच्या प्रदेशात–सिंधू नदीपलीकडे पेशावरपर्यंत, जम्मू व काश्मीरमध्ये, कांग्रात आणि शिवालिक टेकड्यांच्या परिसरात वगैरे कोठेही स्वाऱ्या आणि राज्यविस्तार करण्याची मुभा महाराजांना होती.

चार

नंतरचे दिग्विजय

रणजितसिंहांच्या राज्याचा विस्तार आता द्रुतगतीने होऊ लागला होता. नेपाळी सेनापती थापा याने 1800 मध्ये कांग्रावर पुन्हा स्वारी केली. तेव्हा कांग्राचा राजा संसारचंद याने महाराजांकडे मदतीची याचना केली. तथापि कांग्रा देण्याचे आपले आधीचे वचन पाळण्यास संसारचंद नाखूष दिसल्यावरून महाराजांनी कांग्राच्या किल्ल्याचा ताबा घेतला आणि थापाला परतवून लाविले. ह्या विजयामुळे चंबा, नुरपूर, कोटला वगैरे ठिकाणच्या अनेक डोंगरी राजेलोकांमध्ये महाराजांबद्दल दरारा निर्माण झाला.

सध्या हरयाणा नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशावर तेव्हा करोरासिंगिआ ह्या शीख संघटनेचे स्वामित्व होते. महाराजांनी तो प्रदेश खालसा करून तेथील प्रमुखाच्या विधवेच्या चोळीबांगडीची व्यवस्था केली. साहिवाल आणि गुजरातमधील बलुची पुढाऱ्यांकडून 1810 मध्ये महाराजांनी त्यांचा किल्ला खाली करविला. नबाब मुझफरखानाकडून मुलतान घेऊन त्या राज्यावर नवी खंडणी बसविली. त्यानंतर लवकरच जम्मू, वझिराबाद व दास्का त्यांनी आपल्या राज्यात सामील केली. आणि नक्काईचा प्रदेशही स्वारी करून आपल्या अंमलाखाली आणला.

काश्मीर

वझीर फत्तेखानाच्या सैन्याच्या मदतीने काश्मीरला नमविण्याचा प्रयत्न महाराजांच्या लष्कराने 1811-12 मध्ये केला. शेरगड येथे महाराजांनी काश्मीरचा गव्हर्नर अता महंमद याचा पराभव केला. त्याचा भाऊ जहान दादखान हा अटकचा गव्हर्नर होता. पण वझिराबादची जहागिरी पत्करून त्याने तिच्या मोबदल्यात अटक खाली केले. 1813 मध्ये फत्तेखानाने पंजाबवर स्वारी केली असता त्याला हजरो येथे हार खावी लागली. अफगाण लोकांची पुंडाई काश्मीरमध्ये वाढत असल्याचे पाहून ते जिंकण्याची योजना महाराजांनी आखली. अनेक ठिकाणी त्यांनी अफगाणांचा

पराभव केला. तरी बेसुमार पावसामुळे लाहोरला परतणे महाराजांना भाग पडले (1814). राजौरीच्या नबाबाला त्याच्या विश्वासघाताची अद्दल घडविण्यासाठी महाराजांनी त्याचे राज्यच खालसा करून टाकले (1815).

भावलपूरचा नबाब 1816 मध्ये महाराजांचा मांडलिक झाला. मुझफरखानाकडे खंडणीची बाकी थकली होती. त्यामुळे महाराजांनी मुलतानचा ताबा घेतला आणि काही खंडणी वसूल झाल्यावरच तो सोडला. त्यानंतर मनकेरा, झांग व उच ही ठाणी त्यांनी एका पाठोपाठ हस्तगत केली. रामगढिआवंशीय सरदारांमध्ये बरेच भांडणतटे माजले होते. म्हणून त्यांचा प्रदेश आपल्या ताब्यात घेऊन त्यांना त्याबद्दल एक मोठी जहागीर महाराजांनी दिली.

मुलतानचा संग्राम

खंडणीची थकबाकी देण्याची मुदत टळून गेली म्हणून तिच्या वसुलीसाठी 1817 मध्ये महाराजांनी मुझफ्फरखानावर हल्ला करण्यासाठी निवडक सैनिकांची एक खास तुकडी रवाना केली. काही चकमकीतच नबाबाचे सैन्य शरण आले, आणि आपल्या पोटापुरता प्रदेश तोडून दिल्यास मुलतान आणि मुझफ्फरगडचे किल्ले खाली करून देण्याची तयारी नबाबाने दर्शविली. तथापि त्याप्रमाणे शब्द पाळण्यात न आल्यामुळे लढाईला अधिक जोरात तोंड लागले. शीखांच्या सैन्याने किल्ल्याच्या तटावर तोफा डागल्या आणि एका तटाला खिंडार पाडणार तेवढ्यात तोफेचे एक चाक निकामी झाले. दुरुस्ती करण्यासाठी अथवा नवे चाक बसविण्यासाठी अवधी नसल्यामुळे, निधड्या आणि सेवातत्पर सैनिकांनी प्राणांची पर्वा न करता चाकाच्या जागी आपले खांदे दिले. अखेर किल्ल्याच्या एका तटाला खिंडार तर पाडले गेले, पण त्यापूर्वी अनेकांना प्राणांस मात्र मुकावे लागले. नबाब व त्यांची मुले तटबंदीच्या रक्षणासाठी पुढे होऊन जातीने लढू लागली. पण शीखांच्या तरवारी भिडताच त्यांचा टिकाव लागेना. शेवटी 15 जून 1818 रोजी महाराजांनी किल्ला सर केला. किल्ल्याचा तट पोखरून तो उडवून देण्याच्या कामी निहंगांच्या एका तुकडीने शर्थीची कामगिरी बजाविली.

पेशावर

वझीर फत्तेखानाच्या खुनामुळे काबूलमध्ये अनागोंदी माजली होती. तेथील परिस्थिती लक्षात घेऊन महाराजांनी अटकला सैन्य रवाना केले. अटक व्यापल्यावर महाराजांच्या सैन्याने सिंधू पार करून पेशावरकडे कूच केले. अफगाण राजा दोस्त

महंमद शरण आला आणि त्याने खंडणी देण्याचे मान्य केले. तेव्हा महाराजांनी ते स्वीकारून, आपला प्रतिनिधी म्हणून त्याची तेथेच नेमणूक केली. भारतात प्रवेश करण्यासाठी परदेशी लोक ज्या मार्गाचा उपयोग करीत तो महाराजांच्या ताब्यात आल्यामुळे परकीयांच्या भारत-प्रवेशाला चांगलाच आळा बसला. तसेच त्या मार्गाने भारतावर होणाऱ्या स्वाऱ्यांचेही भय त्यामुळे बरेच कमी झाले. विशेष म्हणजे जेते म्हणून आजवर गाजलेल्या अफगाणांवर शरणार्थी होण्याची पाळी आणून महाराजांनी त्यांचे दात त्यांच्याच घशात घातले होते.

पुनश्च काश्मीर

अद्याप काश्मीर पुरेसे नामोहरम झाले नव्हते. ते खालसा करून आपल्या राज्याची उत्तर सीमा थेटपर्यंत महाराजांना वाढवावयाची होती. म्हणून 1819 साली त्या उद्देशाने त्यांनी सैन्याच्या तीन वेगवेगळ्या तुकड्या रवाना केल्या. पैकी एकीचे नेतृत्व त्यांनी खुद्द स्वतःकडेच घेतले होते. राजौरी आणि पूंच या दोन्ही ठिकाणी अफगाण सैन्याचा पाडाव करण्यात आला. पीर पंजालच्या पायथ्याशी झालेली एक लढाई जिंकल्यावर महाराज काश्मीर खोऱ्यात पुढे सरकले; व 4 जुलै 1819 रोजी त्यांनी श्रीनगरमध्ये प्रवेश केला. यावरून हे कळून येते की, जम्मू व काश्मीर हे इतिहासकाळात एकदा शीख राज्याचा एक विभाग होते.

नौशेराची लढाई

पेशावरचा कारभार महाराजांच्या वतीने यार महंमद पाहत होता. 1823 मध्ये, काबूलचा वझीर झालेला त्याचा भाऊ अझिमखान याने पेशावरवर हल्ला केला; आणि ते ताब्यात घेऊन शीखांविरुद्ध जिहाद पुकारला. ही बातमी समजताच त्याच्या पारिपत्यासाठी महाराजांनी खूप मोठे सैन्य धाडले. एका प्रसंगी ते स्वतः सिंधू पार करून नौशेऱ्याला हजर झाले. पठाणी सैन्य नौशेऱ्याला जमा झाले होते आणि मुख्य लढाईला तोंड तेथेच लागले होते. 14 मार्च 1824 रोजी दोन्ही सैन्यात लढत होऊन तिच्यात शीख विजयी झाले. त्यानंतर महाराज पेशावरला गेले. जेथे त्यांनी अझिमखानाच्या भावांकडून शरणपत्र मिळविले. पुढे तेथील कारभार पाहण्यास महाराजांनी त्यांनाच नियुक्त केले.

पेशावर 1827 मध्ये पुन्हा एकवार रणक्षेत्र झाले. उत्तर प्रदेशच्या पूर्व भागातील एक धर्मान्ध माजी रहिवासी सय्यद हा यावेळच्या संग्रामाला कारण ठरला. त्याने पठाणांत मिसळून जिहाद जाहीर केला. प्रथम अपयश आले तरी

चिकाटीने लढत राहून त्याने 1828 मध्ये पेशावरचा ताबा मिळविला. त्याच्या जुलमी फतव्यामुळे पेशावरी मुसलमानही त्याचा व त्याच्या अनुयायांचा द्वेष करू लागले होते. मोठे सैन्य पाठवून 1830 मध्ये महाराजांनी त्यांचे पारिपत्य केले आणि पेशावर परत मिळविले. पुढील वर्षी (1831) एका लढाईत सय्यद मारला गेला.

राजनैतिक हालचाली

महाराजांचे महत्त्व व सत्ता जसजशी वाढू लागली तसतशी त्यांची मैत्री संपादन करण्याची गरज इतर राजे-रजवाड्यांना वाटू लागली. हैदराबादच्या निजामाने 1826 मध्ये आपला वकील नजराणे देऊन लाहोरला पाठविला. नजराण्यात एक सुंदर मेघडंबरी होती. महाराजांनी ती देणगी म्हणून सुवर्ण मंदिराला देऊन टाकली. 1831 मध्ये ब्रिटिशांकडून त्यांचा प्रतिनिधी म्हणून ले बर्नस् नजराणा म्हणून पाच घोडे आणि एक निष्णात स्वार घेऊन आला. काही उपयुक्त राजकीय आणि भौगोलिक माहिती, विशेषतः सिंधू नदीतून गलबते नेण्यासाठी जलवाहतुकीच्या सवलती मिळविणे हा त्या राजदूताच्या आगमनाचा प्रमुख उद्देश होता. त्याच साली नवे गव्हर्नर म्हणून लॉर्ड विल्यम बेंटिंक आले. त्यांच्या स्वागतासाठी महाराजांनी सिमल्याला एक स्नेहदर्शक शिष्टमंडळ पाठविले. रिवाजानुसार उलट आपलेही शिष्टमंडळ महाराजांकडे पाठविण्याऐवजी बेंटिंकने महाराजांकडून निमंत्रण मिळवून स्वतःच त्यांची भेट घेण्याचे ठरविले. त्याप्रमाणे 16 ऑक्टोबर 1831 रोजी रूपार येथे उभयतांची भेट झाली. ती एक आठवडाभर चालू राहिली. त्या कालावधीत मनोरंजनाचे विविध कार्यक्रम ठेवण्यात आले होते. उभयतांनी लष्करी महत्त्वाच्या प्रश्नांसह अनेक गोष्टींवर वाटाघाटी केल्या. त्या भेटीचे नवनीत म्हणजे महाराजांनी कायमच्या स्नेहाचे लेखी आश्वासन बेंटिंककडून मिळविले. उभयतांचे संपूर्ण मतैक्य झाल्याचा बाह्य देखावा त्या वेळी जगाला दाखविण्यात आला, तरी सिंध हस्तगत करण्याची आपली महत्त्वाकांक्षा महाराजांनी सोडून द्यावी अशी स्पष्ट सूचना त्यांना करण्यात आली. व त्यांच्या राज्याची दक्षिण सीमा निश्चित करण्यात आली. ब्रिटिशांनी सिंधच्या अमीराशी 1832 मध्ये वेगळ्या वाटाघाटी केल्या आणि त्याच्याशी तहनामा करून सिंधू नदीतील जलवाहतुकीच्या नियंत्रणाचे व तिच्या पात्रातून वाहून नेल्या जाणाऱ्या मालावर कर वसूल करण्याचे हक्क मिळविले. पुढे 1834 व 1839 मध्ये त्या करारात सुधारणा करण्यात आल्या.

जामरूदची लढाई

रणजितसिंहांच्या सेनापतींनी काबूलचा माजी राजा शहा सूझा याला काश्मीरातून आणून 1811 मध्ये लाहोराला स्थानबद्ध केले होते. पुढे ब्रिटिशांनी त्याला लुधियाना येथे स्थानबद्ध केले. आपली गादी परत मिळविण्याचे त्याचे प्रयत्न तत्पूर्वी विफल झाले होते; तरी त्याने 1833 मध्ये महाराजांशी एक करार केला आणि त्यानुसार महाराजांनी पठाणांना केलेल्या मदतीच्या मोबदल्यात, सिंधू नदीच्या दोन्ही बाजूंचा त्याच्या ताब्यातील प्रदेश स्वतःकडे ठेवावा असे ठरले. आपले राज्य परत मिळविण्याचा आणखी एक प्रयत्न त्याने 1834 मध्ये केला. पण तोही विफल ठरल्यामुळे पंजाबातच त्याला हद्दपारीमध्ये राहणे भाग पडले.

शाह सूझा आणि काबूलचा राज्यकर्ता दोस्त महंमद यांच्यातील झगड्यामुळे, पेशावर शहरावर स्वतःचे नियंत्रण ठेवण्याचे ठरवून महाराजांनी त्याप्रमाणे आपल्या नातवास तेथला गव्हर्नर म्हणून नेमले. दोस्त महंमदाने 1835 मध्ये पेशावरवर सूड बुद्धीने हल्ला केला. पण महाराज तेथे जातीने उपस्थित होताच तो काबूलला परतला. अफगाणांपासून संरक्षण लाभावे म्हणून महाराजांनी त्या भागात दोन किल्ले बांधले. या गोष्टीची चीड येऊन दोस्त महंमदाने 1837 मध्ये पेशावर परत सर करण्यासाठी व शीखांना हुसकण्यासाठी जामरूदच्या किल्ल्याला वेढा दिला. महाराजांचा पेशावरमधील प्रतिनिधी हरिसिंग नलवा तेव्हा आजारी होता. तरीही तो जामरूदच्या सैन्याच्या मदतीला धावला. पण दुर्दैवाने तो शत्रूच्या गोळीबारात कामास आला. अखेर महाराज स्वतःच किल्ल्याजवळ दाखल झाले. पण त्यापूर्वीच अफगाण तेथून निघून गेले होते.

त्रिपक्षीय तह

पर्शिया व तुर्कस्तान यांच्या साहाय्याने सिंधू नदीपर्यंत धडक मारण्याची योजना रशिया त्या सुमारास आखीत होती. ह्या बातमीमुळे ब्रिटिश फार बेचैन झाले होते. अशा वेळी काबूलच्या सिंहासनावर स्नेहसंबंधित राजा असल्यासच हा धोका टळणे शक्य आहे असे ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांना वाटले. त्या दृष्टीने त्यांच्या नजरेपुढे शाह सूझा उभा राहिला. पण सूझाने त्याबद्दल काही अटी घातल्या. महाराज रणजितसिंह यांच्या विस्तारवादी आक्रमणापासून संरक्षण व पेशावरची पुनर्प्राप्ती ह्या दोन त्यांत मुख्यत्वे होत्या. पण कोणत्याही परिस्थितीत पेशावर हातचे सोडण्यास महाराज मुळीच तयार नव्हते. एक राजा म्हणून शाह सूझाला ते मानीत नव्हते. तथापि लॉर्ड ऑक्लंडच्या आग्रहासाठी रशियाच्या

प्रतिकाराच्या योजनेत सहभागी होण्याचे त्यांनी मान्य केले. अशा प्रसंगी आपण एकटे बाजूला राहणे इष्ट ठरणार नाही हे त्यांना उमजले. अखेर 20 जून 1838 रोजी ब्रिटिश, महाराज रणजितसिंह आणि शाह सूझा ह्या तिघांत एक करार झाला.

स्वारीस सिद्ध असलेले सैन्य ब्रिटिशांनी लगेच फिरोजपूरला जमविले. बहवालपूर, सिंध आणि बोलन खिंड या मार्गाने ते 1839 च्या एप्रिल अखेरीस कंदहारला पोहोचले आणि तेथे त्याने तळ दिला. शीख सैन्य पंजाबच्या पलीकडे गेले.

त्रिपक्षीय करार केला गेला तेव्हा फिरंग्यांच्या वाढत्या प्रभावाची कल्पना महाराज रणजितसिंहांना येऊन चुकली. स्वाऱ्या, लढाया, मोहिमा आणि स्वतःची व्यसनाधीनता यामुळे आपले शरीर खंगत चालले असल्याचेही त्यांना आता कळून आले. त्यांना खूप थकल्यासारखे वाटू लागले होते. अशा त्या कष्टजीर्ण शरीरातील प्राण 27 जून 1839 रोजी अंतर्धान पावले.

पाच

कोहिनूरची कथा

एक अतिमूल्यवान हिरा म्हणून 'कोहिनूर' लोककथा व इतिहास यांच्या द्वारा भारतात आबालवृद्धांना सुपरिचित झालेला आहे. त्याचा उल्लेख पुराणातही आढळतो. कारण तो पांडवांनी वापरल्याचे सांगतात. त्यानंतर त्याचा उल्लेख आढळतो तो मोगलकालात. मोगलांच्या मयूर सिंहासनाला शोभा व मूल्य आणिले ते कोहिनूरने. नादिरशहाने जेव्हा दिल्लीची लूट केली तेव्हा कोहिनूर हिरा ही त्याची अभिमानाची लूट होती. पुढे हा हिरा अहमदशहा अब्दालीच्या हाती गेला. 1813 मध्ये तो दुराण्यांचा माजी राजा शाह सूझा याच्याजवळ होता.

इ. स. 1809 मध्ये आपली गादी गमाविल्यानंतर काश्मीरमध्ये एक कैदी म्हणून त्याला ठेवण्यात आले होते. तेथील गव्हर्नर अता महंमदखान हा सूझाच्या डोळ्यापुढे स्वतःची बरची धरी आणि ती दाखवून त्याच्याकडून कोहिनूर मागे आणि तो न दिल्यास त्याचे डोळे फाडण्याचीही धमकी देई, अशी कथा प्रचलित आहे. तथापि एवढे करूनही त्याला लभ्यांश साधला नाही. आपल्या नवऱ्याच्या शारीरिक छळाच्या वा मृत्यूच्या भयाने सूझाची पत्नी वफा बेगम महाराजांना भेटली आणि काश्मीरवरील आपल्या स्वारीत महाराजांनी शहाची सुटका करावी व लाहोरला (जेथे तिने आसरा घेतला होता तेथे.) तिच्याकडे तिचा पती सुपूर्द करावा अशी विनंती तिने महाराजांना केली, त्याबद्दल तिने कोहिनूर हिरा त्यांना देण्याचे मान्य केले.

त्याप्रमाणे आपल्या मोहिमेच्या अखेरीस महाराजांनी शाहची सुटका केली. नंतर लाहोरमध्ये मोठ्या समारंभाने त्याचे स्वागत करण्यात आले. त्याची बेगम व इतर अफगाण निराश्रित ज्या राजवाड्यात वास्तव्य करून होते तेथे शाहला त्याच्या पत्नीकडे सुपूर्द करण्यात आले. नंतर ठरल्याप्रमाणे महाराजांनी कोहिनूरची मागणी केली. पण कोहिनूरच काय; साधे उत्तरही त्यांना मिळाले नाही! महाराजांनी आपले दूत अनेकदा पाठविले. पण ठरावीक उत्तर येई. कंदाहारच्या सरकारकडे कोहिनूर

गहाण पडला आहे असे बेगम सांगे. याच्या उलट शाहकडून उत्तर मिळे की उभयतांमध्ये खराखुरा स्नेह प्रस्थापित झाल्यावर तो दिला जाईल! कोहिनूरसारखा अतिमूल्यवान हिरा हातचा सोडण्याची पाळी प्रत्यक्षात आल्यास कोणालाही किती नाराजी येईल याची पूर्ण जाणीव महाराजांना होती. पण काश्मीरच्या मोहिमेसाठी व त्यातही विशेषतः शाहची सुटका करण्यासाठी महाराजांना जबरदस्त खर्च आला होता; आणि बरीच प्राणहानीसुद्धा झाली होती. कोहिनूर मिळविण्यासाठी महाराजांनी अखेर त्या पतिपत्नींना खूप मोठी रक्कम व जहागिरीही देऊ केली. तरीही त्यांच्याकडून कोणताच जबाब मिळाला नाही!

अफगाण निराश्रितांची सरबराई प्रथम पाहुण्यांप्रमाणे ठेविली जात असे. पण आता त्यांच्या निवासाभोवती कडक पाहारा ठेवण्यात आला. आणि अधूनमधून त्यांचा शिधा रोखण्यात येऊन त्यांच्यावर दडपणही आणण्यात आले. तेथे देखरेखीसाठी ठेविलेल्या अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार महाराजांनी शाहला काही रोकडही पुरविली. तरीही कोहिनूर देण्याबाबत ती मंडळी पूर्णपणे थंडच राहिली. अखेर एक दिवस महाराज जातीने उपस्थित झाले; आणि त्याने कोहिनूर हिरा द्यावा व त्याच्या मोबदल्यात आपल्याकडून त्याने हवी ती मदत मागावी अशी तयारी दर्शविल्यावर कोठे तो राजी झाला.

त्याप्रमाणे हिरा देण्यासाठी 1 जून 1813 हा दिवस निश्चित करण्यात आला. काही घोडेस्वारांसह महाराज तेथे उपस्थित झाले. उभयतांनी एकमेकांना आलिंगन दिले. त्यानंतर शाहच्या एका नोकराने जनानखान्यातून एक गाठोडे आणले व ते महाराजांना दिले. ते उलगडल्यावर त्यांना आत एक हिरा आढळला. पण खरोखरीच तो कोहिनूर आहे की नाही हे पारखण्यासाठी महाराजांनी तो सोबतच्या मंडळीपैकी एकास दाखविला. त्याप्रमाणे समाधान होताच, शाहचे आभार वगैरे न मानता किंवा त्याचा निरोप न घेता महाराज तेथून एकदम निघून गेले असा प्रवाद आहे.

नंतर महाराजांनी तो हिरा जवाहिऱ्यांना दाखविला. तेव्हा तो कवडी मोल असल्याचे त्यांनी सांगितले. तेव्हा महाराजांनी आपली माणसे पाठवून शाह व त्याचे कुटुंबीय यांच्याजवळचे इतर जडजवाहीर काढून आणिले. यामुळे शाह कुटुंबियांवर दुःख-विषण्णतेची कृष्णछाया पसरली. शाहने तर अन्नग्रहण करणे सोडले होते असे सांगतात. परिणामी त्यांच्यावरील पहारा ढिला करण्यात आला. आणि त्याचा फायदा घेऊन शाह व बेगम तेथून निसटले. आणि लुधियाना येथे ब्रिटिशांच्या आश्रयास (पेन्शनर म्हणून) जाऊन राहिले.

कोहिनूर हिरा हस्तगत करण्यासाठी महाराज रणजितसिंह यांच्याकडून शाह

सूझा व त्याच्या कुटुंबातील मंडळी यांचे जे हाल केले गेले त्याबद्दल पुष्कळदा त्यांच्यावर टीका केली जाते. तथापि रणजितसिंह आणि सूझा हे दोघेही त्यांच्या काळचे प्रतिनिधी होते. साहजिकच त्यांच्या कृत्यांच्या नैतिकतेला आजच्या प्रचलित मूल्यांची कसोटी लावून भागणार नाही. दुसरे असे की शाहचे स्वदस्तुरचे लिखाण उपलब्ध असून त्यात त्याने महाराजांविरुद्ध कसलीही तक्रार वा आरोप केलेला नाही. शाहला त्याच्या प्रादेशिक अधिकाराबद्दल आधी दिलेली आश्वासने महाराजांनी पाळली नाहीत याचे उत्तर असे आहे की नंतर घडून आलेल्या घटनांमुळे, आपल्या धोरणात फरक करणे महाराजांना अपरिहार्य वाटले असावे. पुढे इ. स. 1838 मध्ये शाहला काबूलच्या सिंहासनावर पुन्हा बसविण्याच्या ब्रिटिशांच्या प्रयत्नांना महाराजांनी साहाय्य केले. हे सत्य पूर्वीचे सारे आरोप बरोबर नसल्याचे दाखविते.

महाराजांच्या मृत्यूनंतर कोहिनूर हिरा सुमारे 10 वर्षे लाहोरमध्ये होता. त्यानंतर तो ब्रिटिशांनी घेतला.

गंमत ही की, लोककथा व इतिहास यांच्यामध्ये कोहिनूर हिऱ्याचा उल्लेख वारंवार आला असला तरी त्याचे तपशीलवार व खरेखुरे वर्णन क्वचितच आढळते. नंतर अनेक पाश्चात्त्यांनी तो हिरा एकवार पाहण्यास मिळण्याची विनंती महाराजांना वेळोवेळी केली व त्याप्रमाणे त्यांना तो पाहण्यास मिळालाही. पण त्या सर्वांपैकी जॉर्ज ऑस्बर्न ही एकच व्यक्ती अशी निघाली की जिने आपण पाहिलेल्या वस्तूचे योग्य व पुरेसे तपशीलवार वर्णन लिहून ठेविले आहे. ऑस्बर्न लिहितो, ''कोहिनूर हा एक अद्वितीय हिरा आहे. त्याची लांबी दीड इंच भरेल. रुंदी एक इंचापेक्षा थोडी जास्त असावी. तो फार तेजस्वी असून त्याची किंमत तीस लाख पौंड भरेल. कोंदणातून तो सुमारे अर्धा इंच उठून दिसतो. त्याचा आकार अंड्यासारखा आहे. त्याच्यापेक्षा अर्ध्याने लहान अशा दोन हिऱ्यांच्यामध्ये एका कड्यात तो बसविलेला आहे. कोहिनूरमध्ये कोणताही दोष वा न्यून आढळत नाही.''

तथापि त्या ब्रिटिश अधिकाऱ्याच्या मतानुसार महाराज रणजितसिंह यांच्याजवळ कोहिनूरपेक्षाही जास्त सुंदर व सुबक मोती होते. खरे म्हणजे महाराजांजवळ सुमारे तीनशे मोत्यांची माळच होती; व त्यापैकी एकेक मोती गोटीच्या आकाराचा होता. सर्वांचा आकार गोल होता. त्यांच्या संग्रहातील मोती मोठे निवडक होते. त्यांचे आकार खास आकर्षक व रंग मोठे मनोज्ञ होते.

सहा

घोडे व तोफा

महाराज रणजितसिंहांना सर्वात जास्त शौक होता तोफा व घोडे यांचा. त्यांच्या ह्या शौकाबद्दल मेटकाफ लिहितो, "तोफा-बंदुकांबद्दलची महाराजांची आवड इतकी मोठी आणि त्यांच्या वजनाबद्दलचे त्यांचे ज्ञान इतके अचूक होते की तोफ मिळविण्याची संधी कोठे उपलब्ध झाल्यास ते ती कधीच गमावीत नसत. एखाद्या किल्ल्यात तोफ आहे असे त्यांना कळायचा अवकाश, की तो किल्ला सर करून तोफ हस्तगत केल्याशिवाय; अथवा किल्ल्याचे रक्षण करण्यासाठी ती तोफ घेतल्याशिवाय ते कधीच स्वस्थ बसत नसत." झमझमा तोफ हस्तगत करण्यासाठी त्यांनी योजलेल्या उपायांचा उल्लेख यापूर्वी आलेला आहेच. त्यांनी लाहोरला एक फौंड्री स्थापन करून तेथे आपल्यासाठी तोफा ओतण्याचे काम सुरू केले. त्यासाठी खास अधिकाऱ्यांच्या नेमणुकाही केल्या. महाराजांच्या तोफखान्यात सुमारे 200 तोफा व इतर तत्सम रणसाहित्य असल्याची नोंद उपलब्ध आहे. याप्रमाणे तयार केलेले देशी रणसाहित्य जॉन कंपनीच्या रणसाहित्याच्या तोडीचे होते असा निरीक्षकांचा निर्वाळा आहे.

तथापि तोफांपेक्षाही महाराजांना घोड्यांचा शौक जास्त होता असे म्हटले पाहिजे. त्यांच्याजवळ असलेली अप्रतिम लैली घोडी मिळविण्यासाठी त्यांनी किती पैसा व माणूसबळ खर्च केले याला सीमाच नाही. त्यांनी बाळगलेले कितीतरी निवडक घोडे, दरबार भेटीस आलेल्या प्रायः प्रत्येक परकीयाचे लक्ष हमखास वेधून घेत; व नजरेत भरत. 1835 मध्ये पंजाबात आलेल्या ऑस्ट्रियाच्या चार्लस व्हॅन ह्यूगेलने, महाराजांच्या देखण्या व उमद्या जनावरांनी त्याचे चित्त वेधून घेतल्याची प्रांजल कबुली दिली आहे. घोड्यांप्रमाणेच त्यांची खोगीरे, लगाम, रिकिबी आदीसुद्धा मोठ्या छानदार, आकर्षक असत. ब्रिटिश गव्हर्नर जनरल लॉर्ड ऑक्लंड यांची बहीण मिस एमिली एडन हिनेही अशीच प्रशंसा केलेली आहे. उंची जातीचे घोडे मिळविण्यासाठी कोणत्याही प्रांताशी दोन हात करायला

महाराजांनी मागेपुढे पाहिले नसते असा तिचा अभिप्राय आहे.

नवे घोडे खरेदी करण्यावर महाराज दरसाल खूप मोठी रक्कम खर्च करीत. सुमारे सहस्त्र अश्व केवळ महाराजांसाठी म्हणून पागेत बांधलेले असत. महाराजांनी आपली प्यारी घोडी, लैली कशी मिळविली त्याबद्दलची कथा मोठी मनोरंजक आहे.

पेशावरचे गव्हर्नर यार महंमदखान हे लैलीचे मूळ मालक. उमद्या सौंदर्याबद्दल साऱ्या अफगाणिस्तानात लैलीची ख्याती होती; व ती पंजाबपर्यंत पोहोचली होती! 1826 मध्ये महाराजांनी तिची मागणी यार महंमदकडे केली. आणि त्याने नकार देताच, ती हस्तगत करण्यासाठी आपला एक सेनापती रवाना केला. यार महंमदाच्या सैन्याचा पराभव करून तो पेशावरला पोहचला. तेव्हा घोडी मेल्याचे त्याला सांगण्यात आले. घोडी जबरीने काढून आणावी, नाहीतर यार महंमदाला गव्हर्नरच्या स्थानावरून पदच्युत व्हावे लागेल असा हुकूम महाराजांनी काढला. त्याबरोबर खान डोंगराळ भागात पळून गेला. महाराजांनी तसाच हुकूम आणखीही एका सेनापतीला दिला होता. त्याच्याशी झालेल्या चकमकीत यार महंमद ठार झाला. पण त्याचा भाऊ सुलतान महंमद नेमका महाराजांच्या उद्दिष्टाआड आला. अखेर सुलतानला गिरफदार करण्यात आले. आणि जोवर लैली दिली जात नाही तोवर त्याची सुटका केली जाणार नाही असे निक्षून बजावण्यात आले. ही मात्रा मात्र लागू पडली आणि अखेर लैली देण्यात आली. लाहोरला महाराजांनी तिचे स्वागत मोठ्या उत्साहाने केले.

तथापि पठाणांनी महाराजांना दिलेली घोडी खरोखरी लैलीच होती काय अशी शंका काहींनी व्यक्त केली आहे. कारण तिच्याऐवजी काही घोडे यार महंमदाने महाराजांना आधी देऊ केले होते; व महाराजांच्या प्रतिनिधींना ते दाखविलेही होते. रूपार येथे 1831 मध्ये महाराज लॉर्ड बेंटिंकला भेटले तेव्हा लैली म्हणून दाखविण्यात आलेल्या घोडीचा रंग तपकिरी होता. पण बॅरन ह्यूगेल लाहोरला आला असता त्याच्या विनंतीवरून त्याला दाखविण्यात आलेल्या लैलीचा रंग गडद करडा होता! लैली मिळविण्यासाठी आपणास 60 लाख रुपये खर्चावे लागले व बारा हजार माणसे पाठवावी लागली असे त्याला महाराज म्हणाले होते. ह्यूगेलच्या वर्णनाप्रमाणे, "लैलीच्या अंगावर काळे ठिपके होते, तिची उंची 16 हात होती, तिच्या अंगावर शोभिवंत खोगीर व इतर साज होता आणि तिच्या पायांत सोन्याची कडी होती."

महाराजांच्या कायम व प्रासंगिक घोडदलात जवळजवळ 23,000 स्वार होते.

यावरून त्यांच्याजवळ किती घोडे असले पाहिजेत याची कल्पना येऊ शकेल. त्याशिवाय महाराजांनी खासगीकडे स्वतःच्या दिमतीस ठेविलेले आणि सरदारांच्याकडे असलेले घोडे वेगळेच. तथापि, बहुतेक घोडे लहान व कमजोर आणि त्यांचा साज अगदी साधा व कमी खर्चाचा असे. पण महाराजांचे अश्वप्रेम कमी दर्जाचे होते असे मात्र त्यावरून म्हणता येत नाही. महाराज रणजितसिंह यांच्याजवळ असलेली घोडी जगातल्या घोड्यांपैकी सर्वोत्कृष्ट अशीच होती.

सात

रणजितसिंहांचा दरबार

शिवाजी व अकबर यांच्याप्रमाणे रणजितसिंहांनाही पद्धतशीर शालेय शिक्षण मिळालेले नव्हते. पण सुसंस्कृत व्यक्तित्व व सहिष्णू वृत्ती जोपासली जाण्याच्या आड तो शालेय शिक्षणाचा अभाव येऊ शकला नाही. वास्तविक त्यावेळी बहुसंख्य शीखांमध्ये ब्राह्मण, मुसलमान आणि परदेशी लोक यांच्याबद्दल पूर्वग्रह होते. तरी अधिकारांच्या अनेक जागांवर रणजितसिंहांनी त्या तिन्हींपैकी अनेकांच्या नेमणुका केल्या होत्या. ह्या उपक्रमाने व्यक्त होत असलेले जे धर्मनिरपेक्ष धोरण त्यांनी अवलंबिले ते सखोल धार्मिक चिंतनातून जन्मलेले असेल, असे जरी एक वेळ मानले नाही तरी त्याचा सुपरिणाम तत्कालीन प्रशासनावर झाला यात मात्र मुळीच शंका नाही. कारण नंतरच्या काळात काही शीख राज्यांत तो आदर्श कित्ता गिरविला गेला. याप्रमाणे रणजितसिंहांनी ज्यांना अधिकाराची उच्च पदे दिली होती, ज्यांना ते मानीत असत आणि ज्यांच्यावर त्यांचा विश्वास होता अशा काही दरबारी वरिष्ठांची माहिती पुढे दिली आहे.

फकीर अझिझुद्दिन

महाराजांच्या दरबारातील एक अत्यंत महत्त्वाची व उल्लेखनीय व्यक्ती म्हणजे त्यांचे परराष्ट्रमंत्री फकीर अझिझुद्दिन. 1799 मध्ये महाराजांनी लाहोर घेतले. तेव्हा त्यांना डोळ्याचा विकार त्रास देत होता. त्यावर एका पंजाबी वैद्याकडून त्यांनी उपचार करविले. वैद्यजींनी आपला एक शिष्य (कोणी म्हणतात मुलगा) अझिझुद्दिन याला महाराजांच्या सेवेसाठी नियुक्त केले. त्या तरुणाची सुसंस्कृत वागणूक व छाप पाडणारे त्याचे बोलणे यांचा महाराजांच्या मनावर एकदम अनुकूल परिणाम झाला. पुढे लवकरच महाराजांनी राजवैद्य म्हणून त्याची नेमणूक केली व त्याला काही गावांची जहागिरीही दिली. कालान्तराने अझिझुद्दिन महाराजांचा विश्वासू सल्लागार बनला व शेवटी परराष्ट्रमंत्री झाला. अझिझुद्दिनच्या शब्दांवर महाराजांचा विश्वास

इतका असे की, कोणतीही महत्त्वाची गोष्ट करण्यापूर्वी ते न चुकता त्याचा सल्ला घेत. आपल्या वारसाबद्दलही त्यांनी त्याला विचारले होते. तसेच ब्रिटिशांच्या बाबतीत स्वीकारावयाच्या धोरणाबद्दलही महाराजांनी त्याचा सल्ला घेतला होता. ते स्वारीसाठी बाहेर पडत तेव्हा लाहोरला राज्यकारभार पाहण्याची सर्व जबाबदारी त्याच्यावरच सोपवीत. महाराजांचा राजदूत म्हणून वाटाघाटी करण्यासाठीही अनेकदा त्याची नियुक्ती केली गेली होती. तो जातीने शिपाई बाण्याचा गडी नव्हता. तरी त्याच्याकडे कित्येकदा लष्करी कामगिरीही सोपविण्यात येई. विशेष म्हणजे, तीही त्याने वेळोवेळी यशस्वीपणे पार पाडली होती.

महाराजांचा हा विश्वासू सल्लागार सूफी असल्यामुळे सहिष्णू होता; धर्मान्ध नव्हता. ''हिंदुत्व व इस्लाम या दोहोंपैकी तुला कोणता धर्म अधिक पसंत वाटतो?'' असा प्रश्न महाराजांनी त्याला एकदा विचारला असता तो चतुराईने म्हणाला, ''एका महानदीच्या प्रवाहातून जात असलेला मी एक प्रवासी आहे. पात्रापलीकडच्या जमिनीवर मी माझी नजर टाकतो तेव्हा दोन्ही किनाऱ्यांमध्ये मला फरक आढळत नाही.'' महाराजांच्या दरबारात अझिझुद्दिन व भाई रामसिंह ही दोनच माणसे अशी होती की ज्यांना महाराजांची संकेत भाषा अवगत होती.

अझिझुद्दिनच्या बोलण्याप्रमाणे त्याच्या लिहिण्यातही सफाई होती. त्याची साक्ष महाराजांच्या दरबारातील कागदपत्र देतात. त्याच्या लेखणीतून उतरलेले दरबारी कागदपत्र हे उत्कृष्ट दरबारी लेखनाचे आदर्श नमुनेच आहेत. अझिझुद्दिन स्वतः एक पंडित होता. विद्यार्थ्यांना पर्शियन व अरेबिक शिकविण्यासाठी त्याने स्वखर्चाने एक शिक्षणसंस्था चालविली होती. तसेच तो कवीही होता. आपले सूफी विचार त्याने सहजसुंदर कवनांतून व्यक्त केले आहेत. तो स्वतःला 'फकीर' म्हणवून घेत असे व स्वतःचा वेषही त्याने तसाच ठेविला होता. आपले शत्रू आणि प्रतिस्पर्धी यांच्या कट-कारस्थानांविरुद्ध ते कदाचित एक कवचही असावे. 'फकीर' ही उपाधी त्याला महाराजांनी वंशपरंपरागत चालावी या इच्छेने दिली होती. व त्या देणगीबरोबर त्यांनी त्याला गेरू रंगाच्या दोन शालीही दिल्या होत्या.

अझिझुद्दिनची प्रशंसा लेपेल ग्रिफिन 'कार्यक्षम व प्रामाणिक' ह्या विशेषणांनी करतो. हा विश्वासू सहकारी महाराजांची मनोगते ओळखण्यात तरबेज झाला होता. व महाराजांना जीभेचा अर्धांगवायू होऊन त्यांच्या वाचेवर अर्धवट परिणाम झाल्यामुळे अशा गोष्टीची त्यांना गरजही होती. महाराजांच्या आजारीपणात तो सतत त्यांच्याजवळ असे. ''रणजितसिंह त्याचे पिताजी असते तरीही त्याने केली त्यापेक्षा जास्त सेवा व कळकळ त्यांना लाभली नसती,'' असे मॅक्ग्रेगॉरने

त्याच्याबद्दल लिहिले आहे. शीखांशी झालेल्या पहिल्या लढाईत ब्रिटिशांनी विजय मिळविला त्याच्या आधीच, 1845 च्या डिसेंबरमध्ये अझिझुद्दिनचे देहावसान झाले.

नुरुद्दिन व इमामुद्दिन

फकीर अझिझुद्दिन याने आपले धाकटे भाऊ नूर व इमाम ह्यांना महाराजांच्या सेवेत प्रविष्ट केले होते. कालान्तराने ते दोघेही दरबारात चांगले महत्त्व पावले. त्यांतही विशेषतः नुरुद्दिनची ख्याती त्याच्या सचोटीबद्दल व धार्मिकतेबद्दल विशेष होती. महाराजांना त्याच्याबद्दल फार आदर वाटे. काही काळ तो त्यांचा प्रमुख वैद्यकीय अधिकारी होता. नंतर कारभारी मंडळाचा सभासद बनला. महाराज दलीपसिंह सज्ञान होईपर्यंत त्याने कारभार पाहिला. नुरुद्दिनकडे सार्वजनिक कामकाज (राजवाडा व उद्याने), युद्धसाहित्याचे कोठार आणि प्रजाजनांना दया-मदत हा विभाग एवढी खाती होती. खजिन्याच्या किल्ल्या ज्या तिघांजवळ असत त्यांच्यापैकी नुरुद्दिन एक होता. 'हकीम नुरुद्दिन' व 'खलिफा नुरुद्दिन' ह्या दोन्ही नावांनी तो ओळखला जात असे. नुरुद्दिनचा पणतू बहिदुद्दिन याने असे म्हटले आहे की महाराजांच्या न्यायनिर्णयाचे काम वस्तुतः आपला पणजाच करीत असे.

इमामुद्दिन गोविंदगड किल्ल्याचा सुभेदार होता. हा किल्ला अमृतसरच्या परिसरातच आहे. ह्या दोघा मुसलमानांच्या हाती इतकी सत्ता होती की त्यांनी मनात आणिले असते तर ते स्वार्थासाठी स्वतःचा वेगळा पक्ष वा सवता सुभा स्थापन करू शकले असते. पण मिळालेल्या अधिकाराचा दुरुपयोग त्यांनी जसा कधीच केला नाही; त्याचप्रमाणे महाराज रणजितसिंहांनी त्यांच्यावर टाकलेल्या विश्वासाचा घात करण्याचेही त्यांनी मनात कधी आणले नाही. महाराजांच्या संपूर्ण कारकीर्दीत ते त्यांच्याशी एकनिष्ठ राहिले.

राजा दीनानाथ

दीनानाथ हा काश्मीरचा रहिवासी. 1815 च्या सुमारास तो महाराजांच्या दरबारात हिशेब खात्यात नोकरीस लागला. मुख्य हिशेबनीस गंगाराम याला तो प्रथम साहाय्य करीत असे. पुढे गंगाराम वारल्यावर तो त्याच्या जागी काम करू लागला. आणि भवानीदासांच्या मृत्यूनंतर तो अर्थखात्याचा प्रमुख बनला. महाराजांच्या दरबारातील अनेक स्थित्यंतरे त्याने पाहिली. आणि त्याप्रमाणे बदलत्या परिस्थितीला तो यशस्वीपणे तोंड देत गेला. यामुळे त्याच्या अधिकाराची व वित्ताचीही वाढ होत गेली. त्याला दूरदृष्टी होती. तसाच तो चतुरही होता. पण देशाभिमानापेक्षा त्याला

स्वार्थ अधिक प्रिय होता. दीनानाथ ब्रिटिशांचा द्वेष्टा होता. आणि त्यामुळे कदाचित ग्रिफिनचे त्याच्याबद्दलचे मत तसे झाले असणे शक्य आहे. कसेही असले तरी दीनानाथ धैर्यशील व कष्टाळूही होता. स्थानिक जीवनाची त्याला भरपूर माहिती होती. तो सुसंस्कृत, विनम्र व समजदार होता. युरोपिअनांशी बोलताना तो आपली मते व विचार धीटपणे व मनमोकळेपणे मांडीत असे. 1834 मध्ये त्याला महाराजांनी अर्थमंत्री केले. ते पद त्याला दिले गेले नसते तरीही तो महाराजांचा एक अत्यंत विश्वासू सल्लागार होता यात संदेह नाही. ब्रिटिशांनी लाहोर घेतल्यावरही तो पंजाबच्या सेवेत होता. दरबारचे हिशेब लिहिण्यात त्याचा हातखंडा असे. महाराजांनी त्याला दिवाण केल्यावर 'राजा' हा किताब दिला. ज्या महसूल पद्धतीमुळे महाराजांना भरपूर व नियमित उत्पन्न मिळत राहिले ती पद्धती तयार व लागू करण्याची कामगिरी दीनानाथनेच पार पाडली होती.

जमादार खुशालसिंह

महाराजांच्या खासगीकडे मीरतचा एक ब्राह्मण सेवेसाठी होता. वयाच्या सतराव्या वर्षी तो लाहोरला आला. तेव्हा घरातला एक साधा चाकर म्हणून प्रथम नोकरीस लागला. पुढे महिना पाच रुपयांवर त्याची नेमणूक एक साधा शिपाई म्हणून करण्यात आली. महाराजांच्या खासगीकडे कामास असलेल्या नोकरांकडून त्याने त्यांचा वैयक्तिक रक्षक म्हणून नियुक्ती करून घेतली. दिसायला तो देखणा होता. त्याच्या वृत्तीत लष्करी बाणा आढळे. आणि त्याच्या अंगी चापल्यही होते. या गुणांवर त्याने महाराजांचे लक्ष वेधून घेतले. असे सांगतात की एका रात्री वेषांतर करून महाराज बाहेर पडले. आणि परत आले तेव्हा खुशालचंदाने त्यांना रोखून पाहाऱ्यात थांबविले. त्याची ही कर्तव्यतत्परता पाहून महाराजांनी त्याला स्वतःच्या दिमतीस निवडून घेतले. पुढे लवकरच त्याला जमादाराच्या जागेवर बढती मिळाली. व त्यानंतर खुद्द राजवाड्यातील शरीररक्षकांमध्ये देवडीदाराची कामगिरी त्याच्याकडे सोपविण्यात आली. ती फार महत्त्वाची जागा होती. कारण महाराजांची भेट घ्यावयाची असल्यास कोणालाही परवाना दिला जाई तो देवडीदाराच्याच मार्फत. कोणताही समारंभ असो, मिरवणूक काढावयाची असो अथवा दरबार भरावयाचा असो सर्व व्यवस्था व नियंत्रण त्याच्याचकडे असे. यामुळे देवडीदाराला खूप महत्त्व व त्याचबरोबर प्राप्तीही होत असे. काही वर्षांनी त्याने 'पहोला' घेतल्यावर त्याचे नाव 'खुशालसिंह' ठेवण्यात आले. पुढे त्याचे महत्त्व आणखीही वाढले. त्याच्याकडे लष्करी कामगिरी सोपविण्यात येऊ लागली. (1832 मध्ये त्याला काश्मीरचे

गव्हर्नर करण्यात आले होते. पण त्याने लोकांवर इतका जुलूम सुरू केला की महाराजांना त्याच्या नेमणुकीचा पश्चात्ताप वाटला.) खुशालसिंहाच्या बोलण्याला मगरूरीचा दर्प येऊ लागला. आणि मानसिक त्रस्ततेमुळे तो शीघ्रकोपी बनला. त्यामुळे दरबारात अधूनमधून अप्रिय प्रसंग घडून येऊ लागले. अखेर त्याला त्याच्या जागेवरून काढून टाकण्यात आले. आणि त्याच्या जागेवर ध्यानसिंग डोग्राची नेमणूक करण्यात आली. खुशालसिंहाचा भाऊ भाईरामसिंह व पुतण्या तेजसिंह यांनी पुढे शीख सैन्यात चांगले नाव कमाविले.

जम्मू बंधू

खुशालसिंहाच्या अधिकाराखालील खासगी खात्याकडे ध्यानसिंग आल्यापासून तेथे एक ठळक बदल घडून येऊ लागलेला दिसला. महाराजांच्या दरबारात व खासगीकडे डोग्रा कुटुंबियांचा भरणा होऊ लागला. नव्या देवडीदाराने आपले आणखी दोन भाऊ गुलाबसिंह व सुचेतसिंह यांना तेथील नोकऱ्यात लावून घेतले. ध्यानसिंह विनयशील आणि प्रसन्न व्यक्तित्वाचा माणूस होता. व सर्वांत थोरला गुलाबसिंह चांगल्या अर्थाने गोडबोले होता. तर सर्वांत धाकटा सुचेतसिंह नम्र आणि देखणा होता. हे तिघेही जोरावरसिंहाचे नातू. गुलाबसिंह लवकरच घोडदळाचा प्रमुख झाला. ह्या सगळ्याच भावांचा उत्कर्ष भराभर झाला. कारण ते सगळेजण तरबेज दरबारी होते. इतकेच नव्हे तर मोठ्या आणि जबाबदारीच्या कामात ते एकमेकांना साहाय्य करीत असत. त्यांच्यापैकी प्रत्येकजण पुढे राजा झाला. गुलाबसिंह जम्मूचा, ध्यानसिंह भिंबारचा आणि सुचेतसिंह रामनगरचा राजा झाला.

गुलाबसिंह बहुधा जम्मूलाच असे. बाकीचे दोघे मात्र पुढे लाहोरला गेले. त्यातही ध्यानसिंहाने आपली प्रगती चटकन करून घेतली. खासगीकडील एका साध्या सेवकापासून मुख्यमंत्रीपदापर्यंत तो चढत गेला. एवढेच नव्हे तर 'राजा-इ-राजगण' असा किताब त्याला देण्यात आला. महाराजांशी कचेरीच्या कामात त्याला जी सल्लामसलत करावी लागत असे तिच्यासाठी आधी स्वतःच्या घरीच तो छोटी बैठक भरवीत असे असे सांगतात. त्याचे देखणेपण, वागणुकीतील टापटीप व पद्धतशीरपणा वगैरे गुणांमुळे ऑस्बर्न भारला गेला होता. आपल्या धन्याचे चांगले मत त्याने संपादन केले होते. अंगची हुषारी आणि बुद्धी यांच्या बळावर त्याचे वजन शीख समाजावरही पडले होते असे ऑस्बर्नने म्हटले आहे. ध्यानसिंहाने धनसंचयही चांगला केला होता. आपल्या जहागिरीतील लोकांशी तो न्यायाने आणि समजदारपणे वागे. आपल्या धन्याच्या मर्जीस उतरून आवडता बनलेला, अधिकारावर असता

ज्याच्या अधिकारापेक्षा गुणाची चाह जास्त झाली असा; आणि सर्वांवर वजन व छाप टाकणारा ध्यानसिंह हा सहसा अन्यत्र न आढळणारा वैशिष्ट्यपूर्ण पुरुष होऊन गेला असे त्याच्याबद्दलचे आपले मत ऑसूबर्नने व्यक्त केले आहे. पण त्याच्या मनात व वृत्तीतही ब्रिटिशांबद्दल थंडपणा, अनुत्सुकता आणि स्वल्प वैरभाव होता हेही ऑसूबर्नच्या लक्षात आल्यावाचून राहिले नव्हते.

अधिकारप्राप्तीत ध्यानसिंहाचा जो उत्कर्ष झाला त्यात त्याचा मुलगा हिरासिंह याच्याबद्दल महाराजांना वाटणारे प्रेम हेही एक कारण होते. हिरासिंह देखणा होता. आपल्या बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर अल्पवयातच त्याने प्रौढपणीचे गुण अंगी बाणविले होते. त्यामुळे त्याला दरबारात त्याच्या ज्येष्ठ सहकाऱ्यापेक्षा जास्त स्वातंत्र्य मिळाले होते. ध्यानसिंह मुलकी कारभारात निष्णात होता. सुचेतसिंह लष्करी कामगिरीत वाकबगार होता आणि गुलाबसिंहाच्या अंगी उभयतांचे गुण एकत्रित झाले होते. ह्या त्रिकूटाला महाराजांच्या उत्तर जीवनात फार महत्त्व प्राप्त झाले होते. त्यांच्या राजवटीच्या अखेरच्या दोन दशकांत अधिकारपदांचे ते महत्त्व त्या तिघांनी आपल्या अंगच्या विविध गुणांनी व पात्रतेने कमाविले होते असे एका इतिहासकाराचे मत आहे. ध्यानसिंह वारल्यावर लाहोरच्या दरबारात गुलाबसिंह सर्वश्रेष्ठ अधिकारी झाला. पुढे तो ब्रिटिशांच्याही सेवेत होता. ब्रिटिशांनी त्याला जम्मू व काश्मीरचे राजपद दिले. 1947 मध्ये ज्या महाराज हरिसिंहांनी राज्यत्याग केला ते प्रतापसिंहाचे-गुलाबसिंहाच्या पुत्राचे दत्तक पुत्र होते.

दिवाण मोहकमचंद

आजूबाजूचे प्रदेश व राज्ये जिंकण्यात महाराज रणजितसिंहांना ज्या शूर सेनानींचे साहाय्य झाले त्यांच्यात मोहकमचंदाचा उल्लेख कदाचित प्रथम करावा लागेल. भांगी संघटनेतील एका व्यापाऱ्याचा हा मुलगा. मुनशी म्हणून त्याने आपल्या जीवनास प्रारंभ केला. त्याच्या अंगचे गुण व पात्रता हेरून महाराजांनी अनेक मोहिमांत त्याच्यावर जबाबदारी सोपविली. सिआलकोट जिंकणे, डोंगरी राजांना शरण आणणे, आणि पठारी मुलखातील कित्येक लढाया व सीस-सतलज स्वाऱ्या यांच्यामध्ये विजय मिळविणे ह्या गोष्टींना मोहकमचंदाचेच शौर्य व सेनापतीतव प्रामुख्याने कारणीभूत होते. त्यातही शाह सूझाला महाराजांच्या पंजाखाली आणणे ही त्याची विशेष कामगिरी होय. तो एक यशस्वी लढवय्या वीर तर होताच पण त्याचबरोबर एक कार्यक्षम प्रशासकही होता. याचे उदाहरण म्हणजे जालंदर दोआबातील त्याचा कारभार. लोकांना कसलाही उपसर्ग पोहचू न देता, अथवा

जुलूम न करता तो दरबारसाठी करवसुली कौशल्याने करी. मि. वेड याने असे म्हटले आहे की जिंकलेल्या प्रदेशावर महाराजांची सत्ता स्थिर करणे ही मोहकमचंदाने, महाराजांच्या इतर अधिकाऱ्यांपेक्षा सर्वांत आधी बजाविलेली आणखी एक विशेष कामगिरी होय. 1814 मध्ये फिलौर येथे तो मरण पावला. त्याच्या मृत्यूने महाराजांना फार दुःख झाले. संपूर्ण लष्करी व राजशाही इतमामाने त्याचा अंत्यसंस्कार करण्यात आला. आपला मुलगा मोतीराम व दोन नातू-रूपाराम व रामदयाळ असे तीन राजनिष्ठ सेवक स्वतःच्या पश्चात त्याने लाहोर दरबारला दिले. ह्या दोन्ही नातवांनी पुढे उच्च लष्करी अधिकारी म्हणून कामगिरी बजाविली.

काही वस्तुनिष्ठ निरीक्षकांच्या मते दिवाण मोहकमचंद हाच महाराजांच्या सर्व सेनापतींमध्ये श्रेष्ठ होता. 1806 पासून 1814 पर्यंत तो शीख सैन्याचा सरसेनापती होता. महाराजांच्या प्रत्येक दिग्विजयाला त्याचा हातभार लागला होता. रामदयाळही तसाच कुशल सेनानी होता. पण आपल्या आजोबांच्या मागून अवघ्या चार वर्षांनीच त्याचे देहावसान झाले.

मिश्र दिवाणचंद

मोहकमचंदाप्रमाणे मिश्र दिवाणचंद क्षात्रवंशीय नव्हता. कारण जन्माने तो ब्राह्मण होता. म्हणून त्याला वाडवडिलांकडून त्याला लष्करी वारसा मिळालेला नव्हता. पण तरीही तो एक यशस्वी सेनापती होऊन गेला. महाराजांनी त्याला पुढे आणले. 1814 ते 1825 पर्यंत त्याने अत्यंत निष्ठेने महारांजाची सेवा केली. व त्या कालावधीतील विजय प्रामुख्याने त्याच्यामुळेच मिळाले. दिवाणचंदाने 1818 मध्ये मुल्तानची व 1819 मध्ये काश्मीरची लढाई फत्ते केली. त्याच्या ह्या विजयांबद्दल महाराजांनी त्याला अनुक्रमे 'जाफर जंग बहादुर' 'व फत्ते जंग' हे किताब बहाल केले. सदा कौरने महाराजांशी वितुष्ट सुरू केले तेव्हा तिची मालमत्ता जप्त करण्याची कामगिरी महाराजांनी दिवाणचंदाकडेच सोपविली होती. नौशेऱ्याच्या लढाईतही त्याचा घनिष्ठ संबंध आला होता.

दिवाणचंद 1825 मध्ये पटकीने वारला. त्याच्या मृत्यूमुळे लाहोर दरबारची फार मोठी हानी झाली. एक शूर सेनानी, एक भला जोडीदार आणि उदार वृत्तीचा माणूस अशी त्याची त्रिविध योग्यता होती. त्याच्या मृत्यूमुळे महाराजांना फार दुःख झाले. आपल्या सेवेला दिवाणचंदापेक्षा अधिक चांगला दुसरा कोणीही लाभला नव्हता असे उद्‌गार महाराजांनी दिवाणचंदाच्या मृत्यूनंतर काढले.

हरिसिंह नलवा

ज्या अनेक सेनानींनी महाराज रणजितसिंहांच्या कारकीर्दीत लष्करी सेवा बजाविली त्यांच्यापैकी जनमनाच्या स्मृतीत सर्वांत मोठे स्थान कोणाला असेल तर ते हरिसिंह नलवा याला. त्याला 'नलवा' नाव पडण्याचे कारण असे की त्याने एका तडाख्यात वाघाचे थोबाड फोडले होते. त्याच्या अंगी शक्तीबरोबर युक्तीही होती व त्याच्या काळात त्याचे नाव सर्वांमुखी झाले होते. महाराजांना त्याच्याद्दल प्रेम व आदरही वाटे. कामगिरी विशेष अवघड वाटली तर महाराज ती हरिसिंह यांच्यावरच सोपवीत. नबाब मुझफरखानाशी झालेल्या लढाईत दिवाणचंदाबरोबर हरिसिंहही होता. 1819 मधील काश्मीरच्या स्वारीतही त्याच्याकडे एका तुकडीचे नेतृत्व होते. काश्मीर हाती आल्यावर त्याला काश्मीरचे गव्हर्नर नेमण्यात आले. पण त्याच्या यशाबद्दल दोन अगदी उलटसुलट मते ऐकू येतात. लेपेल ग्रिफिनच्या मते काश्मीरमध्ये हरिसिंह इतका अप्रिय झाला की महाराजांना त्याला परत बोलवावे लागले. याच्या उलट, महाराजांच्या कारकीर्दीत काश्मीरचा सर्वांत चांगला गव्हर्नर जर कोणता होऊन गेला असेल तर तो हरिसिंहच असेही दुसरे मत प्रचलित आहे. तथापि तो मुख्यत्वेकरून ओळखला जातो तो हजारा व काश्मीर येथील महाराजांचा प्रतिनिधी म्हणून. चोर-दरोडेखोरांचा बंदोबस्त करून त्याने काबूलची राजवट आणि अफगाण टोळ्या यांना, स्वतःची धडाडी आणि सैन्याच्या हालचाली यांच्या साहाय्याने काबूत ठेविले होते. सरहद्दीवरील त्याची कामगिरी एवढी चोख होती की राज्य सांभाळण्यासाठी त्याच्यासारख्या कर्तबगार साहाय्यकाची गरज असते असे उद्‌गार महाराजांनी काढले होते. 1837 मध्ये जामरूदच्या लढाईत अनेक जखमा होऊन अखेर त्यातच त्याचा अंत झाला. जखमी अवस्थेत जेव्हा त्याला रणक्षेत्रावरून हलविण्यात आले तेव्हा महाराजांकडून आणखी सैन्य येऊन तेथे लढू लागल्याशिवाय ती बातमी बाहेर फुटू देऊ नये अशी विनंती त्याने आपल्या सहकाऱ्यांना केली होती. शेवटी त्याच्या मृत्यूची बातमी महाराजांपर्यंत पोहचली. तेव्हा त्यांचे डोळे तत्काळ पाणावले. हरिसिंह नलवा हा एक 'निमक हलाल'—एकनिष्ठ व विश्वासू अनुयायी होता असे उद्‌गार महाराजांनी तेव्हा काढले.

हिरासिंह

हिरासिंह हा राजा ध्यानसिंहाचा मुलगा. त्याचा जन्म 1818 मध्ये झाला. बालवयातच त्याने महाराजांचे लक्ष आपल्याकडे आकृष्ट करून घेतले. तेव्हा त्याला दरबारात कामावर ठेवून घेण्यात आले. पुढे त्याने महाराजांची सेवा त्यांच्या संबंध

हयातीत केली. हिरासिंह दिसण्यात मोठा सुंदर व तरतरीत होता. कोणावरही त्याची छाप सहज पडत असे. किशोरवयातच तो घोड्यावर स्वारी घालण्यात, तरवार गाजविण्यात व भाला—बरचीच्या निशाणबाजीत तरबेज झाला. चापल्य आणि चोख कर्तव्यपालन या गुणांमुळे तो महाराजांचा आवडता झाला. महाराजांच्या स्वतःच्या मुलांच्या बाबतीतला विरोधाभासही त्या गोष्टीला कारणीभूत ठरला असावा. कारण खरकसिंह दिसण्यात अगदीच बेतास बात असाच होता. त्याशिवाय तो बुद्धीनेही मंद होता. त्याची कोणाशी चांगली मैत्री जमत नसे. त्याचा दुसरा मुलगा शेरसिंह. तो दिसायला बरा होता. पण आपली आजी सदा कौर हिच्या बडदास्तीत नेहमी दूर, बटाल्यास असे.

हिरासिंह महाराजांच्या सेवेत त्यांच्या मागे सावलीसारखा असे. दरबारात त्याला दोन्ही राजपुत्रांच्या बरोबरीची जागा बसण्यास देण्यात आलेली होती. राजपुत्र मात्र बहुधा गैरहजरच असत. दरबारात ध्यानसिंह महाराजांच्या खुर्चीमागे उभा असे; तर त्याचा मुलगा हिरासिंह त्यांच्या बाजूला असे. आणि आपल्या हुषार, बालसुलभ बोलण्याने तो महाराजांना सुखवी. तो दहा वर्षांचा झाल्यावर महाराजांनी त्याला 'राजा' हा किताब व थोडी जहागिरी दिली. पुढे त्याच्या हाताखाली काही सैनिक देऊन त्याला त्या तुकडीचे प्रमुख करण्यात आले. वयात आलेला हिरासिंह भारी उमदा दिसे. 1829 मध्ये महाराजांनी त्याचे लग्न लावून दिले.

ऑस्बर्न 1838 मध्ये हिरासिंहाला भेटला तेव्हा तो जवळजवळ 20 वर्षांचा होता. इतर कोणापेक्षाही, खुद्द त्याचा बाप ध्यानसिंह याच्यापेक्षाही हिरासिंह महाराजांचा आवडता व खास मर्जीतला होता ही गोष्ट ऑस्बर्नला तेव्हा कळून आली. ''महाराजांवर त्याचा असाधारण प्रभाव पडला होता. पण ज्या तऱ्हेने तो पडलेला होता तिच्यामुळे हिरासिंहाचे नाव इतर देशांत कुप्रसिद्ध झाले असते. तथापि येथे मात्र त्याबद्दल त्याला सर्वत्र सन्मान प्राप्त झाला होता!'' असे त्याच्याबद्दल ऑस्बर्नने म्हटले आहे. कारण ऑस्बर्नसारख्या शिपाई-मुत्सद्याच्या मते हिरासिंहाचा देखणेपणा आणि त्याच्या वागण्याची तऱ्हा बायकी होती. त्याच्या अंगावर कमरेपासून वरती हिऱ्यामोत्यांचे दागदागिने घालण्यात येत. तथापि हिरासिंह इंग्रजी शिकत होता. त्याचा सुस्वभाव शांत होता, वर्तणूक सभ्यतेची असे. ह्या गोष्टी पाहून ''महाराजांच्या दरबारातील एक अत्यंत लोकप्रिय व गोड, भली व्यक्ती,'' असे त्याचे वर्णन ऑस्बर्नने केले आहे.

महाराजांनी हिरासिंहाला खास स्वातंत्र्य दिले होते. विचारल्याशिवाय महाराजांशी आपणहून आधी बोलण्याची मुभा दरबारात फक्त त्याला एकट्यालाच होती. आणि

महाराजांशी मध्येच बोलून त्यांना अडविणे, अथवा त्यांना विरोध करणे यालाही तो मागेपुढे पाहत नसे. काश्मीरहून आलेली खंडणी व नजराणा एकदा एका खोलीत मांडून ठेवण्यात आला होता. त्यांत रोकड, काश्मीरी शाली, निवडक शस्त्रे व उंची जडजवाहीर होते. ते पाहून हिरासिंह पुटपुटला, "महाराजांना ह्या सगळ्या गोष्टीची काही गरज नाही. तेव्हा त्यांतल्या मला काही घेता येतील." आणि रणजितसिंहांनी ते लगेच मान्य केले. 1843 मध्ये हिरासिंहाला महाराज नौनिहालसिंह यांचे मुख्य मंत्री नेमण्यात आले. पण अल्पावधीतच त्याला मृत्यूने गाठले. 1844 मध्ये आपल्या बापाप्रमाणे तो खालसा शिपाईगिरीला बळी पडला.

अकाली फुलासिंह

फुलासिंह अकालीला महाराजांच्या दरबाऱ्यापैकी एक गणणे हा विरोधाभास ठरेल. तथापि त्याला दरबारात महत्त्व होते आणि निहांगांचा एक पुढारी म्हणून त्याचे वजनही होते. यात शंका नाही. महाराज रणजितसिंहांनी ब्रिटिशांच्या मैत्रीसाठी स्वतःला स्वस्त करून घेऊ नये; व आपल्या स्वातंत्र्याची तडजोडही त्यांच्याशी करू नये अशी निहांगांची ठाम भूमिका होती.

फुलासिंह जसा शूर होता तसाच तो अगदी लहरी व कडवाही होता. 25 फेब्रुवारी 1809 रोजी अमृतसर येथे मेटकाफच्या मुसलमान शरीररक्षकाशी फुलासिंह व त्याचे अनुयायी यांची चकमक झाली. मोहरम व होळी त्यावेळी एकाच दिवशी आली होती. ब्रिटिशांनी आवळा देऊन महाराजांकडून कोहळा काढला हे त्याला समजले तेव्हा रूपार येथे आपल्या एका निहांग अनुयायाला त्याने महाराजांच्या जीवावर घालण्यासही कमी केले नाही! तथापि निहांगांचा राग येऊनही महाराज शांत राहिले व धर्मांध मुसलमान बंडखोरांच्या विरुद्ध त्यांनी कुशलतेने निहांगांचा उपयोग केला.

फुलासिंहाच्या अंगी परस्परविरोधी गुणांचे विचित्र मिश्रण झालेले होते. एकीकडे अगदी विनम्र, धार्मिक आणि गुरुद्वारातील हलकेसलके काम करण्यासही तयार असणारा फुलासिंह, प्रसंगी हुकुमाची अवज्ञा करण्यासही मागेपुढे पाहत नसे. त्याच्या प्रवृत्तीचा निदर्शक म्हणून एक प्रसंगाचा उल्लेख करता येईल. महाराज एकदा लाहोर शहरातून हत्तीवरून फिरत असता आपल्या सज्जातून फुलासिंहाने त्यांना हटकून विचारले, "अरे एकाक्षा, तुला हा रेडा कोणी दिला?" त्यावर आपला तोल ढळू न देता महाराजांनी उत्तर दिले, "ही तर आपलीच देणगी आहे महाराज!" ह्या उत्तराने महाराजांना कदाचित असे सूचित करावयाचे असावे की

साधारणपणे खालसांच्या साहाय्याने, पण विशेषतः अकालींच्या आधाराने ते आपली सत्ता टिकवून होते.

इतर दुय्यम व्यक्ती

महाराजांच्या दरबारात ज्यांचे कमीअधिक वजन व प्रभाव होता अशा आणखी कितीतरी व्यक्ती होत्या. त्यांतील काही मुलकी, तर काही लष्करी हुद्द्यांवर होत्या. मुझफ्फरखान लढाईत कामास आल्यावर सर्फराज व झुल्फिकार या त्याच्या दोन मुलांना महाराजांनी उदारपणे वागविले. तिवानांचा प्रमुख खुदा यारखान यालाही त्यांनी तशीच वागणूक दिली. त्याचे वंशज पुढे ब्रिटिश आमदानीत महत्पदांवर चढले. शीख गुरू रामसिंह व गुरुमुखसिंह यांनाही त्यांनी अंतर दिले नाही. रामसिंह तर स्वाऱ्यांच्या वेळी महाराजांच्या बरोबर असत. तसेच अतारीवाले सरदार, त्यांच्यापैकी काही जणांकडे 1848 मध्ये ब्रिटिशांच्या विरोधकांचे नेतृत्व होते. ट्रिब्यून वृत्तपत्राचे संस्थापक दयाळसिंह यांचे वडील, सरदार लहानसिंह मजिथिआ हे तर केवळ धाडसी लढवय्येच होते असे नव्हे तर एक मोठे संशोधक, तोफांचे ओतकाम करणारे तज्ज्ञ आणि गणित व खगोलशास्त्रातील पंडित होते. ऑसूबर्न तर सांगतो की ते जस्ताचे बॉम्बगोळे ओतण्यातही निष्णात होते. त्यांचा दुसरा विशेष म्हणजे प्रामाणिकपणा. त्या काळी भोवताली भ्रष्टाचार माजला असूनही ते त्यापासून पूर्णतः अलिप्त राहिले.

आठ

महाराजांची सेना व युरोपियन अधिकारी

महाराज रणजितसिंह हे स्वतः एक कुशल सेनानी होते. पण त्याहीपेक्षा ते एक उत्कृष्ट संघटक होते. त्यांनी जे अनेक लष्करी विजय संपादन केले त्याचे एक कारण म्हणजे त्यांनी तयार केलेली सुसज्ज व शिस्तबद्ध अशी शीख सेना. ज्या एका बाबतीत सुधारणा आवश्यक असल्याचे त्यांना पटले होते ती म्हणजे घोडेस्वारापेक्षा पायदळाला जास्त महत्त्व असते ही होय. ब्रिटिश लष्कराचे अवलोकन करून ती गोष्ट त्यांना पक्की पटलीही होती. त्यामुळे त्यांनी आपल्या सैन्यात घोडदळाच्या तुलनेने पायदळाला अग्रहक्काचे स्थान दिले आणि त्या कामी त्यांनी युरोपीय लष्करी अधिकाऱ्यांचेही साहाय्य घेतले.

त्या काळात सेनेसाठी जवानांची भरती करणे ही गोष्ट मुळीच अवघड नव्हती. शिवाय महाराजांचा नावलौकिकही त्यासाठी उपकारक ठरे. आपल्या सैन्यासाठी दणकट व उमदे तरुण भरती करण्यावर महाराजांचा कटाक्ष असे. साहजिकच जसजसा काळ गेला त्याप्रमाणे त्यांच्या सेनेचे संख्याबळ वाढत गेले. प्रारंभी, म्हणजे 1811 च्या सुमारास ही संख्या केवळ 4,000 होती. ती त्यांच्या कारकीर्दीच्या अखेरीस 38,000 पर्यंत वाढली. तिच्यात 29,500 पायदळ, 4,000 घोडेस्वार आणि 4,500 सैनिक तोफखाना विभागात होते. आणि एवढ्या सैन्यावर महाराजांचा मासिक खर्च सुमारे 3,75,000 लाख रुपये होता. मासिक पगाराची पद्धती त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीकडून उचलली होती. तथापि प्रत्यक्षात पगार काही महिने थकत असे. कार्यक्षम असेपर्यंत जवानांना सैन्यात ठेविले जाई. त्या काळात सेवानिवृत्ती वेतन वगैरे काही नसे. पण सेवानिवृत्त होणाऱ्यांच्या मुलांना व नजीकच्या नातेवाइकांना सैन्यात घेतले जाई. लढाईत जे कामास येत अथवा जखमी होत त्यांना 'धर्मार्थ' म्हणून काही पेन्शन दिले जाई.

कायमच्या स्थायी सैन्याशिवाय, प्रासंगिक स्वरूपातही घोडदळ असे. (त्याला 'घोडचढ़िया' म्हणत) ह्या स्वारांना स्वतःवरील आपत्ती, संकटे यांचे निवारण स्वतःच

करावे लागे. अशा घोडदळाचे सोयीस्कर विभाग व उपविभागही केलेले असत. घोडेस्वाराचा घोडा कितपत चांगल्या स्थितीत आहे यावरून त्याचा पगार व भत्ते ठरविले जात. तथापि अशा वेळी त्यांच्याकडे दुय्यम महत्त्वाची कामे सोपविण्यात येत. पायदळातील जवानांचा मासिक पगार रु. 7 अथवा त्यापेक्षा थोडा जास्त असे. ईस्ट इंडिया कंपनीतील पगाराच्या मानाने हा आकडा कमी नव्हता.

पण हा पगार जवानांना नियमितपणे मिळत नसे. पगार बरेच दिवस न मिळाल्याने गुरखा पलटणीचा असंतोष एकदा इतका उफाळला होता की त्या क्रोधापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी रणजितसिंहांना गोविंदगड किल्ल्याचा आश्रय घ्यावा लागला होता. सेनेची संख्या आणि जवानांचे पगार वाढलेले असल्यामुळे महाराजांच्या मृत्यूनंतर राज्याच्या तिजोरीवर ते एक भले मोठे ओझे ठरू लागले होते. सर लेपेल ग्रिफिन यांनी उल्लेखिल्याप्रमाणे 1839 मध्ये महाराजांच्या सशस्त्र दलांची संख्या 29,168 होती. त्यांच्याकडे 192 तोफा होत्या आणि त्या सर्वांसाठी त्यांना रु. 3,82,008 इतका मासिक खर्च येत असे. 1845 पर्यंत ह्या तिन्हींची वाढ अनुक्रमे 7,23,70,381 व 8,52,696 इतकी झाली होती.

युरोपियन अधिकारी

महाराजांच्या सेनेत युरोपियन अधिकारी किती होते याचा निश्चित अंदाज लागत नाही. ही संख्या किमान 20 व कमाल 42 असल्याचे कळते. व्हेन्टुर आणि अलार्ड हे त्यांच्यापैकी दोन प्रमुख अधिकारी होते एवढे मात्र निश्चित. आपल्या सेनेला युरोपियन लष्करी पद्धतीचे वळण लावावे अशी महाराज रणजितसिंहांची इच्छा होती. आणि त्यासाठी एकदा गुप्त वेषात ते लॉर्ड लेकच्या पलटणीची परेड पाहून आले होते. वरील दोन्ही अधिकाऱ्यांनी महाराजांच्या सेनेला युरोपियनांच्या सेनेची शिस्त, संचलन आदी लागू केले.

व्हेन्टुर आणि अलार्ड हे दोघेही फ्रेंच होते. 1822 च्या सुरुवातीस ते लाहोरला आले. रणजितसिंहांच्या सेनेत त्यांचा प्रवेश कसा झाला याची कथा मनोरंजक आहे. आपण लष्करी पेशाचे असल्याचे आणि नोकरीच्या शोधार्थ हिंडत नसल्याचे त्यांनी महाराजांना सांगितले. 'किस्मत' आपणांस जिकडे नेत आहे तिकडे आपण जात आहोत, असेही त्यांनी पहिल्या भेटीत सांगितले. आणि त्याप्रमाणे ते युरोप आणि आशियातून हिंडत हिंडत लाहोरला पोचले होते. महाराजांची विनंती मान्य करून त्यांच्या सेनेतील नवख्या जवानांना लष्करी प्रशिक्षण देण्याचे काम त्यांनी पत्करले.

पण कायम स्वरूपाच्या नोकरीसाठी प्रत्येकाने रोजी दहा सोन्याच्या मोहरांचा मोबदला मागितला. त्याशिवाय त्यांच्या घोड्यांची निगा व सरबराईसाठी नोकर मागितले. दोन महिने बारकाईने निरीक्षण केल्यावर, फसवेगिरी करणारे ते कोणी भोंदू नसून त्यांनी नेपोलिअनच्या सेनेत खरोखरीच काम केले होते याबद्दल महाराजांची खात्री पटली; आणि मग त्यांनी त्यांच्या अटी मान्य केल्या. अलार्डकडे घोडदळाचे आणि व्हेन्टुरकडे पायदळाचे प्रशिक्षण सोपविण्यात आले. अलार्डने ड्रॅगूनची तुकडी तयार केली व व्हेन्टुरने 'फौज खास' चा ताबा घेतला.

जीन फ्रँकोइस अलार्ड

त्या दोघा फ्रेंचांपैकी अलार्डने अधिक कळकळीने महाराजांची सेवा केली. त्याने त्यांचा चांगला मानसन्मानही राखला. रजेवर एकदा तो पॅरिसला गेला असता फ्रेंच राजा लुई फिलिप याला तो मुद्दाम भेटला आणि महाराजांच्या शुभेच्छा त्याने राजाला कळविल्या. राजाला त्याबद्दल फार संतोष वाटला आणि त्याने महाराजांना एक स्नेहदर्शक पत्र आणि काही शस्त्रेही पाठविली. अलार्डच्या ह्या वागणुकीमुळे महाराज त्याच्यावर खूष झाले आणि त्यांनी त्याला एक खास बक्षीस दिले. अलार्ड 1839 मध्ये हृदयविकाराने वारला. तेव्हा त्याचे शव दफनासाठी लाहोरला आणण्यात आले. अलार्डने एका काश्मीरी स्त्रीशी विवाह केला होता.

जीन बॅप्टिस्ट व्हेन्टुर

व्हेन्टुरच्या अंगी पुरेपूर कार्यक्षमता व ताकद होती. 'फौज खास' प्रमुख या नात्याने त्याने कित्येक मोहिमा, विशेषतः डोंगरी भागांतल्या, कमालीच्या कौशल्याने यशस्वी केल्या. त्याला काही काळ काझी आणि लाहोरचा गव्हर्नर नेमण्यात आले होते. त्याने लुधियाना येथील एका अमेरिकन स्त्रीशी लग्न केले. तेव्हा महाराजांनी त्याला भेट म्हणून खूपसा नजराणा दिला. आपल्या पत्नीशिवाय अनेक काश्मीरी व पंजाबी स्त्रिया ह्या सेनानीने ठेविल्या होत्या. पण पत्नीला आणि त्या सर्व स्त्रियांना सोडून तो पॅरिसला गेला.

ॲव्हिटॅबिले

पावलो डी ॲव्हिटॅबिले हा इटालिअन होता. महाराजांच्या नोकरीत असता तो बऱ्याच उच्च पदाला पोहोचला. त्याने आपली प्रगती साध्या शिपायापासून अंगच्या गुणांनी करून घेतली होती. मासिक पगार त्याला रू. 5000 होता. त्याशिवाय

महाराजांनी त्याला एक जहागिरीही दिली होती. तथापि पावलोच्या अभिरुची कनिष्ठ दर्जाच्या होत्या. प्रशासक म्हणून तो अतिशय निष्ठुर होता. पेशावरचा गव्हर्नर म्हणून त्याची नेमणूक झाल्यावर त्याने पठाण टोळीवाल्यांना अशा प्रकारे नमविले की अवघ्या सहा महिन्यात पेशावरमधून त्याने सर्व प्रकारच्या गुन्हेगारीचे उच्चाटन केले. त्याने गुंडांना फासावर लटकाविले आणि खोटे बोलणाऱ्यांच्या जिभा कापल्या.

हेन्री कोर्ट

हा फ्रेंच गृहस्थ पावलोबरोबर प्रवास करीत आला होता. व त्यानेही महाराजांकडे नोकरी मिळविली. पण हेन्री कोर्ट उच्च जातकुळीतला होता. त्याने उच्च शिक्षण घेतलेले होते. व त्याच्या अंगी सभ्यता, शिष्टाचार हे गुण मुरले होते. तथापि त्याची नेमणूक पावलोच्या अर्ध्या पगारावर झाली होती. तो जसा शूर शिपाई होता तसाच एक चांगला विद्वानही होता. तो रॉयल जिऑग्राफिकल सोसायटीचा सभासद होता. महाराजांकडील पुष्कळ तोफा ओतण्याची कामगिरी त्याने पार पाडली होती. पण आपल्या दोस्ताप्रमाणे त्यानेही भारतीय स्त्रियांचा जनानखाना बाळगला होता 1845 मध्ये तो पंजाब सोडून गेला तेव्हा त्याच्याजवळ भरपूर संपत्ती होती.

अलार्ड व व्हेन्टुर यांना नेमणुका देऊन नोकरीत घेण्यात आले होते; तरी त्यांच्याविषयीचा संशय व अविश्वासाच्या शंका नाहीशा झालेल्या नव्हत्या. महाराजांनी गुरखा पलटणीच्या प्रमुखाला ह्या फ्रेंचांना सलाम करण्याची आज्ञा दिली तेव्हा त्या गुरखा सेनापतीने महाराजांच्या आज्ञेचा अवमान केला. यावरून एतद्देशीयांचा स्वाभिमान व परक्यांबद्दलची शंका कळून येते. (गुरखा पलटणीचा गणवेष व्हेन्टुरने बनविला होता.) तसे म्हटल्यास खुद्द महाराजांच्या मनातही त्यांच्याविषयी संशय होता. ते ब्रिटिश हेर असावेत आणि ईस्ट इंडिया कंपनीशी कसलीही कुरापत निघाल्यास आपली सेवा, निष्ठा डावलून ते गोऱ्या रक्तालाच जागतील असे महाराजांना वाटे. पण कालांतराने त्यांच्या निष्ठेबद्दल महाराजांची खात्री पटली.

परंतु त्या फिरंग्यांना महाराजांनी दिलेल्या जहागिरींबद्दल मात्र शीख व पंजाबी सेनापतींना तीव्र नाखुषी वाटे. महाराजांना त्यांचे पंजाबीकरण करावयाचे होते. त्यामुळे त्यांनी पंजाबी स्त्रियांशी विवाहबद्ध होण्यासाठी, गोमांस भक्षण न करण्यासाठी व शीखांच्या पाच धार्मिक आज्ञा पाळण्यासाठी त्यांची मने वळविण्यात आली होती.

नऊ

नागरी प्रशासन

अधिकारप्राप्तीनंतर महाराज रणजितसिंह कित्येक वर्षे लढाया व राजनैतिक हालचाली वगैरेमुळे एकसारखे इतके कार्यरत राहिले की त्यांना आपल्या राज्यात नागरी व्यवस्था करण्यास फुरसतच मिळू शकली नाही. तथापि त्यांचे अर्थखाते त्यांच्या मोहिमांच्या खर्चासाठी लागणारा पैसा पुरवीत असे. कालांतराने अर्थखात्याचे अनेक विभाग ('सरिस्ते') झाले. ती प्रत्येक शाखा पैसे देण्याच्या हुकमाच्या कागदावर आपली वेगळी मोहर लावीत असे. अशापैकी काही शाखा, त्यांच्या प्रमुख अधिकाऱ्यांच्याच नावाने ओळखल्या जात. उदा.—'दफ्तर-इ-देवीदास' किंवा 'सरिस्ता-इ-भवानीदास' इ. प्रशासनातील विविध विभागांची कामे पाहणाऱ्या अशा सुमारे बारा शाखा कचेऱ्या त्या वेळी होत्या. कागदपत्रांवर प्रारंभी 'हिजरी' म्हणजे मुसलमान वर्षाचा अंक लिहिला जात असे. 1807 नंतर त्याऐवजी विक्रम संवत लिहिण्यात येऊ लागला.

एखाद्या कामासाठी पैसे देण्याचा हुकूम काढण्याची पद्धत फार दीर्घ व द्राविडी स्वरूपाची होती. महाराजांच्या सेवेत असलेल्या मुनशींना, पैसे देण्याबाबतचे हुकूम, कधी प्रत्यक्षात तेथेच; तर कधी दूताच्या हस्ते दिले जात. मुनशी त्याची नोंद लगेच करीत. महाराज पंजाबीत बोलत. आणि रक्कम पूर्ण द्यावयाची की तिला 'कसर' लावून (कपात करून) ती कमी द्यावयाची हे सांगत. त्यानंतर पैशाच्या बटवड्याचा हुकूम पर्शियनमध्ये तयार केला जाई व त्यात तो (हुकूम) कोणी व कोठे काढला, पैसे कोणाला द्यावयाचे, पैसे कोणामार्फत पाठविण्यात येत आहेत आणि महाराजांनी ज्या मुनशींना हुकूम दिला त्याचे नाव (वा नावे) व मोहरशिक्का इतका तपशील त्या 'परवान्यावर' असे.

याप्रमाणे परवाना तयार झाला म्हणजे तो महाराजांकडे त्यांच्या संमतीसाठी परत पाठविला जाई. महाराज निरक्षर होते. पण वाचून दाखविला जाणारा पर्शियनमधील मजकूर त्यांना समजत असे. आणि त्यानंतर एक पंजाबीतील व

दुसरी पर्शियनमधील अशा दोन मोहरा त्या कागदावर उठविल्या की त्याबाबत महाराजांचे अखेरचे शिक्कामोर्तब झाले असे समजण्यात येई. मग त्या परवान्याचा प्रवास निरनिराळ्या दफ्तरांतून सुरू होई; आणि प्रत्येक कचेरीत तो तपासण्यात येऊन प्रत्येकीची मोहर पुन्हा त्यावर लागे. 'नकल दफ्तरात' त्या हुकमाची नक्कल करून घेतली जाई व त्यावर तशी नोंदही केली जाई. शेवटी तो हुकूम तोशखान्यात पोहचे व नगद रक्कम दिली जाऊन तो तेथे दप्तरी दाखल केला जाई. पुढे ह्या मालिकेतील अनेक दफ्तरे त्या सूत्रातून गळून पडली. आणि महाराज रणजितसिंहांच्या राजवटीच्या अखेरीस पैशाच्या हुकमावर फक्त एकच मोहर उठविली जाऊ लागली.

आर्थिक प्रशासन

संपूर्ण सरकार 'महाराज' या व्यक्तीत केंद्रीभूत झालेले होते. त्यांना मदतनीस म्हणून मुख्यमंत्री, पराराष्ट्रमंत्री, अर्थमंत्री आणि विविध खाती सांभाळण्यासाठी इतर अनेक अधिकारी होते. रामानंद हा महाराजांचा पहिला हिशेबनीस. तो अमृतसरचा पेढीवाला होता. त्याला त्याच्या श्रमाची भरपाई म्हणून त्याच्या गावातली जकात वसुली आणि पिंड दादनखान येथील मीठाच्या खाणी यांचे हक्क देण्यात आले होते. 1808 मध्ये भवानीदासाची नेमणूक केल्यावर राज्याच्या खजिन्याचे कामकाज सुरळितपणे चालू झाले. ह्या खात्याचे कित्येक उपविभाग होते. शेतीचे उत्पन्न, नोंदणी शुल्क, जकाती व वाहतुकीचे कर आदींपासून मुलकी आवक जमा होई. निरनिराळ्या अधिकाऱ्यांनी पाठविलेले, उत्पन्न व खर्च यांचे तक्ते तपासण्याचे काम एका खात्याकडे होते. त्याचप्रमाणे महाराजांच्या खासगीकडील हिशेब ठेवण्याचे काम दुसऱ्या एका उपविभागाकडे होते.

पैसे देण्याची पद्धत निर्दोष होती. पण उत्पन्नाची नोंद मात्र तितकीशी विश्वासार्ह नसे. तपासणीच्या अभावी अफरातफरीला वाव राही. यामुळे भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांकडून महाराज मोठे शुल्क लागू करीत आणि ते न दिल्यास त्यांची संपत्ती जप्त करून सरकारजमा करण्यासही ते मागेपुढे पाहत नसत.

कर

शेतसाऱ्याचा कर महाराजांच्या राजवटीत जरा जास्त होता असे म्हटले पाहिजे. तो शेताच्या एकूण उत्पादनाच्या शेकडा 33 ते 40 टक्क्यांच्या दरम्यान असे. अबकारी कर व जकाती यांच्याद्वारे राज्याच्या उत्पन्नात मोठी भर पडे. जकात तर अनेक ठिकाणी वसूल केली जात असे. स्टेइनबाच याच्या शब्दांत "रणजितसिंहांच्या

करपद्धतीमध्ये प्रत्येक लहानमोठे स्थळ, (गाव, शहर, बाजार, दुकान) आणि प्रत्येक वस्तू, मग ती देशी वा विदेशी असो, आयात वा निर्यात केलेली असो; आणि विकत घेतलेली असो वा विकली जावो–समाविष्ट होती.'' अर्थात यात अतिशयोक्ती असावी. कारण महाराजांचे सरकार गरजू लोकांना त्यांच्या अडचणीआपत्तीच्या प्रसंगी सढळ हाताने मदत करीत असे. दुष्काळ पडल्यास पेरणीसाठी व पोटासाठी धान्य वाटले जाई. सैन्य जाण्याचा मार्ग कोणाच्या शेतातून जात असल्यास त्याला सारासूटही देण्यात येई. प्रासंगिक घोडदळाकडून कोणाच्या पिकाला उपद्रव होत नाही याबद्दल महाराज कटाक्षाने खबरदारी घेत. सेनेत दूत आणि निरोप्यांच्या अनेक जागा असत. आणि त्यामुळे सामान्य लोकांना नोकरी-व्यवसाय मिळे. शिपाईवर्ग आपल्या बचतीतून स्वतःच्या कुटुंबियांना घरखर्चासाठी पैसे पाठवू शकत असे.

स्थानिक प्रशासन

रणजितसिंहांच्या काळात लाहोर, मुलतान, काश्मीर आणि पेशावर असे पंजाबचे चार सुभे होते. त्यांशिवाय पुष्कळशी डोंगरी राज्ये होती. त्यांचे राजे महाराजांना वार्षिक खंडणी देत असत. मोगल पद्धतीप्रमाणे सुभापरगण्यात, परगणा तालुक्यात आणि तालुका सुमारे 50 ते 100 'मौजे' खेड्यांत विभागलेला असे. सुभ्याच्या प्रशासकाला 'नझिम' असा हुद्दा होता. त्याला त्याच्या कामात 'करदार' साहाय्य करीत. साधारणपणे एका तालुक्यासाठी एक करदार असे. त्यापैकी काही करदारांचे दरबारात चांगले वजन असे व त्यामुळे त्यांच्या तालुक्यात त्यांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होई. करवसुली करणाऱ्यांचे पगार कमीअधिक असत. आपल्या नोकरीच्या पगार-भत्त्यांत आपणास भागवावयाचे आहे हे उमजून असत.

करदार हे न्यायाधीश, मॅजिस्ट्रेट आणि मुलकी, अबकारी व आर्थिक अधिकारी होते. त्याशिवाय सर्वसाधारण देखरेख, तपासणी करण्याचे कामही सरकारच्या वतीने तेच करीत. यामुळे लोकांशी करदारांचा नजीकचा व घनिष्ठ संबंध येई. व ते त्यांच्याशी भलेबुरे जसे वागतील तसा त्यांना बरावाईट नावलौकिक प्राप्त होई. ''जमीन कसणाराला जेमतेम पोटाला पुरेल एवढेच राहू द्यावयाचे. सोन्याची अंडी देणारी कोंबडी तर मारावयाची नाही; पण निघतील तितकी तिची पिसे मात्र काटावयाची असे करदारांचे धोरण असे,'' असे बार्नेसने त्यांच्याबद्दल लिहिले आहे. तथापि ही ब्रिटिश टीका लेखकांनी अग्राह्य मानली असून ''करदार व नझिम ही शेतकऱ्यांना वरदान ठरणारी यंत्रणा होती,'' असे त्यांनी म्हटले आहे.

न्यायदान पद्धती

रणजितसिंहांच्या काळी लिखित स्वरूपात कोणतेच कायदे अस्तित्वात नव्हते. रूढी वा चालरीत यांच्या आधारे न्यायनिवाडे केले जात. मुलकी व फौजदारी खटल्यांमध्ये फरक केला जात नसे. दोन्ही प्रकारच्या खटल्यांचा निवाडा करण्याचा मार्ग साधा व धोपट असे. गावातल्या तंट्याबखेड्यांचा निवाडा पंचायत करीत असे. पण हा निवाडा करदार फिरवू शकत नसत. जमीन, वारसा आणि सारा आदीबद्दलचे खटले त्यांच्याकडेच येत. पण त्याशिवाय *'अदालती'* नावाचे दुसरे अधिकारी असत. न्यायप्रविष्ट खटल्यांचा निवाडा करणे हे त्यांचे एकमेव कार्य असे. अदालतीच्या निकालावर ज्याच्याकडे दाद मागता येत असे, *'अदालत-इ-अलाल'* (वरिष्ठ न्यायालयही) अस्तित्वात असल्याचा उल्लेख काही लेखकांनी केला आहे. आपल्या खात्याच्या संबंधातील खटले निकालात काढण्याचा अधिकार त्या त्या मंत्र्याला असे. ह्या सर्व 'न्यायालयांच्या' निकालांविरुद्ध तक्रारी ऐकण्याचा व त्यांच्यावर निकाल देण्याचा अंतिम अधिकार महाराजांकडे होता. ते आपल्या राज्यात खूपसे हिंडत व त्यांच्या नजरेस आणण्यात आलेल्या न्यायनिकालांचा फेरविचार करीत.

अनुकूल निकाल मिळून कज्जात यशस्वी झालेल्या पक्षावर महाराजांचे सरकार फी आकारीत असे. त्या पक्षाला *'शुक्राता'* ही द्यावा लागे. न्यायालयात नेण्यासारखे एखाद्या मुलकी खटल्यात खरोखरीच काही नसल्यास, न्यायालयाचा वेळ विनाकारण घेतल्याबद्दल फिर्यादी अथवा प्रतिवादी यांना दंड केला जाई. त्या काळात कारावास हा काही शिक्षेचा एखादा प्रकार मानला गेला नव्हता. बहुतेक सर्व खटल्यांना दंडच केला जाई. यामुळे न्यायदानाचे कार्य हे सरकारला उत्पन्नाचे एक चांगले साधन बनले होते. त्यावेळची न्यायदान पद्धती याप्रमाणे साधीसाधी, प्राथमिक स्वरूपाची व धोपटमार्गी होती. व ती तत्कालीन पंजाबला सोयीस्कर अशीच होती. अधिकाराचा गैरवापर करणाऱ्यांवर लक्ष ठेवणाऱ्या उपाययोजनाही अस्तित्वात होत्या. महाराज अनेक ठिकाणी आकस्मिकपणे गुप्त भेटी देत आणि जुलूम करणाऱ्यांचा बंदोबस्त आपल्या विशिष्ट पद्धतीने करीत.

दहा

महाराजांच्या बायका व कुटुंब

इतर अनेक मोठ्या लष्करी सेनानींप्रमाणे महाराज रणजितसिंह यांच्यामध्ये एक वृत्तिदोष होता. आणि तो म्हणजे स्त्रीच्या बाबतीतील त्यांची मोहवशता. त्यामुळे त्यांच्या जीवनात अनेक स्त्रिया आल्या. पैकी काही त्यांच्या जनानखान्यातच होत्या; तर कित्येक बाहेरही होत्या. "मी माझ्या वडिलांच्या 46 बायकांपैकी एकीचा मुलगा आहे." असे राजकुमार दलीपसिंह याने 1889 मध्ये एका फ्रेंच पत्रकाराला सांगितले असे म्हणतात. काही इतिहासकारांच्या मते ही संख्या इतकी मोठी नव्हती. तथापि ती थोडी कमी असली तरी विधियुक्त विवाह लावलेल्या आणि विवाहबंधनाशिवाय संबंध असलेल्या अशा त्यांच्या अनेक स्त्रिया होत्या हे सत्य निर्विवाद आहे. जे लोक अतिरिक्त वैषयिकतेबद्दल त्यांच्यावर टीका करतात त्यांनी तो काळ कसा होता आणि राजेरजवाडे व नबाबजादे यांच्याकडे सदर बाबतीत पाहण्याचा सर्वसामान्य समाजाचा दृष्टिकोण कसा होता हे विसरू नये. राज्यकर्ता हा आश्रयदाता व हितकर्ता असल्यास त्याच्या कच्छपी स्त्रिया लागणे त्यावेळी साहजिक असे. राजाशी स्नेहसलगी असणे ही गोष्ट अभिमानाची व प्रतिष्ठेची मानली जाई. त्यामुळे महाराजांना लग्नसंबंधाच्या जशा अनेक स्त्रिया होत्या त्याचप्रमाणे त्यांनी ठेविलेल्याही कित्येक स्त्रिया त्यांच्या जनानखान्यात होत्या.

मेहताब कौर

महाराजांच्या विवाहित स्त्रियांमध्ये मेहताब कौर ही सर्वांत ज्येष्ठ. घरच्या वडीलधाऱ्यांनी हा विवाह घडवून आणलेला होता. त्याचे महत्त्व असे की त्यामुळे सुकेरचकिआ व कन्हया या दोन शीख (मिसल) संघटनांमध्ये समन्वय साधला गेला. मेहताबची आई सदा कौर ही एक महत्त्वाची व्यक्ती होती. कारण ती कन्हया संघटनेची प्रमुख होती. अंगच्या गुणांमुळे त्या संघटनेत तिला नेत्याचे

स्थान प्राप्त झाले होते. मेहताबचा विवाह महाराजांशी 1796 मध्ये झाला. ती 1813 मध्ये वारली.

राज कौर

राज कौर ही नकाई संघटनेचे प्रमुख, रामसिंह यांची कन्या. तिचा विवाह महाराजांशी 1796 मध्ये झाला. ती महाराजांची आवडती होती असे म्हणतात. महाराजांशी ती फार प्रेमळपणे आणि समजूतदारपणे वागली. साहजिकच इतर स्त्रियांपेक्षा महाराजांच्या अंतःकरणात तिला विशेष स्थान लाभले. 1802 मध्ये तिच्या पोटी खरकसिंह जन्मला. तोच महाराजांचा भावी वारस होता. राज कौर 1838 मध्ये वारली.

बिबी मोरान

इ. स. 1805 मध्ये राजकुमार खरकसिंह तीन वर्षांचा असताना कन्हया संघटनेच्या प्रमुखाच्या लहान मुलीशी त्यांचा वाङ्‌निश्चय करण्यात आला. त्याप्रसंगी तो समारंभ फार थाटामाटाने साजरा करण्यात आला. तेव्हा नृत्याचा एक कार्यक्रम ठेविला होता. त्या नृत्याचे वेळी मोरान नावाच्या एका तरुण नर्तिकेने महाराजांचे लक्ष एकदम आकृष्ट केले. तिला लगेच जनानखान्यात आणण्यात आले. ती महाराजांची प्यारी बनली. ती फारसा पडदानशीनपणा राखीत नसल्यामुळे महाराजांबरोबर सार्वजनिक ठिकाणी वावरताना आढळे. तिच्यावरील त्यांच्या प्रेमाचे प्रतीक म्हणजे तिच्या नावाने त्यांनी नाणे पाडले. त्या नाण्याला 'आरसीवाला सिक्का' असे म्हणत. त्या नाण्यावर तिच्या नावाचे, म्हणजे मोराचे चित्र होते. ही नर्तिका 'मयूरनृत्य' करण्यात फार कुशल होती. महाराज एकदा मेटकाफबरोबर बैठकीत होते. बैठक पूर्ण होण्यापूर्वीच ते परतण्याची घाई दाखवू लागले. तेव्हा मोरानच्या भेटीची उत्कंठा हे त्या अधीरतेचे कारण असले पाहिजे असा शेरा मेटकाफने विनोदाने मारला. आपण तिच्यापासून क्षणभरही वेगळे राहू शकत नाही, आपल्याला तिचा विरह मुळीच सहन होत नाही हे महाराजांनी एकदा कबूल केल्याचे सोहनलालने प्रकट केले आहे. मोरान महाराजांच्याबरोबर एकदा हरिद्वारलाही गेली होती. होळीच्या वेळी ती महाराजांसह हत्तीवर बसे.

गुलबेगम

मोरानशिवाय महाराजांना आणखी कित्येक मुसलमान राण्या होत्या. अमृतसरची

कलावंतीण गुलबहार बेगम ही अशांपैकी एक होय. 1833 मध्ये महाराजांनी तिच्याशी थाटाच्या समारंभाने लग्न केले. त्यावेळी सर्व पारंपरिक धार्मिक विधी पाळण्यात आले होते. नंतर आपल्या कृत्याबद्दल क्षमायाचना करण्यासाठी महाराज सुवर्ण मंदिरात गेले होते. मोरानप्रमाणे गुलबेगमही महाराजांबरोबर हत्तीवरून जात असे. कित्येक वर्षेपर्यंत महाराजांवर तिची हुकमत चालू होती.

महाराजांच्या इतर मुसलमान राण्यांची नावे जिंद कलान, तैबू, जन्नत बिबी व गोबे अशी होती.

राणी जिंदान

महाराजांच्या सेवेत मन्नासिंह नावाचा कुत्तेखानाचा रखवालदार होता. त्याची मुलगी जिंद कौर ही नृत्य व नकला करण्यात प्रवीण होती. त्यामुळे ती महाराजांच्या नजरेत भरली. तेव्हा तिला जनानखान्यात दाखल करण्यात आले. नंतरच्या काळात महाराजांच्या गादीवर आलेला त्यांचा मुलगा दलीपसिंह हा राणी जिंदानच्या पोटी जन्मास आला.

महाराजांच्या कागदपत्रांत आणखीही काही राण्यांचा उल्लेख आढळतो. रतन कौर व दया कौर ह्या गुजरातच्या भांगी संघटनेच्या प्रमुखाच्या विधवा. रतन कौरच्या पोटी महाराजांना राजकुमार मुलतानासिंह आणि दया कौरच्या पोटी राजकुमार काश्मीरसिंह व पेशावरसिंह हे पुत्र झाले. त्यांना त्यांची नावे त्या त्या प्रदेशावरील दिग्विजय चिरस्मरणीय करण्यासाठी दिलेली होती. चांद कौर, लछमी, रूप कौर, राजदेवी, हरदेवी, रामदेवी, राणीदेवी, सामन कौर, बानत धन्नो, गुलाब कौर आणि कांग्राचा राजा संसारचंद कटोच याच्या मुली मेहताबदेवी व राज बन्सो ही आणखी इतर नावे होत.

खरकसिंह

महाराणी राज कौर यांच्या पोटी 1802 मध्ये खरकसिंहाचा जन्म झाला. पुढच्याच वर्षी वैशाखीच्या दिवशी एक औपचारिक विधी करून महाराजांनी त्याला आपला भावी वारस म्हणून जाहीर केले. बालकाच्या भाळी मळवट भरून त्याची हत्तीवरून लाहोरात मिरवणूक काढण्यात आली. लोकांनी त्याच्यावर पैसे उधळले. त्यावेळी आतषबाजी करण्यात आली होती. रात्री घराघरांवर दिवेही लावण्यात आले होते. बालक तीन वर्षांचे झाले तेव्हा चांद कौरशी त्याचा वाङ्निश्चय करण्यात आला. चांद कौर ही कन्हयान जयमलसिंह याची छोटी कन्या. 1812 मध्ये ते लग्न झाले.

त्यासाठी गुरुदासपूर जिल्ह्यात फत्तेगड येथे लग्नाची वरात गेली होती. खरकसिंहाने आपल्या पित्याबरोबर मुलतान, काश्मीर व मझारसिच्या मोहिमात भाग घेतला होता. रणजितसिंहांचा अंतःकाळ नजीक आला तेव्हा महाराज म्हणून खरकसिंह गादीवर आला. व राजा ध्यानसिंह त्याचा वजीर झाला. पण ह्या वजीरानेच खोट्या कंड्या पसरवून आपला मालक खरकसिंह याने ब्रिटिशांशी संगनमत केले असल्याशी आवई उठविली असे म्हणतात. आणि त्यामुळे खरकसिंह व त्याचा मुलगा नौनिहालसिंह यांच्यामध्ये मतभेद व संशयाचे वातावरण निर्माण झाले. आस्तेआस्ते मृत्यूकडे ओढून नेणाऱ्या विषाचा प्रयोग खरकसिंहावर करण्यात आल्यामुळे तो 5 नोव्हेंबर 1840 रोजी वारला.

सरदारांमध्ये खरकसिंहाचे पाठीराखे होते. पण बापाच्या गुणांचा व मोठेपणाचा तो स्वतःच मुळी योग्य वारस नव्हता. त्याच्या समकालीनांत त्याची चाह झाली नाही. आपल्या पित्याच्या वतीने काही लष्करी मोहिमा त्याने हाती घेतल्या होत्या. पण नेता होण्यासाठी तो जन्मास आला होता असे दिसून आले नाही. तो स्वभावाने अतिशय साधासीधा अन वृत्तीने सुस्त, आळशी होता. आपल्या संपत्तीची व्यवस्था पाहण्याचे काम त्याने जमादार खुशालसिंहाचा भाऊ, भाई रामसिंह याच्याकडे सोपविले होते. आपली जहागीर सांभाळण्यात त्याने स्वतः अधिक लक्ष घालावे असे रणजितसिंहांना वाटे. कारण जहागिरीच्या व्यवस्थापकाने द्रव्यापहार केल्याचे त्यांच्या कानी आले होते. अखेर 1816 मध्ये रामसिंहाला अटक करण्याचा हुकूम काढणे त्यांना भाग पडले. आणि त्याच्या जागी दुसरा विश्वासू व कार्यक्षम व्यवस्थापक नेमण्याची सूचना त्यांनी भर दरबारात खरकसिंहाला केली. पण तिचाही काही उपयोग न होता दुर्दैवाने परिस्थिती पुन्हा लवकरच पूर्वपदावर आली.

एका उपलब्ध पुराव्यावरून असे समजते की खरकसिंह धार्मिक वृत्तीचा होता. पूजा-प्रार्थनेत त्याचे मन रमून जाई. धार्मिक व्यक्तीची संगत त्याला विशेष आवडे. त्यामुळे त्याला ऐहिक महत्त्वाकांक्षा मोहवू शकल्या नाहीत.

नौनिहालसिंह

नौनिहालसिंहाचा जन्म 22 फेब्रुवारी 1822 रोजी झाला. त्याच्या जन्माचा इतका आनंद रणजितसिंहांना झाला की त्यानिमित्त अभिनंदनासाठी आलेल्या सरदारांचे स्वागत करण्याकरिता त्यांनी सोन्याचे खांब लावलेला एक खास तंबू उभारला. 1837 मध्ये आपल्या ह्या नातवाचा विवाह समारंभ मोठ्या झगमगाटाने त्यांनी साजरा केला. राजा ध्यानसिंहाने नौनिहालसिंहाला आपल्या पित्याविरुद्ध–

खरकसिंहाविरुद्ध चिथावून उठविले. परंतु खरकसिंहाच्या अंत्यविधीच्याच दिवशी तोही अकस्मात अपघाताने वारला. कारण अंत्यविधी आटोपून परत येत असता वाटेतील एक कमान दुर्दैवाने त्याच्या अंगावर ढासळली! हा 'अपघात' ध्यानसिंहाने घडवून आणिला होता असे म्हणतात. कारण नौनिहालसिंहाला पालखीतून लगोलग त्याच्या निवासस्थानी तसेच नेण्यात आले व तेथे त्याला पुरे खतम करण्यात आले असाही प्रवाद आहे.

शेरसिंह

मेहताब कौरला झालेल्या जुळ्या मुलांपैकी हा एक; म्हणजे सदा कौरचा नातू. सदा कौर व हे दोन्ही मुलगे पुढे महाराजांशी वैरभावाने वागू लागले. ते अधूनमधून बंडावाही करीत. म्हणून महाराजांनी त्यांना स्थानबद्ध करून ठेविले होते. ही मंडळी खरकसिंहाच्या लग्नाला जाणूनबुजून हजर राहिली नाहीत. पण पुढे एक काळ असाही आला की शेरसिंह महाराजांचा आवडता झाला; आणि खरकसिंह मात्र मर्जीतून उतरला.

खरकसिंह व नौनिहालसिंह यांच्या मृत्यूनंतर शेरसिंह लाहोरला आला. तथापि खरकसिंहाची विधवा आता गादीची वारस बनली होती. व त्यामुळे शेरसिंह मुकेरिअनला परत गेला तरी पुढे 1842 मध्ये काही काळ तो 'महाराज' झाला. त्यावेळी त्याने ध्यानसिंहाचा काटा काढण्याचा प्रयत्न केला. पण 15 सप्टेंबर 1843 रोजी अजितसिंह संधानवलिआ याच्या गोळीला तो बळी पडला. ध्यानसिंहाचाही अंत अशाच रीतीने त्याच दिवशी झाला.

दलीपसिंह

दलीपसिंह हा महाराज रणजितसिंहांचा सातवा मुलगा. त्याचा जन्म 1838 मध्ये राणी जिंदानच्या पोटी झाला. शेरसिंहाच्या मृत्यूनंतर 'महाराज' म्हणून त्याच्या नावाची घोषणा केली गेली त्यावेळी तो अवघा सहा वर्षांचा होता. त्याची आई मुख्य कारभारी बनली व ध्यानसिंहाचा मुलगा हिरासिंह वजीर झाला. पण ह्या नव्या राजाचे सावत्र भाऊ काश्मीरसिंह व पेशावरसिंह यांनी त्याच्याविरुद्ध बंड केले. मात्र ते मोडून काढण्यात आले. हिरासिंह व त्याचा सल्लागार पंडित झाला यांचे खून खालसा सैन्याकडून 1844 मध्ये पडले. याचे प्रमुख कारण म्हणजे हिरासिंहाची शिरजोर व घमेंडखोर वागणूक. जिंदानचा भाऊ, जवाहरसिंह आता मुख्य मंत्री बनला होता. पण राजकुमार पेशावरसिंह याच्या खुनात भाग घेतल्याच्या

आरोपावरून त्याला 21 सप्टेंबर 1845 रोजी देहान्ताची शिक्षा देण्यात आली.

एकीकडे आपापसातील असे हेवेदावे व छोटमोठे कलह; आणि दुसरीकडे लॉर्ड डलहौसी याचे विस्तारवादी धोरण यामुळे पंजाब लवकरच ब्रिटिशांच्या घशात गेला. जिंद कौर नेपाळात निघून गेली. महाराज दलीपसिंह यांना उत्तर प्रदेशात फत्तेगड येथे आणून ठेवण्यात आले. पुढे 1853 मध्ये त्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला. पुढील वर्षी ते इंग्लंडला गेले आणि अखेरपर्यंत तेथेच राहिले. मध्यंतरी 1861 मध्ये आपल्या आईला नेण्यासाठी आणि 1863 मध्ये तिच्या मृत देहावर मायभूमीत अंत्यसंस्कार करण्यासाठी ते स्वदेशी येऊन गेले.

ब्रिटिश सरकारशी झालेल्या मतभेदामुळे पुढे 23 वर्षांनी दलीपसिंह भारतात परत येण्यासाठी जलमार्गाने निघाले असता त्यांना एडन येथे अडविण्यात आले; व इंग्लंडला परत जाण्याचा आदेश त्यांना देण्यात आला. तेथील अल्पशा मुक्कामात त्यांनी परत शीख धर्म स्वीकारला. आपल्या आयुष्याची अखेरची वर्षे त्यांनी युरोपात घालविली. पॅरिस येथे 1893 मध्ये त्यांचा अंत झाला. त्योवेळी त्यांना दोन मुलगे व तीन मुली होत्या.

सदा कौर

वास्तविक सदा कौर ही महाराजांच्या कुटुंबियांपैकी एक नव्हे. पण त्यांच्या कारकीर्दीच्या सुरुवातीच्या काळात तिची भूमिका महत्त्वाची होती. तिच्या नवऱ्याचा वध रणजितसिंहांच्या पित्याकडून 1791 साली एका चकमकीत झाला होता. पण स्वतःच्या महत्त्वाकांक्षेपायी ती ते दुःख विसरली. आणि आपली मुलगी मेहताब कौर हिचा विवाह तिने तरुण रणजितसिंहांशी लावून दिला. लग्न लागल्यावर ती मेहताबबरोबर तिचे घर सांभाळण्यासाठी गुजराणवाल्यास गेली. तिचे तेथील अस्तित्व नवरा-बायकोच्या प्रेमात खीळ घालण्यासारखे ठरले असले तरी रणजितसिंहाना नेता बनण्यास तिने साहाय्य केले एवढे खरे. रणजितसिंहांच्या उत्कर्षासाठी ती हरप्रकारे झटली. कारण त्यांच्या पाठीमागे राहून सत्तेची सूत्रे आपल्या हाती ठेवण्याची तिची मनीषा होती. एक स्त्री या नात्याने, आपण पुरुषाप्रमाणे पुढे येऊन नेता बनू शकत नाही हे ती जाणून होती. तिचा स्वार्थ असा होता की, मुलीच्या लग्नसंबंधाचा परिणाम म्हणून महाराज रणजितसिंह, कन्हया संघटनेचे प्रमुख बनण्यास तिला साहाय्य करतील. तिने आपला मुक्काम बटाल्यास ठेविला होता. व स्वतःचा उद्देश साध्य करण्याच्या दृष्टीने तिने आपल्याजवळ सैन्यही बाळगले होते.

पण गुजराणवाला येथे तिच्या ह्या योजना फसल्या. रणजितसिंहांना आपल्या

पंजाखाली ठेवण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांच्या आईचे व तिचे संबंध बिघडले. आणि तेही इतके की त्या दोघींत उभा दावा निर्माण झाला. मध्यंतरी 1896-97 साली शहा झमनच्या स्वाऱ्या झाल्यामुळे सदाकौरला तात्पुरते नेतृत्व लाभले होते. महाराज रणजितसिंहांच्या नेतृत्वाखाली सर्व शीख संघटनांच्या प्रमुखांनी एकत्र येऊन अफगाणांशी सामना द्यावा याबद्दल तिने त्यावेळी कळकळीचे प्रयत्न परोपरीने केले होते. पण ते संकट निवारण झाल्यावर आपापसांतील तंट्यांनी पुन्हा आपले डोके वर काढले. रणजितसिंहांनी दुसरे लग्नही केले व सगळेच व्यवहार स्वतःच्या हाती घेतले. याचा परिणाम असा झाला की आपल्या मुलीला घेऊन सदा कौर रागाने बटाल्यास निघून गेली. पण त्यांना पुन्हा एकत्र आणण्यासाठी नियतीने कारण घडवून आणिले. लाहोरच्या नागरिकांनी महाराज रणजितसिंह व सदा कौर या दोघांनाही त्यांच्या मदतीसाठी धावून येण्याचे आवाहन केले. अशीच विनंती अमृतसरच्या हिंदूंनीही केली. त्यामुळे सुकेरचकिआ संघटनेचे तरुण नेते—महाराज रणजितसिंह दोन्ही शहरांचे मालक झाले.

दुसऱ्या महाराणीला खरकसिंह आणि मेहताब कौरला जुळे झाल्यावर रणजितसिंह व त्यांची सासू यांच्यातील संबंध पुन्हा एकवार ताणले गेले. दोहोंपैकी आपल्या एका नातवाकडे वारसा यावा अशी सदा कौरची तीव्र इच्छा होती. पण ती फलद्रूप होत नाही असे दिसताच नातवांना घेऊन ती बटाल्यास गेली. आणि नातवांच्यासाठी मागण्या करीत राहून महाराजांना तेथून छळण्यास तिने सुरुवात केली. राजकुमार शेरसिंह याने दरबारात आपले चांगले कर्तृत्व दाखविले. हे खरे असले तरी महाराजांनी आपल्या ज्येष्ठतम पुत्रासच आपला भावी वारस केले. सदा कौर ब्रिटिशांच्या बाजूस जात आहे असे दिसून येताच तिचे प्रयत्न हाणून पाडून महाराजांनी तिला लाहोर येथे स्थानबद्ध केले. आणि तिची अर्धी संपत्ती तिच्या दोन्ही नातवांना दिली. याप्रमाणे बंदिवासात असतानाच सदा कौरला मृत्यू आला.

अकरा

आनंदाचे महान क्षण

राजकुमार खरकसिंह याचा विवाह 1812 मध्ये झाला. "ऐश्वर्याचे एवढे सुंदर व शोभिवंत दर्शन घडविणारा समारंभ भारतात कित्येक वर्षांत झाला नसेल," असे त्याच्या विवाहानिमित्त झालेल्या शाही सोहळ्याचे वर्णन मेटकाफने केले आहे. महाराज रणजितसिंहांनी त्या विवाह समारंभाची निमंत्रणे ब्रिटिश गव्हर्नर जनरल आणि पंजाबातील कित्येक संस्थानिक व शीख (मिसल) संघटनांचे प्रमुख यांना पाठविली होती. त्याप्रमाणे पतियाळा, नाभा, जिंद, कांग्रा आणि कैथाल येथील राजप्रमुख, व गव्हर्नर जनरलचा प्रतिनिधी म्हणून कर्नल ओच्छरलोने ही मंडळी विवाहप्रसंगी उपस्थित होती. मुलतान व भावलपूर येथील नबाबांनाही बोलाविण्यात आले होते. म्हणून त्यांनीही आपल्या कुटुंबातील काही मंडळींना पाठविले होते.

लग्नाच्या *'बारात'* वऱ्हाडात काही हजार माणसांचा समावेश होता. गुरुदासपूर जिल्ह्यातील फत्तेगडला वरात जावयाची होती. लाहोरहून तिने अमृतसरमार्गे प्रस्थान केले. सामान नेण्यासाठी वरातीबरोबर हत्ती, घोडे, उंट घेण्यात आले होते. एकंदर समारंभ भव्य प्रमाणात व अभूतपूर्व थाटाने साजरा झाला. पाहुण्यांच्या स्वागतावर, आदरातिथ्यासाठी व मनोरंजनाकरिता मुलाच्या सासऱ्याने पाण्याप्रमाणे पैसा खर्च केला. आपल्या मुलीसाठी दिलेल्या मोठ्या थोरल्या हुंड्याशिवाय त्याने रणजितसिंहांना सर्वांच्या प्रवासखर्चासाठी 50,000 रुपये दिले; आणि पाहुणे मंडळींनाही छानदार भेटी व नजराणे दिले.

नौनिहालचा विवाह

महाराजांचा नातू नौनिहालसिंह याचा विवाह 1837 मध्ये सरदार श्यामसिंह अत्तारीवाला यांच्या मुलीशी झाला. या खेपेसही खरकसिंहाच्या लग्नाच्या वेळेसारखाच थाटमाट व नोकझोक होता. कार्यासाठी सढळ हाताने भरपेट खर्च करण्यात आला. याही वेळी देशातील बड्याबड्या मंडळींना निमंत्रणे पाठविण्यात आली होती.

गव्हर्नर जनरलने खुद्द कमांडर इन-चीफ सर हेन्री फेन यांना आपला प्रतिनिधी म्हणून पाठविले होते. बहुतेक सगळे मांडलिक जहागिरदार व कित्येक स्वतंत्र संस्थानिक लग्नाला आले होते. वरातीत पाच लाख माणसे होती असे म्हणतात. अर्थात त्यांच्यापैकी पुष्कळसे पाहुण्यांच्या सुखसोयींसाठी घेतलेले शिपाई लोक व इतर सेवक होते व त्यांनी पाहुण्यांची सरबराई उत्तम रीतीने ठेविली.

नंतर वऱ्हाड अमृतसरला गेले. तेथे महाराजांनी 'दरबार साहेबाला' भेट दिल्यावर स्वहस्ते वराच्या डोक्याला मुंडावळ्या, बाशिंग बांधले. अहेर ('तांबूल') देण्याच्या वेळी ब्रिटिश प्रतिनिधीने गव्हर्नर जनरलांच्या वतीने रु. 11,000 दिले. त्यानंतर राजा ध्यानसिंहाने रोकड व नजराणा म्हणून सव्वा लाखाचा अहेर केला. अनेक राजे-सरदारांनी प्रत्येकी रु. 51,000 दिले. याप्रमाणे प्रत्येकाने आपल्या शक्तीनुसार अहेर-नजराणे दिले. सैनिकांनीसुद्धा आपला एक महिन्याचा पगार (प्रत्येकी रु. 10) दिला. एका निरीक्षकाच्या अंदाजाप्रमाणे एकूण अहेर-नजराणे भेटी मिळून 17,000 पौंडांचा ऐवज आला. दुसऱ्या एकाच्या मताप्रमाणे ते सगळे एक कोटी रुपये किमतीचे होते. लग्नसोहळ्यात खाणेपिणे व नाचगाणे यांची लयलूट होती. रणजितसिंहांनी खर्चाला मुळीच मागेपुढे पाहिले नाही आणि व्यवस्था तर अशी ठेवण्यात आली होती की प्रत्येक पाहुण्याला त्या सोहळ्याचे सुख प्राप्त झाले; व जणू आपल्याच घरचे कार्य आहे असेच सर्वांना वाटले.

लग्नाची मिरवणूक एका तिसऱ्या प्रहरी अमृतसरमधून बाहेर पडली. उत्तम सजविलेले डझनावार हत्ती मिरवणुकीत होते. त्याशिवाय शेकडो घोडे व उंटही होते. खुद्द महाराजांचे व आलेल्या बड्या पाहुण्यांचे हजारो सैनिक-शिपाई मिरवणुकीत सामील झाले होते. महाराज एका हत्तीवर हौद्यात बसले होते. व तेथून ते सोन्याचांदीची नाणी उधळीत होते.

वऱ्हाड अत्तारीला आल्यावर सरदार श्यामसिंहांनी त्यांचे स्वागत केले. वऱ्हाडातील सुमारे पाच लाख मंडळींच्या पाहुणचाराची अगदी चोख व्यवस्था त्यांनी ठेविली होती. ब्रिटिश कमांडर-इन-चीफचा पुतण्या ले. एडवर्ड फेन हाच त्यांचा शरीररक्षक होता. त्याने त्याबद्दल लिहिले आहे ते असे : "दोऱ्यात मोठीमोठी मोत्ये ओवून त्यांच्या मुंडावळ्या केलेल्या होत्या. पण वराच्या चेहेऱ्यापासून त्या बाजूस केल्या तेव्हा पोरसवदा नौनिहालसिंह हडकुळा व रोगट असावा असे दिसले. त्याचा सबंध चेहेरा देवीच्या असंख्य व्रणांनी भरलेला आढळला. तथापि मुलगा बुद्धिमान आणि वर्तणुकीने चांगल्या वळणाचा वाटला."

लग्न रात्री 9 वाजता लागले. पंडितांनी मंत्र म्हणून पौरोहित्य केले. त्यावेळी

महाराज रणजितसिंह व त्यांची निवडक बडी पाहुणे मंडळी सोन्याचांदीच्या खुर्च्यांत विराजमान होऊन मद्यसेवन करीत नृत्यादी कार्यक्रम पाहत होती. विवाहाच्या विधीनंतर महाराजांनी सुमारे पाऊण लाख ब्राह्मण आणि भिकारी यांना अन्नदान केले, व शिवाय प्रत्येकी एक रुपया दक्षिणा वर दिली.

हुंड्यामध्ये दिलेल्या काही चीजांचा उल्लेख फेनने केला आहे. निवडक घोडे, गायी, म्हशी, उंट प्रत्येकी 101, हत्ती 11, भरपूर मौल्यवान जडजवाहिर व दागिने, सुंदर भारी काश्मिरी शाली 500 व भोजनासाठी चांदीचे नक्षीदार भांड्यांचे संच.

त्याशिवाय यजमानांनी तेथे काही दुकाने उघडून पाहुण्यांना आपल्या गरजेच्या व आवडीच्या वस्तू मोफत मिळण्याची व्यवस्था केली होती. सुमारे पंधरवडाभर असा जल्लोष चालू होता. नंतर महाराज व वऱ्हाडी परतले. तेव्हा नवरीला सोन्याच्या पालखीत बसविण्यात आले होते. तिच्या आईवडीलांनी व नातेवाइकांनी मग तिला निरोप दिला.

वऱ्हाड लाहोरला परत आल्यावर महाराजांनी शालीमार उद्यानात एक भव्य जंगी कार्यक्रम आखला. एकीकडे कलावंतिणी आपल्या नृत्याचे व सौंदर्याचे प्रदर्शन घडवीत होत्या; तर दुसरीकडे महाराज रणजितसिंह व त्यांचे स्त्री-पुरुष पाहुणे नृत्याचा आनंद लुटीत होते. सर हेन्री फेन व त्यांच्या बरोबरच्या मंडळींना लाहोर शहर हिंडवून दाखविण्यात आले. तसेच त्यांना कोहिनूर हिरा व इतर मौल्यवान जडजवाहिरही दाखविण्यात आले.

रंगरंगेली होळी

त्यानंतर दोन दिवसांनीच होळी आली होती. म्हणून महाराजांनी ब्रिटिश पाहुण्यांना मुक्काम वाढविण्याचा आग्रह केला. होळीच्या प्रसंगीचा आनंदोत्सवी रंगविलास ही ब्रिटिश पाहुण्यांना एक नवी अनुभूती होती. फेनने म्हटले आहे की, रणजितसिंह आपल्या दरबारी मंडळीच्या मध्यभागी बसले होते. भोवतालच्या मंडळींत 30-40 सुंदर तरुणी होत्या. त्यांच्याजवळच्या धनुष्यबाणामुळे त्या जणू शूर वीरांगना भासत होत्या. लाल व केशरी रंगाच्या भुकटीचे ढीग तेथे लावून ठेविले होते. त्या भुकटीचे लाडूही बनवून ते काही टोपल्यांत शिगोशीग भरून ठेवण्यात आले होते. सोन्याच्या पिचकाऱ्याही होत्या. प्रथम महाराजांनी रंग खेळण्यास सुरुवात केली. त्यांनी सरसाहेबांच्या टकलावर केशरी रंग उधळला; आणि राजा ध्यानसिंहाने त्यांच्या तोंडाला लाल रंग चोळला. महाराजांनी अफगाण वकीलालाही ह्या खेळात ओढले. विंचरून छान बसविलेली त्यांची दाढी

महाराजांनी क्षणार्धात लालभडक करून टाकली. इतरांनीही त्याची तशीच चेष्टा आरंभिली. हास्यकल्लोळात तो रंगमहालातून बाहेर सटकला. ह्या प्रसंगाच्या वर्णनाच्या शेवटी फेनने असा शेरा मारला आहे की, "याप्रमाणे तो रंगविलास आटोपून मंडळी बाहेर पडली तेव्हा त्यांचे बाह्य रूप असे झाले होते की ही माणसे अगदी घाणेरडी आहेत असे म्हणून लंडनमधल्या कोणाही नागरिकाने त्यांना आपल्यात मिसळू दिले नसते."

बेंटिंकबरोबर रूपार येथे

प्रत्येक गोष्ट मोठ्या पद्धतशीरपणे करण्यावर रणजितसिंहांचा मोठा कटाक्ष असे. समकालीन राजकीय क्षेत्रात आपल्या राजनीतीचे धोरण ब्रिटिशांशी समन्वयाचे, सामोपचाराचे व मिळून वागण्याचेच ठेविले पाहिजे हे त्यांना कळून आले तेव्हा त्यांनी गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिंक यांच्या भेटीची सिद्धता केली. त्याप्रमाणे रूपार हे स्थळ भेटीसाठी निश्चित करण्यात आले. सतलजच्या किनाऱ्यावरील एका खास तयार केलेल्या उपवनात 26 ऑक्टोबर 1831 रोजी ही भेट झाली. महाराजांच्या कारागीरांनी चांदीने मढविलेल्या हिंदू देवालयांचे स्वरूप त्या भेटस्थळाला दिले होते.

आदल्या दिवशी सकाळी 16000 घोडदळांसह महाराज रूपारला पोहोचले आणि दुसऱ्या दिवशी सकाळीच हत्तीवरून ते बेंटिंकच्या भेटीस गेले. बेंटिंक व त्याच्या बरोबरची मंडळी महाराजांना सामोरी आली. दोन्ही प्रमुखांनी एकमेकांना आलिंगने दिली. नंतर ते ब्रिटिशांच्या तंबूत गेले. महाराजांना नजराणा म्हणून द्यावयाची 200 ताटे तेथे भेटवस्तूंनी भरून ठेविलेली होती. दोन हत्ती व काही घोडेही महाराजांना नजर करण्यात आले. दुभाष्याच्या मदतीने उभयतांमध्ये संभाषण झाले. ब्रिटिशांनी तेथे आणिलेल्या काही भारतीय कलावंतिणींच्या नृत्याच्या कार्यक्रमाने त्या दिवसाच्या भेटीची सांगता झाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी मग बेंटिंक महाराजांच्या परत भेटीस गेला. उचित स्वागतानंतर दोघेजण थोडा वेळ एका हत्तीवरून हिंडले. त्यानंतर बेंटिंकला चंदेरी शिबिरात नेण्यात आले. तेव्हा पंजाबच्या तोफखान्याने त्यांना 21 तोफांची सलामी दिली. महाराजांनी आपल्या सरदाराची ओळख बेंटिंकला करून दिली. त्यानेही आपल्या अधिकाऱ्यांचा परिचय महाराजांना करून दिला. काश्मीरहून आणिलेल्या काही नर्तिकांच्या नृत्याचा कार्यक्रम मग झाला. महाराजांनी बेंटिंकला नजराणे दिले. नजराण्यांनी शंभर ताटे भरली होती. त्याशिवाय एक हत्ती व दोन घोडेही

महाराजांनी दिले. विशेष म्हणजे महाराजांनी बेंटिंकला मोत्याची एक माळ वैयक्तिक भेट म्हणून नजर केली.

नंतर उभयतांनी दोघांच्या सैनिकी तुकड्यांची पाहणी केली. रात्री महाराजांतर्फे लॉर्ड व लेडी बेंटिंक यांना थाटाची मेजवानी देण्यात आली. त्यावेळी तंबूत नाच व बाहेर आतषबाजी चालू होती. मद्याचे प्याले रिकामे होत होते. होळीच्या वेळी रंग उधळतात त्याप्रमाणे पाहुण्यांच्या अंगावर त्या प्रसंगी सुवर्ण तुषारांचा वर्षाव करण्यात आला. त्यानंतर दोघांनी काही राजकीय गोष्टींवर चर्चा केली. तथापि स्वतः महाराज रणजितसिंह आणि शीख लोक यांच्या हितसंबंधांच्या दृष्टिकोणातून ती चर्चा फारशी उपयुक्त होऊ शकली नाही.

ऑक्लंडबरोबर फिरोजपूर येथे

रशियाच्या संभाव्य आक्रमणाला तोंड देता यावे म्हणून भारतातील ब्रिटिश सत्तेने शाह सूझाला काबूलच्या सिंहासनावर बसविण्याचा निर्णय घेतल्यावर त्या कामात रणजितसिंहांचे साहाय्य मिळविण्याचा प्रयत्न ब्रिटिशांनी केला. लॉर्ड ऑक्लंड सिमल्यास आला तेव्हा त्याच्याकडे आपले एक सदिच्छा शिष्टमंडळ पाठवून रणजितसिंहांनी उभयतांच्या भेटीची इच्छा दर्शविली.

त्याप्रमाणे फिरोजपूर येथे 29 नोव्हेंबर 1838 रोजी दोघांच्या भेटीचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला. ग्रंथसाहेबापुढे प्रार्थना करून रणजितसिंह ब्रिटिशांच्या तळाकडे मिरवत निघाले. त्यावेळी गव्हर्नर जनरलच्या तळाभोवती इतकी गर्दी व गडबड माजली की काही ब्रिटिश सैनिकांच्या साहाय्याने तेथे योग्य असे दरबारी वातावरण व परिस्थिती राखणे भाग पडले.

नेहमीप्रमाणे गव्हर्नर जनरलने महाराजांना अनेक भेटी दिल्या. त्यांत बंदूक, पिस्तूल, तलवारी व आखूड गोळ्याच्या दोन छोट्या तोफा होत्या. त्यांच्यावर रणजितसिंहांचे रेखाचित्र कोरण्यात आलेले होते. व ते पाहून त्यांना परम संतोष झाला. आणि ऑक्लंडने त्यांना देण्यासाठी काही घोडेही आणिले आहेत हे महाराजांना समजले तेव्हा तर त्यांना इतका हर्ष झाला की ती जनावरे कशी आहेत हे पाहण्यासाठी तो अश्वप्रेमी राजा भर उन्हात धावत बाहेर आला. गव्हर्नर जनरलने परत भेट दिली तेव्हाही पहिल्या भेटीच्या वेळी झाली तशीच गर्दी-गडबड उडाली होती.

संध्याकाळी झालेल्या भेटीत ब्रिटिश स्वागत समारंभाबरोबर काही व्यावहारिक कामकाजाच्या चर्चेचा समावेश होता. काबूलच्या सिंहासनावर शाह सूझाची स्थापना

करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीशी सहकार्य करण्यास आपण तयार असल्याचे महाराजांनी मान्य केले. ह्या भेटीच्या वेळी नाचगाणी चालू होती. शोभेची दारू उडविण्यात येत होती. आणि मद्यपानही चालू होते. महाराजांसाठी बनविलेले खास उंची मद्य इतर मंडळींनाही देण्यात आले. लॉर्ड ऑक्लंड मद्यपान करीत नसे. पण त्याने शिष्टाचार म्हणून ते घेतले. तथापि त्याची बहीण, एमिली एडन हिला ते मद्य इतके तीव्र व दाहक वाटले की तिने महाराजांच्या नकळत ते बाजूस ओतून दिले. ह्या भेटीचा इष्ट परिणाम त्या बहीणभावांवर झाला. महाराजांवर जनतेचे अपार प्रेम व निष्ठा असल्याचे एमिलीला आढळून आले; महाराज रणजितसिंह हे ब्रिटिशांना लाभलेले एक नवे शक्तिशाली मित्र होत असे ऑक्लंडला वाटले.

बारा

आजार व मृत्यू

रणजितसिंहांची शरीरयष्टी बळकट होती. नियमित व्यायाम व आहार यांच्या साहाय्याने त्यांनी ती दणकट राखली होती. तथापि त्यांच्यासारख्या ज्या नेत्याला लष्करी व राजनैतिक अशा दुहेरी जबाबदाऱ्या असलेले जीवन दीर्घकाळ कंठावे लागते, त्याच्या शरीरावर ताण पडणे अपरिहार्य असते. महाराजांच्या आरोग्यावर तसे परिणाम आस्तेआस्ते न कळत घडून आले असल्याचे अखेरीस दिसून आले. शरीर खालावत जाण्यास त्यांच्या मद्यपानाच्या सवयीनेही मदत केली. त्यांच्यासाठी खास मद्ये तयार करण्यात येत असत. ती मद्ये म्हणजे एक प्रकारची 'द्रव आग' होती. एकदा ते प्यायला बसले म्हणजे मग त्यांना मर्यादेचे भान उरत नसे. एखादा सण असला, बडे पाहुणे संगतीला असले म्हणजे मग तर विचारावयासच नको. आपल्या पिण्याची बैठक पावसाळ्यात ते जास्त वेळ चालू ठेवीत. शेवटी व्हायचा तो अपरिहार्य परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. त्यांच्या मद्यपानाने रोगाला निमंत्रण दिले व त्यांचे पित्ताशय बिघडले.

त्यांचा पहिला गंभीर आजार म्हणजे 1826 मध्ये त्यांना आलेला मलेरियाचा ताप. त्यातून बरे होण्यास त्यांना काही महिने लागले. तथापि उशीरा का होईना, पण त्यातून ते एकदाचे पूर्णपणे बरे झाले व त्यांची प्रकृतीही पूर्ववत सुधारली. त्यानंतर सुमारे दहा वर्षे त्यांना कोणत्याही आजाराचा उपद्रव झाला नाही. 1835 मध्ये पावसाळ्यातील एका रात्री त्यांना अकस्मात अर्धांगवायूचा झटका आला. आणि त्यांच्या उजव्या अंगावर त्याचा परिणाम घडून आला. जीभ लुळी पडल्यामुळे त्यांच्या वाचेवरही परिणाम झाला. त्यांचा चेहेरासुद्धा त्यामुळे वाकडा होऊन गेला. ह्या गंभीर शारीरिक आपत्तीचा परिणाम अर्थातच त्यांच्या मनावरही झाल्याशिवाय राहिला नाही. तथापि फकीर अझिझुद्दिन यांचे उपचार व सेवाशुश्रूषा यांच्यामुळे त्यांचे सांधे व वाचा अंशतः सुधारली. त्यांना पाश्चात्त्य मद्याचा तिटकारा वाटू लागला व ते वैद्यांच्या सूचना पाळू लागले. परंतु रात्री ताप येऊन गेलेला असला

तरी ते दुसरे दिवशी सकाळी बाहेर जाण्याचा आग्रह धरीत; आणि दुपारी दरबारातही बसत. पण आता त्यांचे बोलणे इतके अस्पष्ट झाले होते की ते समजणे अवघड होई.

अर्धांगवायूचा दुसरा झटका त्यांना त्यानंतर सुमारे दीड वर्षाने आला. आणि यावेळी त्याने महाराजांना जवळजवळ लुळे, अपंग करून टाकले. आधी दुखावलेल्या त्याच उजव्या अर्ध्या अंगावर यावेळी अधिक परिणाम झाला आणि त्यांची वाचाही अधिक दुबळी झाली. घोड्यावरून रपेट करण्याची इच्छा झाल्यास आता त्यांना उचलून खोगीरावर बसवावे लागे. ते आपल्या पालखीतून स्वतः बाहेर पडू शकत नसत. अशात एकदा ताजी हवा खाण्याच्या हेतून ते बाहेर पडले असता एक मत्त हत्ती एकदम सुटला व त्यांच्या पालखीच्या रोखाने धावला. वेळीच मदत न मिळती तर त्या माजलेल्या जनावराकडून ते कदाचित तेथेच ठार झाले असते.

दिनांक 24 डिसेंबर 1838 रोजी फिरोजपूर येथे महाराज लॉर्ड ऑक्लंड यांच्या स्वागत समारंभात उपस्थित असता त्यांना अर्धांगाचा तिसरा झटका आला. मद्याचा प्याला ते स्वतःच्या हाताने ऑक्लंडसाहेबाला देऊ लागले असता त्यांच्या अंगाला मोठा कंप सुटला आणि त्यांचे शरीर एकदम एका बाजूला झुकले! काय घडत आहे हे चटकन ध्यानी न आल्यामुळे गव्हर्नर जनरल गोंधळले. तेवढ्यात महाराजांच्या तोंडाला फेस येऊ लागला. आणि त्यांच्या उघड्या डोळ्यांतील नजरेची हालचाल बंद पडली! एक आठवड्यानंतर त्यांना बरे वाटू लागल्यावर लाहोरला नेण्यात आले.

या तिसऱ्या खेपेच्या झटक्यानंतर त्यांची वाचा पूर्णपणे गेली. आता नाइलाजाने खाणाखुणांनी व अंगविक्षेपाने आपल्या गरजा-इच्छा सांगणे त्यांना भाग पडू लागले. फकीर अझिझुद्दिनने तशा अवस्थेतही महाराजांची सेवा निष्ठेने व निरलसपणे केली. तो त्यांची खुणेची भाषा समजू शके. आपला कान महाराजांच्या तोंडाशी नेऊन त्यांचे हृदगत समजून घेण्याचा प्रयत्न तो कष्टपूर्वक करी. पुढे हिवाळा आल्यावर महाराजांचे दुखणे वाढले. त्यांना सर्दी, खोकल्याचा त्रास एकसारखा होऊ लागला. तथापि हिवाळा संपला तसा थोडा आराम वाटू लागला. सुवर्ण मंदिरात जाऊन त्यांनी प्रार्थना केली आणि दानधर्मावर खूप मोठी रक्कम खर्च केली. महाराजांच्या तब्येतीबद्दल ब्रिटिश गव्हर्नर जनरलांनाही काळजी वाटत होती ही गोष्ट त्यांनी दोन डॉक्टर पाठविले यावरून कळते. त्यांच्या वास्तव्याचा परिसर प्रकृती सुधारण्याच्या दृष्टीने तितकासा चांगला नाही असे वाटल्यावरून त्यांना एका चांगल्या ठिकाणी हलविण्यात आले. तथापि ते आता फार दिवसांचे सोबती नाहीत असेच डॉक्टरांचे मत पडले.

पण उन्हाळा सुरू झाला तसे त्यांना पुन्हा अस्वस्थ वाटू लागले. आता आपला अंतकाळ नजीक आला आहे की गोष्ट ते उमजले. दानधर्म, उपाध्यायांकडून अखंड प्रार्थना अशी धार्मिक व परोपकाराची कृत्ये चालू होतीच. धार्मिक पावित्र्यासाठी ख्याती असलेल्या तीर्थांना आणि व्यक्तींना सोन्याचांदीची दाने देण्यात आली. 10 जूनला महाराजांची तब्येत अधिकच बिघडली. बाहेर आंधी (धुळीची वादळे) उठत होती. त्यामुळे त्यांचा खोकला वाढत होता. त्यांना झोप येईनाशी झाली. त्यांचे पाय सुजू लागले. आणि शौचावाटे रक्त जाऊ लागले. ज्योतिषांनी सांगितल्यावरून त्यांनी 13 जूनला किल्ल्यात स्थलांतर केले. गायी, घोडे, हत्ती अशा प्राण्यांच्या सोन्याचांदीच्या आकृत्या आणि रोकड दानधर्म वाटण्यात आला. पाच वेळा त्यांची धान्यतुला करण्यात येऊन ते धान्य गोरगरीबांना आणि भिकाऱ्यांना वाटण्यात आले. प्राणीहत्या बंदीचा हुकूम काढण्यात येऊन तो सबंध पंजाबात लागू करण्यात आला. तथापि आजारात उतार पडेना. आता हृदयाचे स्पंदन वाढले. ही सर्व चिन्हे ओळखून राज्यकारभाराची सूत्रे आपला मुलगा खरकसिंह यांच्याकडे सोपविण्याचे महाराजांनी ठरविले. 21 जूनला सकाळी एक जाहीरनामा काढण्यात आला व त्याप्रमाणे खरकसिंह 'महाराज' झाला आणि ध्यानसिंहाला त्याचा मुख्य मंत्री नेमण्यात आले. त्याआधी खरकसिंहाचा हात त्या डोग्रा प्रमुखाच्या हाती देऊन त्याच्या हस्ते त्याला आपल्या नव्या अधिकारपदाची सूत्रे देण्यात आली.

दिनांक 22 जूनला महाराजांची प्रकृती जास्तच खालावली. मनुष्याचा मृत्युक्षण समीप आला म्हणजे त्याला जमिनीवर काढण्याचा प्रघात हिंदूंमध्ये आहे. कारण त्यायोगे त्या व्यक्तीचा संपर्क मृत्युसमयी पृथ्वीमातेशी येऊ शकतो असे मानले जाते. आता काही क्षणांचाच अवकाश आहे हे राजा ध्यानसिंहाने ओळखले तेव्हा खजिन्यातून दहा लाख रुपयांची नाणी आणवून त्यांचा एक चबुतरा ध्यानसिंहाने बनवून घेतला. त्याच्यावर एक उंची काश्मीरी शाल टाकली व महाराजांना तेथे निजविण्यात आले. ध्यानसिंहाच्या अश्रूंना खंड पडत नव्हता. तो अतीव दुःखित झाला होता.

आपले खजिने, जडजवाहीर वगैरे सर्व संपत्ती आपणास एकवार दाखविली जावी असा हुकूम महाराज रणजितसिंहांनी 24 जून रोजी दिला. कोहिनूर हिराही त्यांना पाहावयाचा होता. तो हिरा जगन्नाथपुरीच्या देवळातील जगन्नाथाला किंवा अमृतसरच्या सुवर्ण मंदिराला द्यावा अशी महाराजांची इच्छा होती. पण खजिनदार बळीराम मिश्र याने तिला नकार दिला. कारण त्याचे मत असे होते की राजाच्या मालकीचा तो हिरा आता खरकसिंहाच्या मालकीचा झाला होता. ह्याबाबत दुसरा

असा प्रवाद आहे की दरबारी मंडळींनी महाराजांना त्यांच्या त्या इच्छेपासून परावृत्त केले. तेव्हा महाराजांनी सुमारे दोन कोटी रुपयांचे दान करून ते सर्वांना वाटले. नंतर त्यांनी आपली शस्त्रेही दरबारच्या मंडळींना वाटली. तेव्हा त्या मंडळींना फार दुःख झाले.

महाराजांची प्राणज्योत आता त्यांच्या देहाच्या कुडीतून अंतर्धान पावण्याच्या मार्गावर होती.* 26 जून रोजी त्यांची शुद्ध हरपली व दुसऱ्या दिवशी—गुरुवारी सूर्यास्तापूर्वी त्यांची प्राणज्योत विझून गेली. महाराजांच्या सगळ्या राण्या, त्यांच्या दरबारचे सरदार, खुद्द खरकसिंह, राजा ध्यानसिंह वगैरे मंडळी रात्रभर त्यांच्या उशाशी बसून होती. ध्यानसिंहाला तर त्याचा शोक मुळीच आवरेना. आपल्या मालकाच्या चितेवर आत्मदान करण्याचा आपला निर्णय त्याने मोठ्या आवेगाने ओरडून सांगितला. असाच निर्णय महाराजांच्या चार राण्या व सात सेविकांनीही जाहीर केला. ह्या बाबतीत कटोचची राणी गुडन हिने पुढाकार घेतला. खरकसिंह व नौनिहालसिंह यांच्याशी आणि पंजाबच्या राज्याशी एकनिष्ठ राहण्याचे वचन तिने ध्यानसिंहाकडून घेतले आणि त्याप्रमाणे ध्यानसिंहाच्या प्रतिस्पर्ध्यांनी त्याच्या बाबतीत खोट्यानाट्या कंड्या पिकवून गैरसमज निर्माण करण्याचे प्रयत्न केले तरी त्यांना आपण बळी पडणार नाही असेही वचन तिने दोघा राजकुमारांकडून घेतले.

सूर्योदयानंतर पवित्र गंगाजलाने महाराजांच्या शवाला स्नान घालण्यात आले. नंतर त्यावर चंदनाचा लेप लावण्यात आला; ते राजवस्त्रांत लपेटण्यात आले आणि नंतर चंदनाच्या शवपेटिकेत ठेवण्यात येऊन अंतयात्रा निघाली. ज्या राण्या सती जाणार होत्या त्या मिरवणुकीत पुढे होत्या. मिरवणुकीतून चालताना त्यांनी आपल्या अंगावरील दागदागिने व जडजवाहीर ब्राह्मणांना वाटून टाकले. ज्या नाण्याच्या चबुतऱ्यावर प्रथम महाराजांचे प्रेत ठेवण्यात आले होते ती सगळी नाणी गोरगरिबांना वाटून टाकण्यात आली. राण्यांच्या मागे मिरवणुकीत खरकसिंह व त्याच्या मागे इतर सरदार चालले होते. ते सगळे बोडके व अनवाणी होते; आणि दुःखातिशयाने त्यांच्यापैकी प्रत्येक जण अधोमुख झाला होता.

नियोजित जागी चंदनाची चिता तयार करण्यात आली होती. तेथे शव ठेवताना राणी गुडनने महाराजांचे शिर आपल्या मांडीवर घेतले. इतर राण्या व सेविका शवाच्या भोवती बसल्या होत्या. निरनिराळ्या धर्मांच्या प्रार्थना म्हणण्यात आल्या. मृतात्म्याच्या छातीवर गीता ठेवण्यात आली. चितेवर तुपानेच भिजविलेली चादर पसरण्यात आल्यावर खरकसिंहाने शवाला अग्नी दिला. अग्नीत त्या सतीही समाविष्ट झाल्या. ऑस्बर्नने लिहिले आहे की आत्मार्पण करणाऱ्या त्या सतींनी

यत्किंचित हूं की चूं केले नाही! त्या तुपाच्या चादरीत त्या सहज सामावल्या गेल्या!

राजा ध्यानसिंहाने तेव्हा चितेत उडी घेण्याचा प्रयत्न पुन:पुन्हा केला. पण इतरांनी प्रत्येक वेळी त्याला अडवून परावृत्त केले.

हिंदू पद्धतीप्रमाणे चौथ्या दिवशी सावडण्यात आले. अस्थी गोळा केल्यावर महाराज व 11 सती यांच्या अस्थींचा प्रत्येकी एकेक कुंभ लाहोरच्या रस्त्यांतून मिरविण्यात आला व त्यावेळी तोफांची अखेरची सलामी देण्यात आली.

गंगेत अस्थिविसर्जन करण्यासाठी नंतर ते कुंभ हरिद्वारला नेण्यात आले. लाहोर-हरिद्वार मार्गावर ठिकठिकाणी लोकांनी त्यांचे दर्शन घेतले. त्यावेळीसुद्धा कित्येकांना दु:खाचा गहिवर अनावर झालेला दिसून आला.

तेरा

व्यक्तिदर्शन

महाराज रणजितसिंह अशा काळात होऊन गेले की त्योवळी भारतात छायाचित्रकला उदयास आली नव्हती. यामुळे महाराजांची छायाचित्रे आज उपलब्ध नाहीत. तथापि चित्रकारांनी काढलेली त्यांची रंगीत चित्रे मात्र उपलब्ध आहेत. पण ही उपलब्ध चित्रे त्यांच्या उत्तर आयुष्यातली आहेत. आणि उत्तर आयुष्यात निरनिराळ्या कारणांमुळे महाराजांचा चेहेरा सुरूप राहिलेला नव्हता.

सय्यद महंमद लतीफ यांनी लिहिलेले 'हिस्टरी ऑफ दि पंजाब' हे पुस्तक 1891 मध्ये प्रथम प्रसिद्ध झाले. त्यात ते लिहितात, "...महाराजांचे व्यक्तित्व सकृद्दर्शनी भारून टाकणारे होते. त्यांच्या वागणुकीची पद्धत दुसऱ्याला आनंद देणारी होती. त्यांचे बोलणेही तसेच सुखद असे. त्यांची चर्या चैतन्यपूर्ण व भावदर्शी होती. उरलेला त्यांचा एकच डोळा जरा मोठा होता. आणि त्याच्यातील नजरेची हालचाल चपल व शोधक होती. डोळ्यातले तेज त्यांच्या मानसिक उत्साहाची व व्यावहारिकपणाची साक्ष देई."

रणजितसिंहांना आपल्या जीवनात लाभलेले यशाचे काही प्रसंग दैवायत्त असतील, अथवा त्यांना ते यश केवळ योगायोगाने वा आकस्मिकपणेही लाभलेले असेल. पण माणसाला जेव्हा त्याच्या प्रयत्नांच्या विविध क्षेत्रांत यश पुनःपुन्हा लाभत जाते तेव्हा त्याची कारणे दैवायत्त वा आकस्मिक म्हणता येत नाहीत. कारण ती खचितच त्याच्या गुणांत व कर्तृत्वात सामावलेली असतात. महाराज रणजितसिंह एक महान विजेते ठरले, यशस्वी राज्यकर्ते झाले आणि विशेष म्हणजे समाजाच्या कनिष्ठ व वरिष्ठ अशा दोन्ही थरात त्यांना भरपूर लोकप्रियता लाभली ह्या गोष्टी जेव्हा आपल्या समोर उभ्या राहतात तेव्हा अशा असाधारण, सर्वांगीण यशाचे रहस्य बाहेर कोठे नसून ते त्या व्यक्तित्वातच असले पाहिजे असेच मानावे लागते. केवळ स्वतःच्या अंगच्या गुणांवरच त्यांनी आपल्या मार्गातील अडचणी व विघ्ने यांच्यावर मात केली. 1799 ते 1839, म्हणजे तब्बल 40 वर्षे

रणजितसिंहांचा अंमल पंजाबात राहिला तेव्हा एवढ्या मोठ्या कालावधीत लढाया, प्रशासन व राजनीती ह्या तिन्ही आघाड्या कर्तृत्वाने गाजविणे हे सुतराम असामान्यत्वाचेच लक्षण होय.

धैर्य व चिकाटी

रणजितसिंहांच्या अंगी अप्रतिम धैर्य होते. त्याचप्रमाणे त्यांच्या ठिकाणी भरपूर शौर्यही होते. लढाईचे भय त्यांच्या मनाला कधीच शिवले नाही. कारण त्यांना मरणाचेच भय वाटत नसे. दैवावर, नियतीवर त्यांचा पूर्ण भरवसा होता. कृतनिश्चयी व प्रयत्नवादी माणसाच्या बाबतीत अपयश ही एक अशक्य गोष्ट असते असे नेपोलिअनप्रमाणे ते मानीत. साध्य करावयाची आपली ध्येये ते आधी निश्चित करीत; आणि मग एका पाठोपाठ एक ती हस्तगत करीत पुढे जात. त्यांना थकवा कसा तो माहीत नसे. त्यांच्या अंगी दुर्दम्य उत्साह वसत होता. तासन् तास ते घोड्यावर बसू शकत. प्रकृती बरी नसताही, ठरावीक वेळ दरबारात बसून ते राज्यकारभारची कामे कोटेकोरपणे करीत. ऑस्बर्न लिहितो, "त्यांच्या धैर्यशीलतेला शांतपणाची व व्यावहारिकतेची साथ होती. त्यामुळे अनावश्यक धोक्यात आपला जीव ते सहसा टाकीत नसत. आणि लढून ज्या गोष्टी प्राप्त करणे आवश्यक आहे असा कौल त्यांचे मन देई, त्यांच्या प्राप्तीच्या प्रयत्नात ते मग कशाचीही तमा बाळगीत नसत. कोणालाही भीत नसत.

चौकस व चाणाक्ष

रणजितसिंह हे एक जन्मजात सेनानी होते. ते कमालीचे चौकसही होते. एखादा नवा माणूस, विशेषतः परदेशी नागरिक त्यांना भेटला की ते त्याला नाना तऱ्हेचे कित्येक प्रश्न विचारीत व शक्य तेवढी माहिती त्याच्याकडून मिळवीत. अशा प्रश्नापैकी बहुसंख्य प्रश्न अर्थातच राज्यशासनाबद्दल असत. पण त्याचबरोबर संरक्षण, धर्म, सामाजिक स्थिती इत्यादी विविध ज्ञानक्षेत्रांतील माहिती त्यांच्याकडून मिळविण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असे. व्हिक्टर जॅकमेंट महाराजांबद्दल म्हणतो, "मला भेटलेल्या भारतीयांमध्ये महाराज रणजितसिंह मला सर्वांत जास्त चौकस वाटले. त्यांनी मला अक्षरशः शेकडो प्रश्न विचारले. त्यांत भारत, ब्रिटिश, युरोप, नेपोलिअन, हे जग व वरचे जग, पाताळ, नंदनवन, आत्मा, ईश्वर, भूत आदी शेकडो विषयांवरील प्रश्न होते."

आणि या बाबतीतील त्यांचा एक विशेष असा की मिळविलेले ज्ञान व माहिती

ते चांगली स्मरणात ठेवीत. आपल्या राज्यातील हजारो खेड्यापैकी प्रत्येकाचे नाव व स्थान ते बिनचूकपणे सांगू शकत. एका प्रसंगी त्यांनी सतलजच्या उजव्या तीरावरील सर्व जिल्ह्यांची व जिल्हाधिकाऱ्यांची नावे आणि प्रत्येक जिल्ह्यातील शिपायांची संख्या मुखोद्गत केल्याप्रमाणे सांगितली होती. ते निरक्षर होते. तरी त्यांची बुद्धी एवढी कुशाग्र व स्मृती इतकी तल्लख होती की सगळी उपयुक्त माहिती त्यांच्या मेंदूत जणू ताजी राही. 1831 मध्ये रूपार येथे महाराजांची भेट लॉर्ड बेंटिंकशी झाली तेव्हा त्यांनी ब्रिटिश लष्करी साहित्याची पाहणी बारकाईने केली; व त्यांच्या लष्कराला परिचित नसलेले कित्येक डावपेच व कवायती ब्रिटिश शिपायांना पुनः पुन्हा करावयास लाविल्या. कोणाही अन्य भारतीयापेक्षा रणजितसिंह एक फार श्रेष्ठ दर्जाचे लष्करी शिपाई व जाणकार अधिकारी होते. एखाद्या इंग्रज फील्ड मार्शलच्या तोडीची त्यांची बुद्धिमत्ता होती. आणि जणू काही आपण स्वतःच एक ब्रिटिश सेनापती आहोत अशा आविर्भावातच ते तेथे हिंडले अशी हकीगत जेम्स स्किनर याने नमूद केली आहे.

विलासप्रियता व संयमन

युरोपातील समकालीन लष्करी धुरीणांप्रमाणे महाराज रणजितसिंहांना मदिरा आणि मदिराक्षी यांच्याबद्दल विलक्षण आसक्ती होती. त्यांनी किती स्त्रियांशी विवाह केले आणि त्याव्यतिरिक्त त्यांच्या जनानखान्यात विवाहबाह्य संबंधाच्या आणखी किती स्त्रिया होत्या याबद्दलचे विवरण पूर्वीच्या एका प्रकरणात करण्यात आले आहे. मदिरेचीही त्यांना कमालीची आसक्ती होती. तथापि ज्या काळात रणजितसिंह होऊन गेले तो लक्षात घेता मदिरापान हे काही अनुचित; व त्यातही राजाच्या बाबतीत अनुचित होते असे म्हणता येणार नाही. बॅरॉन ह्यूगेलने म्हटले आहे की प्रत्येक जनावराचे मांस (अपवाद गोमांसाचा); हिरेमोती, अफू, कस्तुरी आणि विविध वनस्पती यांच्या मिश्रणापासून तयार केलेले खास पेय ही महाराजांची मदिरा होती. त्या पेयाला तो 'सैतानाचे पेय' असेच म्हणतो. पण कर्तव्याची हाक येताच, अथवा एखाद्या मोहिमेवर निघावयाचे झाल्यास मग मात्र महाराज सर्व मोह बाजूला सारून स्वकर्तव्यात प्राणपणाने समरस होत. त्यांची स्वतःची आई आणि त्यांची पहिली सासू सदा कौर या दोघींनीही स्त्रीमोहाच्या आमिषाच्या आधारे त्यांच्याकडून काही गोष्टी साध्य करून घेण्याचा घाट घातला असता त्यांचे अंतःस्थ उद्देश ओळखून महाराजांनी स्वतःच्या व्यसनाधीनतेवर आणि मोहवशतेवर वेळीच नियंत्रण घातले. गव्हर्नर जनरल किंवा त्यांचे प्रतिनिधी अशा खाशांच्या

आदर-सत्कारासाठी पुष्कळदा ते नाचगाण्याचे व खाण्यापिण्याचे विलासी कार्यक्रम आयोजित करीत. पण त्यामागे त्यांचा उद्देश फार वेगळा असे. त्या विलोभनीय कार्यक्रमांच्या साहाय्याने पाहुण्यांना खूष ठेवून ते त्यांच्याकडून विविध स्वरूपाची उपयुक्त माहिती काढून घेण्याचा प्रयत्न करीत.

तथापि अतिरिक्त मद्यपानापायीच त्यांची प्रकृती बिघडली आणि शेवटी मृत्यूही ओढवला हे खोटे नसावे. पण हा दुर्गुण तत्कालीन स्थितीत व समाजस्थितीत शिरलेला होता. तथापि मदिरापानाचे व्यसन असूनही त्यांनी स्वतःचा तोल कधी सुटू दिला नाही. किंवा दारूने झिंगलेल्या माणसाचे जे हीन दर्शन घडते त्या पातळीवरही त्यांनी स्वतःला कधीच जाऊ दिले नाही. उलट मद्यपान केले असले तरी ठरावीक क्षणी ते आपल्या कर्तव्यास लगेच उभे राहत.

बाह्यतः परस्परविरोधी भासणाऱ्या गोष्टी रणजितसिंहांच्या व्यक्तित्वात एकत्र झाल्याचे पाहून अनेकांना आश्चर्य वाटते. निरक्षर असूनही त्यांना भरपूर व्यवहारज्ञान आणि शहाणपण होते. ते अत्यंत बुद्धिमान होते. त्यांच्या जिज्ञासेला कधीकधी बालिश स्वरूप प्राप्त होई. शाळेत जाऊन प्राप्त होणारे पद्धतशीर शिक्षण त्यांना मिळालेले नव्हते. तरी निरनिराळ्या व्यक्तींशी येणारा संपर्क व हाताखालून गेलेली विविध कामे यांच्यामुळे त्यांना त्यावेळच्या राजभाषेचे—पर्शियनचे कामचलाऊ ज्ञान झाले होते; आणि फकीर अझिझुद्दिनसारख्या पंडिताने तयार केलेल्या मसुद्यात ते योग्य व आवश्यक सुधारणा सुचवू शकत इतकी पात्रता त्यांनी कमाविली होती. अशिक्षित असूनही ज्ञान व विद्वत्ता यांच्याबद्दल त्यांना अकृत्रिम आदर वाटे. त्यांनी पेशावरवर जेव्हा पहिली स्वारी केली तेव्हा तेथील एका मुसलमान महंताचे ग्रंथालय सुरक्षित राखण्याचा हुकूम त्यांनी आपल्या सैन्याला दिला होता.

त्यांच्या व्यक्तिदर्शनाचे मूल्यमापन करताना डॉ. डब्ल्यू. एल. मॅक्ग्रेगॉर आपल्या 'हिस्टरी ऑफ दी शीखस्' या पुस्तकात म्हणतात, ''रणजितसिंहांचे स्मित प्रसन्न व बोलण्याची पद्धत सहज, सोपी आहे. आपल्या बोलण्याचे ओझे दुसऱ्याच्या माथी मारून ते श्रोत्याला कंटाळवाणे कधीच करीत नाहीत. कोणत्याही विषयावर ते आपले मत चटकन बनवू शकतात आणि ते व्यक्त करताना त्यांची जीभ शब्दासाठी कधीच अडत नाही. संभाषण करीत असता, ते चर्चाविषय आधी नीट समजावून घेतात आणि त्यासाठी त्यांना जास्त वेळ मुळीच लागत नाही. त्यांची विचारशक्ती आणि तारतम्य बुद्धी उच्च दर्जाची आहे.''

एक राज्यकर्ता

रणजितसिंह हे एक असामान्य राज्यकर्ते होऊन गेले. त्यांनी पंजाबचे एक संघराज्य बनविले. आणि दूरदूरच्या प्रदेशांपर्यंत आपला अंमल पोहोचविला. आपल्या अंगच्या राजकीय व प्रशासकीय गुणांच्या आधारे त्यांनी ज्या योजना साकार केल्या त्यातून ती कार्यसिद्धी होऊ शकली.

पहिली गोष्ट म्हणजे ते फार महत्वाकांक्षी होते. दिग्विजयास निघण्याची प्रेरणा त्यांना त्यांच्या महत्वाकांक्षेनेच दिली. पण महत्वाकांक्षेने मिळविलेले राज्य स्थिर पायावर उभे करणे तितकेच आवश्यक होते. आणि ते कार्य त्यांनी स्वतःच्या राजकीय व प्रशासकीय गुणांच्या जोरावर केले. साहजिकच त्यामुळे ते लोकांचे आवडते झाले. महाराज रणजितसिंहांना जनमनात केवढी प्रचंड लोकप्रियता त्यावेळी लाभली होती याचा एक प्रत्यक्ष व वैयक्तिक पुरावा उपलब्ध आहे. मिस एमिली ईडन म्हणते, ''लोकांना महाराजांबद्दल जो अकृत्रिम प्रेमादर वाटतो त्याचे उदाहरण आम्हांला अमृतसर शहरात नुकतेच पाहावयास मिळाले. 'आपल्या महाराजांचे' दर्शन उत्कट उत्सुकतेने घेऊन लोक त्यांच्या पायाला अत्यादराने स्पर्श करीत होते.''

महाराजांची ही लोकप्रियता जनतेप्रमाणेच त्यांच्या मुलकी व लष्करी अधिकाऱ्यांमध्येही तशीच पसरलेली होती. ते बहुतेक सगळे अधिकारी त्यांच्याशी त्यांच्या संबंध हयातीत एकनिष्ठ राहिले. रणजितसिंह खऱ्या-खऱ्या अर्थाने लष्करी सेनापती होते. कारण ते हाताखालच्या अधिकाऱ्यांना केवळ तपशीलवार सूचना देऊनच थांबत नसत. तर जेव्हाजेव्हा व जेथेजेथे गरज पडेल त्याप्रमाणे ते स्वतः हाती शस्त्र घेऊन आघाडीच्या अग्रभागी उभे ठाकत, आणि अधिकाऱ्यांच्या बरोबरीने आपल्या जीव धोक्यात घालीत. त्याचप्रमाणे आपल्या लष्करातील सर्वांच्या हितसंबंधाची काळजी ते तत्परतेने घेत. लढाईत कामास येणाऱ्यांच्या कुटुंबांसाठी ते योग्य तरतूद करीत व विजय मिळविण्यासाठी ज्यांचे शौर्य कारणीभूत ठरे त्यांना बक्षिसी देऊन बूज राखीत. ऑस्बर्नने लिहिले आहे की, ''महाराज जेव्हा स्वतः आघाडीवर जात तेव्हा त्यांच्या हातांत शस्त्रांबरोबर सोन्याची कडी असत आणि शौर्य व मर्दुमकी गाजविणाऱ्या वीराला ते त्यांतली कडी देत.''

त्यांचे औदार्य एवढे विशाल होते की त्याचा लाभ पराजित प्रतिस्पर्ध्यालाही होऊ शके. पराभूताचीही कदर राखून त्याच्या उदरनिर्वाहासाठी त्याला ते एखादी जहागिरी देत. महाराजांनी ज्या नबाबांना पराभूत केले होते त्यांच्या पुत्रांना वा इतर नातेवाइकांना त्यांनी आपल्या दरबारात हुद्याच्या जागा दिल्या होत्या. हे सत्य पुरेसे

बोलके आहे. साहजिकच महाराज म्हणजे त्यांना आपला हितकर्ता व आश्रयदाता वाटे. शत्रूला जिंकावे कसे, नमवावे कसे आणि शरण आणून काबूत ठेवावे कसे ह्या गोष्टींची सारी तंत्रे त्यांना छान अवगत होती.

त्यांना माणसांची पारखही चांगली होती. कोणाच्या अंगी कोणते गुण आहेत हे नीट हेरून ते त्याची नियुक्ती नेमकी अशा ठिकाणी करीत की त्याच्या गुणांचा कमाल उपयोग व्हावा. यामुळेच भिन्न धर्म, श्रद्धा व व जातींच्या किती तरी व्यक्ती त्यांच्या दरबारात मुलकी अधिकारपदांवर व लष्करात मोठ्या हुद्यांवर, केवळ त्यांच्या अंगचे गुण, कार्यक्षमता व कर्तव्यतत्परता पाहून नेमल्या होत्या. अशा व्यक्तींमध्ये हिंदू, मुसलमान व शीख यांच्या बरोबरीने युरोपिअन व अँग्लोइंडियनांचाही भरणा होता. अशा माणसांच्या धर्माकडे संशय वा गैरसमजांनी न पाहता ते त्यांच्या गुणांकडे पाहत. दृष्टिकोनाची ही उदारता महाराजांच्या अंगची बुद्धिमत्ता व्यक्त करते.

असाच उदार दृष्टिकोन ते प्रजेच्या बाबतीतही ठेवीत. प्रजेत मुसलमानांचा भरणा पुष्कळसा होता हे लक्षात घेतले म्हणजे त्यांच्या दृष्टिकोनाचे ते वैशिष्ट्य ठरते. मोगल बादशहा आणि त्यांचे वंशज यांनी भारतात इस्लामचे जे धोरण अवलंबिले त्यामुळे शीख राजकारण व खालसा धोरण मुसलमानांशी फारसे स्नेहशील व सहिष्णू नव्हते. तरीही आपल्या प्रजेतील मुसलमानांशी कठोरपणे वागावे अथवा भेदनीतीखाली त्यांना वाकवावे याविरुद्ध महाराजांची वागणूक होती. उलट, अशा प्रकारे एखादा अधिकारी वागल्यास ते त्यालाच धारेवर धरीत. आपल्या अंगावर शीखाने डुकराचे कातडे फेकले म्हणून एक मुसलमान त्यांच्याकडे तक्रार घेऊन आला असता महाराजांनी गुन्हेगाराला अगदी योग्य अशी शिक्षा फर्माविली. त्या शीख गुन्हेगाराच्या वतीने एक सरदार रदबदली करण्यास आला असता महाराजांनी त्याला असे सांगितले की शिक्षा कडक व जरबेची नसल्यास शीखांतले आक्रमक लोक मुसलमानांना जिणे कठीण करून टाकतील. त्या काळी धार्मिक संस्थांना जी अनुदाने देण्यात येत त्यांत मोठा वाटा हिंदू मंदिरे व शीख गुरुद्वारे यांचा असे हे सत्य असले तरी मुसलमानांच्या मशिदींनाही योग्य प्रमाणात अनुदाने देण्यात येत. मोडकळीस आलेल्या मशिदींनाही जीर्णोद्धारास महाराज जाणीवेने साहाय्य करीत. शीख संघटनांच्या पुढाऱ्यांकडून लाहोर शहर स्वतःच्या ताब्यात घेतल्यावर तेथील सुनहरी मशीद त्यांनी मुसलमानांना परत केली. अफगाणिस्तान जिंकून तेथे शाह सूझाला स्थानापन्न करण्यासाठी 1838 मध्ये ब्रिटिशांना अभिवचन देताना त्याबद्दल एक अट घातली होती. 1024 मध्ये

गझनीच्या महंमदाने लुटून नेलेले हिंदूंच्या सोमनाथ मंदिराचे दरवाजे परत केले पाहिजेत ही ती अट होय. महाराज रणजितसिंहाना सर्व धर्मांविषयी समान आस्था असल्याची साक्ष ही उदाहरणे देतात.

एकतंत्री शासनाला विरोध

महाराज रणजितसिंह यांच्या हाती अमर्याद सत्ता होती. पण तरीही ते एखादे जुलमी राजे नव्हते; की एकतंत्री राज्यकारभार करणारे एखादे शासकही नव्हते. आपल्या मंत्र्यांपैकी एखाद्या शहाण्या, अनुभवी मंत्र्याने चूक दाखवून दिल्यास ती मानून, सुधारणा करण्याची त्यांची तयारी असे. तसेच जनमताचा कौल मानण्यासही ते नेहमी सिद्ध असत. वहिउद्दिनने आपल्या पुस्तकात महाराजांची दोन महत्त्वाची फर्माने उद्धृत केली आहेत. ती पर्शियनमध्ये असून त्यांच्यावर राजमुद्राही आहेत. आता ती लाहोरच्या फकीर कुटुंबाच्या ताब्यात आहेत.

फकीर नुरुद्दिनला लिहिलेल्या पहिल्या फर्मानाचा अनुवाद पुढीलप्रमाणे आहे. ''महाराज रणजितसिंह निक्षून असा हुकूम देत आहेत की लाहोर शहरात जनतेशी कोणीही जुलमाने किंवा दादागिरीने वागता कामा नये. महाराजांनी स्वतःच एखाद्या नागरिकाविरुद्ध चुकीचा हुकूम काढल्यास तो त्यांच्या नजरेस त्वरित आणावा; म्हणजे त्याची दुरुस्ती केली जाऊ शकेल. कोणीही व्यक्ती अथवा अधिकारी तुमच्या सल्ल्याविरुद्ध अथवा सूचनेविरुद्ध वागू लागल्यास तुम्ही त्याला एक औपचारिक पत्र पाठवावे. म्हणजे ते पुरावा समजून त्याच्या आधारे महाराज त्या व्यक्तीला त्याच्या आज्ञाभंगाबद्दल शिक्षा करतील.''

दुसरे फर्मान सरदार अमीरसिंह व फकीर नुरुद्दिन ह्या दोघांच्या नावे काढलेले आहे. राजेरजवाडे, राजकुमार, सरदार व दरबारचे अधिकारी यांच्यापैकी कोणीही लहरीप्रमाणे व चुकीच्या मार्गाने वागू लागल्यास त्याच्याविरुद्ध जनतेला संरक्षण देण्याची तरतूद त्यात आहे. ते फर्मान असे :

''राजकुमार खरकसिंह व शेरसिंह, राजा ध्यानसिंह, राजा सुचेतसिंह अथवा जमादार खुशालसिंह यांनी कोणतीही अयोग्य व चुकीची गोष्ट केल्यास ती तुम्ही महाराजांच्या नजरेस आणावी, दुसरे असे की तुम्ही तुमचे विश्वासू प्रतिनिधी सरदारांच्याकडे पाठवावेत व कोणत्याही अनुचित कृतीपासून त्यांनी अलिप्त राहावे अशी सूचना त्यांना द्यावी. ते तसे न वागल्यास तुम्ही ती गोष्ट महाराजांच्या नजरेस आणावी. कोणाच्याही जमिनीचा ताबा बळजबरीने घेण्यास, अथवा कोणाचेही घर पाडण्यास तुम्ही परवानगी देऊ नये. तसेच लाकूडतोडे, वैरण विकणारे व घोड्यांचे

नालबंद यांच्यावर कोणाचीही दादागिरी चालू देऊ नये. कोणाशीही कठोरपणे वागू नये. लोकांनी महाराजांकडे पाठविण्यासाठी अर्ज दिल्यास ते दाबून ठेवू नयेत. कोतवालाला बोलावून त्याच्याकडून दररोज साऱ्या घडामोडींची हकीगत ऐकून घेत जावी. व प्रत्येकाचे हक्क सुरक्षित राहून कोणावरही जुलूम-जबरदस्ती केली जात नाही याची खात्री करून घेत जावी."

ह्या फर्मानांची भाषा व शब्दरचना जरा क्लिष्ट वाटली तरी राजा हा परमेश्वराचा अवतार वा प्रेषित असतो, तो कधीच चुकत नसतो अशा स्वरूपाच्या कोणत्याही समजुती रणजितसिंहांनी उराशी बाळगल्या नव्हत्या हे स्पष्टपणे कळून येते. राजाही चुकतो, एक मनुष्य ह्या दृष्टीने तोही स्खलनशील असू शकतो याची जाणीव त्यांना होती हे त्यातून कळून येते. स्वतःकडून व स्वतःप्रमाणेच इतर राजांकडून प्रजेवर जुलूम केला जात नाही हे जागरूकपणे पाहण्याची केवढी खबरदारी महाराज रणजितसिंह घेत असत हेच त्यातून दिसून येते. त्यांनी आपल्या राजवाड्यात एक 'अर्ज पेटी' ठेविली होती. व तेथे येण्या-जाण्यासाठी कोणालाही पूर्ण मुभा होती. त्या पेटीच्या कुलपाची किल्ली महाराज स्वतःजवळ ठेवीत. नंतर ठरावीक दिवसांनी ते पेटीत पडलेले अर्ज काढून घेत व दरबारच्या अधिकाऱ्यांकडून वाचून घेत. आणि त्या त्या अर्जांतील तक्रारीबाबत त्वरित उपाययोजना करण्याचे आदेश देत. हाही उपक्रम वरील आदर्श गोष्टींना पूरक असाच आहे.

सामान्य नागरिकांच्या हक्करक्षणासाठी त्यांनी आणखीही एक मार्ग योजिला होता. त्याची तुलना सध्याच्या भारतीय घटनेतील तरतुदींशी केली जाऊ शकते. लहान-मोठ्या सर्व नोकऱ्या सर्व धर्मांच्या लोकांना मिळण्यास मोकळ्या असत. त्यांच्यासाठी पात्रता ठरे ती गुणांवरून. म्हणूनच महाराजांचा प्रत्येक अधिकारी एकनिष्ठ होता. नागरी व लष्करी उच्चाधिकारांच्या जागा भरताना हिंदू व शीख यांच्याप्रमाणे मुसलमांनानाही योग्य प्रतिनिधित्व दिले जाई. महाराजांच्या सरकारात दोन मंत्री, एक गव्हर्नर, इलाही बक्ष व मिया घाऊस हे सेनापती (जनरल्स) आणि कित्येक कर्नल्स मुसलमान होते. तसेच पोलीस, पुरवठा व न्याय ह्या खात्यांत 92 ज्येष्ठ अधिकारी मुसलमान होते अशी नोंद वहीउद्दिननेच केलेली आहे. सार्वजनिक मालमतेचे संरक्षणही अशाच जागरूकतेने केले जाई.

चौदा

व्यक्तित्वावर दृष्टिक्षेप–1

आधुनिक पंजाबच्या इतिहासात महाराज रणजितसिंह यांचे स्थान फार महत्वाचे आहे. आधीच्या काही प्रकरणांतून सांगितलेल्या हकीगतींच्या द्वारा ते कळून येण्यासारखे आहे. महाराजांच्या व्यक्तित्वाच्या अंतरंगात शिरून त्यांच्या अनेकांगी स्वभाव-कर्तृत्वाचा आणखी थोडा अभ्यास केल्यास त्यांची महानता आणि वैशिष्ट्य व महत्त्व यांच्यावर अधिक प्रकाश पडू शकेल.

दिनक्रम

राजा असूनही रणजितसिंह आपल्या दररोजच्या वागणुकीत फार नियमित असत. ते रोज अगदी प्रातःकाळीच उठत; आणि न चुकता व्यायाम करीत. कधी ते घोड्यावरून रपेट करीत; कधी हत्तीवरून फिरायला जात, अथवा पालखीतूनही निघत. त्या काळी पंजाबात प्रचलित असलेले सर्व व्यायाम त्यांना अवगत होते. रोज नियमाने ते खूप दण्ड, बैठका काढीत. पाचसहा शेर वजनाच्या जोड्याही फिरवीत. त्या विकत आणण्यासाठी दिलेल्या हुकमाची प्रत दप्तरी उपलब्ध आहे. वजन उचलण्याचाही व्यायाम ते करीत असत. अधूनमधून गावात चक्कर मारून राजा या नात्याने सद्यःस्थितीचे अवलोकन-निरीक्षण करीत.

महाराजांच्या सकाळच्या रपेटीच्या वेळची मनोरंजक हकीगत ऑस्बर्नने लिहून ठेविली आहे. तो म्हणतो, "महाराज प्रायः रोज पालखीतून खूप मोठ्या प्रदेशात रपेट करून येत. न्याहारीसाठी खणखणीत भूक लागावी असा त्यांचा उद्देश असे. त्यांच्या लवाजम्यात अशा वेळी घोड्यावरचे काही दरबारी, सुमारे 150 घोडेस्वार आणि एक 12 पौंडी तोफ असे. फिरतीवर असताना सूर्योदयालाच त्यांच्या तंबूपुढे घोडेस्वार कवाईत करीत. हत्ती, घोडे, पालखी आधीपासूनच तयार असे. त्याशिवाय लवाजम्यासोबत दोन जादा हत्ती घेतले जात. पैकी एकाचा उपयोग शामियाना, सतरंज्या-गालिचे इत्यादी बैठकीचे सामान नेण्यासाठी आणि दुसऱ्याचा रसद

(खाद्यवस्तू) नेण्यासाठी केला जाई. याप्रमाणे सुमारे चार तास भ्रमंती करून ते राजवाड्यात परत येत व तेथे दुपारपर्यंत दरबारात बसून कामकाज पाहत. नंतर विश्रांतीसाठी खासगीत जात आणि संध्याकाळपर्यंत जनानखान्यात असत.''

महाराज कधीकधी आपला दरबार सकाळी बाहेर उघड्यावरही भरवीत. तशी इच्छा झाली म्हणजे मग त्यासाठी एखाद्या राईची जागा निवडली जाई. आणि आवश्यक तेवढी तजवीज लगेच तेथे करण्यात येऊन नेहमीप्रमाणे दरबार भरे व कामकाज चाले. चार एक तास याप्रमाणे काम झाल्यावर दुपारी उपाहारासाठी ते तहकूब केले जाई. आपल्या भोजनातही महाराज कमालीचा वक्तशीरपणा राखीत असत हे कित्येकांनी प्रत्यक्षात पाहिले आहे. महाराजांचा नातू नौनिहालसिंह याच्या विवाहाला, गव्हर्नर जनरलचे प्रतिनिधी म्हणून सर हेन्री फेन उपस्थित होते. एकदा सर फेन व महाराज एकमेकांशेजारी बसून कवायत पाहात होते. तेव्हा मधूनच महाराज जागेवरून उठून गेल्याचे पाहून सरसाहेब बुचकळ्यात पडले. पण थोड्याच वेळाने ते आपल्या जागी परत आले. तेव्हा ते खाना घेण्यासाठी गेले होते असे कळले. आणि त्यांचा आहारविषयक नियमितपणा पाहून सरसाहेबांना महाराजांचे कौतुक वाटले.

दुपारच्या भोजनानंतर महाराज सुमारे तासभर विश्रांती घेत. नंतर ते प्रार्थना मंदिरात जात व 'ग्रंथसाहेब'चे वाचन, श्रवण करीत. त्यानंतर ते तिसऱ्या प्रहरच्या दरबारला जात. अशा वेळी ते प्रामुख्याने हिशेबांचे कामकाज पाहत. नंतर ते एखाद्या वाहनावरून रपेट करीत; किंवा एखाद्या कवायतीची चाचणी घेत. आणि ह्या कार्यक्रमांच्या निमित्ताने त्यांचे जे बाहेर हिंडणे-फिरणे होई, त्यावेळी ते जनतेची गाऱ्हाणी, तक्रारी वगैरे ऐकून घेत.

न्याहारी

ऑस्बर्न व त्याचा जोडीदार काही वेळ महाराजांचे बरोबर होता. सर्वांचीच न्याहारी व्हावयाची होती. म्हणून महाराजांनी त्यांना न्याहारीस बोलाविले. मेज, खुर्च्या लावून काही क्षणांतच सर्व सिद्धता उत्तम तऱ्हेने करण्यात आली. पण महाराज पालखीतच थांबले; व पालखीही भोयांच्या खांद्यावर तशीच होती. नंतर एक सेवक तेथे आला व वाकून ओणवा झाला. त्याची पाठ हेच महाराजांच्या न्याहारीचे मेज होते. तथापि उभयतांच्या न्याहारीचे पदार्थ मात्र एकच होते. भात, कढी-आमटीचे काही प्रकार, काही पक्वान्ने व दूध असे न्याहारीसाठी होते. सर्व मंडळी हातांनीच जेवली. त्यावेळी ताज्या, हिरव्या पानांना चुया लावून त्यांचे तयार केलेले द्रोण

ऑस्बर्नच्या विशेष लक्षात राहिले. कारण त्यांतून द्रवाचा थेंबही गळू शकत नव्हता. ही कला काळाच्या ओघात आता नाहीशी होत चालली आहे.

पाकसिद्धीतील दक्षता

महाराजांवर अन्नातून विषप्रयोग केला जाऊ नये याची काळजी नोकरवर्गाकडून फार दक्षतेने घेतली जात असे. कारण त्या काळात राजावर अन्नातून विषप्रयोग केला जाणे हा प्रकार काही अपरिचित नव्हता. महाराजांसाठी केल्या जाणाऱ्या पाकसिद्धीवर खास देखरेख करणारा आधिकारी म्हणून हकीम बिशनदासची नेमणूक करण्यात आली होती. व तो खुद्द फकीर नुरुद्दिनच्याच हाताखाली काम करीत असे. निरनिराळे खास पदार्थ तयार झाले म्हणजे, खास नेमलेल्या अनुभवी माणसांकडून, फकीरच्या समोर त्यांचा नमुना खाऊन पाहण्यात येई. शिवाय ज्यातून विषाची परीक्षा चटकन केली जाऊ शकते अशाच भांड्यांतून ते त्यांना खाण्यासाठी दिले जात. ते खाण्याऱ्यांवर काय परिणाम होतो याचा अंदाज नंतर दोन तासपर्यंत घेतला जाई आणि पदार्थ ठीक, चांगले (शुद्ध, खाण्यालायक) आहेत असे ठरल्यास ते ज्या भांड्यांत ठेविले जात ती फकीरच्या ताब्यात देण्यात येत. लगेच तो ती कुलपात ठेवून, वर मोहोर करी. आणि असे अन्न मग महाराजांना देण्यात येई. अशा स्वरूपाच्या दक्षतेमुळे अन्नातील संभाव्य विषबाधेला आळा बसे. तथापि महाराजांचे व्यक्तित्वच एवढे जबरदस्त व छाप पाडणारे होते की तसा दुष्टपणा करण्याचा विचार त्यांच्या शत्रूच्याही मनात उद्‌भवणे अशक्य होते. महाराजांवर कधीकाळी विषप्रयोग करण्याचा प्रयत्न कोणी केल्याचे कोणत्याही कागदपत्रांवरून आढळून आलेले नाही.

औषधे

महाराजांना दिल्या जाणाऱ्या औषधांबद्दलही अशीच काळजी घेतली जाई. कारण वरीलसारखी शंका त्यांच्या खासगी कारभाऱ्यांना औषधांबद्दलही येत असे. इतर पुष्कळ राजांप्रमाणे रणजितसिंहही, भेटेल त्या वैद्याचा सल्ला घेत असत. पण उपचार मात्र काही मोजक्याच वैद्यांकडून घेत. एकदा एक ब्रिटिश शिष्टमंडळ सिमल्याहून आले होते. त्यात ड्रुमॉण्ड नावाचे एक डॉक्टर होते. फकीर अझिझुद्दिन लगेच त्यांना भेटले, आणि महाराजांच्या तब्येतीची एक तपशीलवार टिपणी ड्रुमॉण्डना देऊन त्यांनी औषधोपचाराचा सल्ला मागितला. तथापि त्यांच्याकडून औषधे आली तरी महाराज ती नेहमी घेत नसत. उलट ती प्रथम त्यांच्या काही

सरदारांना दिली जात. आणि त्यांनी औषध घेतल्यावर त्यांना काही वेळ बंद खोलीत ठेविले जाई. औषधांचा काही वा कोणता परिणाम होत आहे ते याप्रकारे आधी अजमाविले जाई. अशी काळजी का घेतली जात असे हे अगदी स्पष्टच आहे.

गुरुदासपूर जिल्ह्यात दिनानगर येथे एक छानदार उद्यान होते व त्याच्यामधून एक कालवा वाहत होता. महाराज उन्हाळ्याचे महिने तेथे घालवीत. त्यांच्यासाठी शालींची खास राहुटी बनविली जाई. ती समोरून उघडी असे. तेथे महाराज मोकळ्यावर झोपत. पहाऱ्यासाठी भोवती काही शिपाई असत. महाराजांची ढाल-तलवार नेहमी त्यांच्या उशाशीच असे. सकाळी घोड्यावरून रपेट करण्याची इच्छा झाल्यास त्याचा उपयोग होई.

बहाद्दर स्वार

रणजितसिंह अंगलटीने बारीक होते. त्यातच वाकून, कुबड आल्यासारखे चालण्याची त्यांना सवय असल्यामुळे ते अधिकच ठेंगणे वाटत. 1838 मध्ये ऑस्बर्नने महाराजांना पाहिले तेव्हा ते त्याला जरा दुबळे वाटले. त्यांच्या पायात कमजोरपणा असावा असे ते चालताना दुसऱ्याला वाटे. पण अशी सगळी कमजोरी, त्यांनी एकदा घोड्याला टाच मारली की कोठल्या कोठे पळून जात असे. घोड्यावरून रपेट करणे हा त्यांचा आवडता व्यायाम होता. जेव्हा जेव्हा महाराज चिंताग्रस्त असत तेव्हा ते घोड्यावरून रपेट करण्यासाठी बाहेर पडत आणि अनेक महत्त्वाचे निर्णय त्यांनी त्याप्रमाणे घोड्यावरून रपेट करीत असतानाच घेतले असल्याचे फकीर कुटुंबियांनी सांगितले आहे. महाराजांच्या अश्वप्रेमाबद्दल मागील एका प्रकरणात तपशीलाने लिहिण्यात आलेले आहेच. त्यांच्या घोड्यांचा साजश्रृंगार किमती व भपकेबाज असे. घोड्यांची निगाही उत्तम प्रकारे ठेविली जाई. या कामी महाराजांनी खर्च केलेली एकूण रक्कम 50 लाख रुपयांपेक्षा कमी नव्हती. एखादे चांगले, उमदे जनावर आढळल्यास त्याच्यासाठी रु. 20,000 पर्यंत खर्च करण्यास त्यांनी कधीच मागे पाहिले नाही. एखाद्या राजाकडून खंडणी वसूल करताना रोकडच्या ऐवजी घोडेही स्वीकारण्यास ते तयार असत.

अश्वप्रेमाबरोबर अश्वारोहण कलेतील त्यांचे प्रावीण्यही मशहूर होते. त्यांनी ते आपल्या सरदारांना रूपार येथे दाखविले होते. धावत्या घोड्यावरून आपल्या तलवारीच्या टोकाने लोट्याच्या विवक्षित बिंदुस्थानी स्पर्श करण्याचे अप्रतिम कौशल्य त्यांनी तीन वेळा दाखविले होते. आणि तेव्हा त्यांचे वय 42 वर्षांचे होते.

मुलांचा लळा

प्रसंगपरत्वे महाराज रणजितसिंह कठोरपणे वागत; आणि अशा वेळी ते भावनेची कदर मुळीच करीत नसत हे खरे असले तरी त्यांना मुलांचा फार लळा होता आणि पशुपक्ष्यांबद्दलही त्यांना आत्यंतिक प्रेम होते हेही याचबरोबर खरे आहे. त्यांच्या व्यक्तित्वात दयाभाव प्रकर्षाने वास करीत होता. देखणी व चलाख मुले आपल्या भोवती असावीत असे त्यांना नेहमी वाटे. त्यांच्याशी खेळणेही त्यांना मनापासून आवडे. अशा निवडक मुलांच्या सहवासात ते नेहमी असत व रमत. आपल्या फुरसतीच्या वेळेचा उपयोग अशा मुलांना शिकवून शहाणे करण्याकडे करीत. ह्या तालमीत शिकून मोठे झाल्यावर ही मुले विश्वासू, कार्यक्षम व लायक अधिकारी नोकर, सैनिक वगैरे बनावेत व त्यांचा उपयोग देशाला व्हावा असा महाराजांचा त्यामागील उद्देश असे. राजा ध्यानसिंहाचा मुलगा हिरासिंह आणि फकीर कुटुंबातील काही मुले त्यांच्या ह्या उदात्त उपक्रमाची काही उल्लेखनीय उदाहरणे होत.

या संदर्भात ऑस्बर्नने राजा शेरसिंहाचा मुलगा (म्हणजे महाराजांचा नातू) प्रतापसिंह याची फार प्रशंसा केली आहे. महाराजांना भेटण्यासाठी पाठविण्यात आलेल्या ब्रिटिश शिष्टमंडळाबरोबर जाण्यासाठी प्रतापसिंहाला त्याचा पिता शेरसिंह याने (ते शिष्टमंडळ त्यांच्या जहागिरीतून जात होते म्हणून) आज्ञा केली तेव्हा हा पोरगा अवघा सात वर्षांचा होता. त्याला छानदार पोषाख घालण्यात आला होता. त्याच्याजवळ एक शोभिवंत ढाल व तोड्याची बंदूक होती. ब्रिटिशांना पोरगा मोठा चुणचुणीत, व त्याच्या मोठ्या डोळ्यांमुळे बुद्धिमान वाटला. तो दिसतही होता मोठा सुंदर. त्याचे वागणेसुद्धा सफाईदार व सुसंस्कृत वळणाचे होते. गव्हर्नर जनरलच्या वतीने प्रतापसिंहाला त्यावेळी सोन्याची साखळी व घड्याळ देण्यात आले. आणि विशेष म्हणजे त्या भेटींबद्दल मुलाने कृतज्ञतापूर्वक आभार मानले! तो म्हणाला, "प्रतापसिंहाचा हा मुलगा सदैव ब्रिटिशांचा मित्र राहील असे कृपाकरून लॉर्ड ऑक्लंडसाहेबांना कळवा," असे ऑस्बर्नने नमूद केले आहे.

बालकांबद्दलच्या प्रेमाप्रमाणे रणजितसिंहांची सौंदर्यदृष्टीही मशहूर होती. त्याचे एक प्रतीक म्हणजे 'चाकांचा बंगला.' महाराज रणजितसिंह यांच्यावर लिहिलेल्या आपल्या पुस्तकात वहीदुद्दिनने त्याची तपशीलवार माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे. "ह्या चाकांच्या बंगल्याच्या भिती चांदीच्या व छप्पर शालीचे होते. तो शक्य तेवढा सुंदर बनविण्यात आला होता. आठ हत्तींकडून तो ओढून नेला जाई. त्याच्या आत जाण्यासाठी शिडी वापरावी लागे. सणासुदीच्या दिवशी राजकुटुंबातील

मुलांना व त्यांच्या मित्रांना ह्या बंगल्यात प्रवेश देऊन तो ओढीत नेला जाई. त्याला स्प्रिंग्ज नव्हत्या. त्यामुळे आत बसलेल्यांना धक्के बसत व आणखीच मजा येई.

हा बंगला म्हणजे एक प्रकारची छोटी गाडीच होती. आजकाल दिल्ली किंवा तशा इतर मोठ्या शहरी खास बालकांसाठी सार्वजनिक शिशु-क्रीडा मंदिरात ज्या छोट्या, मजेच्या आगगाड्या आहेत त्यांची ही सुरुवात म्हणता येईल. यास्तव त्या नव्या उपक्रमाचे श्रेय महाराज रणजितसिंहांना दिले पाहिजे.

पशुपक्ष्यांची आवड

पशुपक्ष्यांबद्दलही महाराजांना फार प्रेम होते. गरीब कबूतरे व खेळ करणारी माकडे तर त्यांची खास आवडती होती. त्यांना रोजचे दाणापाणी ते स्वहस्ते घालीत. त्यांच्या सहवासातही ते नियमाने थोडा वेळ घालवीत. महाराजांच्या डोक्यावर, खांद्यावर कबूतरे बसलेली आहेत असे दृश्य तर नेहमीचेच होते. शेवटचा मोगल राजा बहादुरशहा जफर याने खेळ करणारी काही माकडे व मागे पंख्यासारखी पिसे असलेली कबूतरे महाराजांना भेट म्हणून पाठविली होती. आणि महाराजांनी एक थाटाचा समारंभ भरवून त्यांचे आगमन संस्मरणीय केले होते. महाराज शूर, धैर्यवान व लष्करी प्रवृत्तीचे होते; तरी गरुड, ससाणे किंवा रानकोंबडे अशा पक्ष्यांबद्दल मात्र त्यांच्या मनात प्रेम वसत नसे.

ते एकदा शिकारीला गेले असता त्यांच्या बरोबरच्या मंडळीपैकी एकाने वाघाचे एक पिल्लू पकडले व ते महाराजांच्या तंबूजवळ एका पिंजऱ्यात ठेविले. महाराजांना रात्री एका श्वापदाचे करुण आक्रंदन ऐकू आले. तेव्हा त्यांनी चौकशी केली. वाघीण आपल्या छाव्यासाठी रडत असावी असे कळताच त्यांनी ते पिल्लू सोडून देण्याचा हुकूम लगेच दिला.

होते कसे आननी

ऑस्बर्न म्हणतो की महाराजांचे व्यक्तिदर्शन इतके सुमार होते की पाहणारावर छाप पाडण्यासारखे किंवा त्याच्या मनात थोडीफार आस्था वा जिज्ञासा निर्माण व्हावी असे त्यांच्या चेहऱ्यावर काहीच नव्हते. उलट, पाहणाराचा ग्रह प्रतिकूल, विपरीत व्हावा असेच ते सकृद्दर्शनी दिसत. पण पुनरावलोकन केल्यावर मात्र त्या चेहेऱ्यामागे बुद्धिमत्ता असल्याचे कळून येई. त्यांचे डोळे, (म्हणजे एकच) पाणीदार व दृष्टी सूचक, शोधक आणि अर्थपूर्ण होती. त्यांच्या भरदार मिशा व लांब दाढी

वयोमानाने पांढरी झालेली होती. परंतु वयाच्या अठ्ठावनाव्या वर्षीही त्या गोष्टी त्यांचे वय बरेच कमी असल्याचे दाखवीत. त्यांच्या व्यक्तित्वाला चांगला भारदस्तपणाही आलेला होता.

आपली चेहरेपट्टी अगदीच सामान्य आहे ह्या जाणीवेमुळे महाराजांनी प्रसाधनांचा विचार आपल्या मनाला कधीच शिवू दिला नाही. आपल्या अंगावर उंची कपडे व राजाचे अलंकार म्हणून हिऱ्यामोत्यांचे निवडक दागिने त्यांनी सहसा वापरले नाहीत. याला माफक अपवाद फक्त दरबारच्या काही समारंभ प्रसंगांचा. पण असे असले तरी त्यांना सौंदर्यदृष्टी मात्र उच्च दर्जाची होती. रंग-विलास आदींची त्यांची अभिरुचीही संपन्न होती. आपल्या भोवतालची, सहवासातली आणि दरबारामधील सर्व माणसे देखणी असावीत हे त्यांना आवडे. किंबहुना त्यांच्या खासगी सेवेत अथवा दरबारात प्रवेश मिळण्यासाठी व्यक्तीचे देखणेपण हे एक हुकमी साधन ठरे. तशा माणसाची निवड केली जाण्याची शक्यता जास्त असे. ऑस्बर्नने सांगितलेच आहे की महाराजांच्या दरबारातील बहुतेक सगळे शीख सरदार व उच्च अधिकारी देखणे आणि उमदे होते. राजा शेरसिंह व विशेषतः राजा सुचेतसिंह यांच्याकडे त्या दृष्टीने अंगुलीनिर्देश करता येईल. स्वतः फकीर अझिझुद्दिन व राजा ध्यानसिंह हेही आदर्श पुरुषांचे प्रशंसनीय नमुने होते. म्हणजे असे म्हणता येईल की स्वतःचे रूप व व्यक्तित्व यांचे न्यून महाराज आपल्या दरबारी अधिकाऱ्यांच्या मार्फत भरून काढीत. स्त्री-सौंदर्याबद्दलही हेच सांगता येईल. त्यांच्या जनानखान्यात किती तरी स्वरूपसुंदरी होत्या. महाराजांची हीच सौंदर्याभिरुची त्यांच्याकडील घोडे, हत्ती आदी प्राणी, जनावरांच्या बाबतीत त्यांनी वापरलेली कळून येई.

फकीर अझिमुद्दिन याने आपल्या पुस्तकात समाविष्ट केलेला एक प्रसंग महाराजांच्या सौंदर्याभिरुचीवर स्वच्छ प्रकाश टाकणारा आहे. सरदार शामसिंह अत्तारीवाला हे महाराजांना भेटण्यासाठी एकदा दरबारात आले असता त्यांच्या गळ्यातील अतीव सुंदर मोत्यांच्या कंठ्याने महाराजांचे लक्ष वेधले. काही दिवसांनंतर शामसिंह पुन्हा आले असता त्यावेळी महाराजांना त्यांच्या गळ्यात तो कंठा आढळला नाही. म्हणून त्यांनी मुद्दाम चौकशी केली तेव्हा त्यांना समजले की ज्या जवाहिऱ्याकडून शामसिंहांनी तो गळ्यात घालण्यासाठी प्रथम आणिला होता त्याने त्याबद्दल रु. 70,000 ची मागणी केली; व ती परवडणारी नसल्यामुळे शामसिंहांनी त्याला रु. 50,000 देऊ केले. पण अखेर सौदा न जमल्यामुळे जवाहिऱ्याने तो कंठा परत घेतला. हे समजताच, त्यांना तो घेता येण्यासाठी

आवश्यक तेवढी रक्कम खजिन्यातून दिली जावी असा हुकूम महाराजांनी लगेच काढला.

आपल्याला रुबाबदार, भारदस्त व्यक्तित्व नाही ह्या जाणीवेने महाराजांना विषण्णता वाटणे अगदी स्वाभाविक होते. पण त्यांनी त्या जाणीवेला स्वतःचा बळी घेऊ दिला नाही. उलट शारीरिक सौंदर्याच्या बाबतीतील ते दैवाधीन न्यून खुषीने पत्करून त्याची भरपाई त्यांनी मानवाधीन मानसिक सौंदर्याने केली. अनेक सद्‌गुण त्यांनी आपल्या अंगी करारीपणाने जोपासून संवर्धित केले.

त्यांची आवडती राणी मोरान त्यांना एकदा विनोदाने म्हणाली, "महाराज, परमेश्वराने माणसांना सौंदर्य वाटले तेव्हा आपण कोठे गेला होता?" वास्तविक एखाद्याला अशा प्रश्नाचा रागच आला असता. पण "बाहुबळाच्या जोरावर राज्य कमाविण्याची संधी मला द्यावी अशी विनंती चित्रगुप्ताला करण्यासाठी मी त्याच्याकडे गेलो होतो." असे, पराक्रमी व बुद्धिमान पुरुषाला शोभणारे उत्तर त्यांनी राणीला लगेच दिले.

महाराजांच्या स्वभावातील हे गुण व त्याशिवाय त्यांची विनयशीलता आणखी एका प्रसंगाने दिसून आली. लाहोरला एकदा मोगल सिंहासनावर बसण्याचा प्रसंग आला असता त्यांनी तो नम्रपणे नाकारला. तसे केल्यास आपण मोगलांचे मांडलिक आहोत अथवा त्यांच्या बरोबरीचे एक राजे आहोत असा आपल्या कृतीचा अर्थ होईल व त्या दोन्हीपैकी कोणतीच गोष्ट आपणास अभिप्रेत नाही; उलट आपण एका नव्या राज्याचे संस्थापक आहोत म्हणून त्यांनी तेथे बसणे नाकारले. महाराज रणजितसिंह यांची विचारसरणी अशी होती.

पंधरा

व्यक्तित्वावर दृष्टिक्षेप–2

दुर्दम्य जिज्ञासा

रणजितसिंह हे काही शिकले सवरलेले गृहस्थ नव्हते. तथापि त्यांचे मन कमालीचे चौकस होते. एखादा परदेशी नागरिक भेटण्याचा अवकाश; की ते हर प्रकारच्या प्रश्नांची एवढी सरबत्ती त्याच्यावर करीत की जणू पृथ्वीवरील कोणताही विषय शिल्लक राहू नये. भारतात आणि जगात घडत असलेल्या हकीगतींची माहिती ऐकण्यास ते सदैव उत्सुक असत. आणि श्रवण केलेली सारी माहिती ते आपल्या मनःकोशात जतन करून ठेवीत. हेतू हा की स्वतःच्या लष्करी व राजनैतिक कार्यात मार्गदर्शन म्हणून तिचा उपयोग व्हावा. जे असंख्य प्रश्न ते विचारीत असत त्याची स्थूल नोंद ऑस्बर्नने केली आहे. "तुम्ही मद्य घेता का? किती घेता? तुम्ही कोणता तोफखाना बरोबर आणला आहे? तोफेसाठी गोळे कोणते वापरता? घोड्यावरून रपेट करणे तुम्हांला आवडते का? तुम्हांला कोणते घोडे आवडतात? लॉर्ड ऑक्लंड मद्य घेतात का? किती पेले? ते सकाळी मद्य घेतात काय? त्यांचा विवाह झाला आहे काय? इंग्लिश स्त्रिया खर्चिक असतात काय? एक इंग्रज किती फ्रेंचांना व किती रशियनांना मारू शकेल?" इत्यादी इत्यादी असे प्रश्न महाराज खुद्द गव्हर्नर जनरललाही विचारीत. इंग्रज मनुष्य मनाने इतका मोकळा नसतो. म्हणून लॉर्ड विल्यम बेंटिंक व लॉर्ड ऑक्लंड यांना त्यातील काही प्रश्नांनी अवघडल्यासारखे केले असणे अगदी शक्य आहे. पण रणजितसिंहांची अशी प्रश्नावली निरुपद्रवी असते आणि भारतातील शिष्टाचार पद्धती वेगळ्या आहेत ह्या गोष्टी ते लवकरच उमजले असतील.

वज्रादपि कठोराणि

सर्वसाधारण पती व पिता यांच्या ज्या सरासरी भावना असतात त्यांना अर्थातच रणजितसिंह अपवाद नव्हते. आपद्ग्रस्तांसाठी तर त्यांना विशेष अनुकंपा वाटे.

वाघिणीच्या पिल्लाला सोडून देण्याचा हुकूम त्यांनी दिला होता ती हकीगत सांगण्यात आलेलीच आहे. प्राण्यांमध्येही वात्सल्य असते याचासुद्धा विसर त्यांना पडत नसे.

अशीच एक गोष्ट एका म्हातीरीची आहे. हिणकस धातूला महाराजांचा स्पर्श झाल्यास त्याचे सोने होते असे तिला कोणी तरी सांगितले होते. एक दिवस महाराजांची स्वारी तिला लाहोरच्या रस्त्यात दिसली. मोठ्याने ओरडून तिने महाराजांना शुभ आशीर्वाद दिला. महाराजांच्या सेवकांनी तिला त्यांच्याजवळ येऊ देताच स्वतःजवळचे स्वयंपाकाचे एक पितळी भांडे ती त्यांच्या कपड्यावर घासू लागली. तिच्या त्या कृत्याचा जाब विचारताच, आपण फार गरीब आहोत, व त्या भांड्याचे सोने होईल म्हणून आपण नाइलाजाने तसे केल्याचे तिने सांगितले. ते ऐकून महाराजांचे अंतःकरण कळवळले. त्यांनी तिला ते भांडे भरून सोन्याची नाणी दिली; एवढेच नव्हे तर ती वाटेत कोणी तिच्याकडून लुबाडू नयेत म्हणून तिला तिच्या घरी सुरक्षितपणे पोहोचविण्याचाही हुकूम त्यांनी दिला.

पण कुसुमाप्रमाणे मृदू असलेले महाराज आवश्यक प्रसंगी वज्राप्रमाणे कठोरही होऊ शकत असत. अशा वेळी रक्तसंबंधांचे नातेसुद्धा त्यापुढे निष्प्रभ ठरे. दरबारच्या वसुलीबाबत त्यांनी नातेवाइकांचीही गय कधी केली नाही. त्यांचा ज्येष्ठ पुत्र, राजा खरकसिंह याच्याकडे दरबारची काही बाकी थकली होती. त्या सुमारास त्याची आई महाराणी राज कौर हिचे निधन झाले होते. पण भावना आड येऊ न देता महाराजांनी कर्तव्य कठोरतेने बाकी वसुलीसाठी त्याच्याकडे शेखपुऱ्यास सैन्य पाठविले. मातृशोकात असल्यामुळे खरकसिंहाने रदबदली केली. पण ह्याच कारणाने खरकसिंह आपल्या इस्टेटीच्या कामकाजाकडे दुर्लक्ष करण्याची शक्यता आहे असा प्रतिवाद महाराजांकडून करण्यात आला. खरकसिंहाकडून पाच लाख रुपयांच्या वसुलीची लेखी हमी घेतल्यावरच सैन्य तेथून परतले.

दौलू नावाचा महाराजांचा एक मोठा आवडता घोडा होता. तो आपणास मिळावा म्हणून राजकुमार शेरसिंहाने महाराजांना अनेकदा विनंती केली होती. पण महाराजांनी ती मानली नव्हती. अखेर शेरसिंहाची इच्छा फारच प्रबळ झाली. तेव्हा त्याने पागेत जाऊन दौलू केवळ रपेट करून येण्यासाठी दरोग्याकडे मागितला. पण तीन चार दिवस गेले तरी शेरसिंहाने दौलू परत आणून न दिल्यामुळे दरोग्याने महाराजांकडे रीतसर तक्रार केली. ते समजताच महाराजांचा क्रोध अनावर झाला. इतका की शेरसिंहाची इस्टेट जप्त करून त्याला हद्दपार करावे असा हुकूम त्यांनी रागाच्या भरात दिला. फकीर नुरुद्दिनने चतुराईने वेळीच मध्यस्थी केली नसती तर

त्या हुकमाची अंमलबजावणी लगेच झालीही असती. नुरुद्दिन शेरसिंहाचा शिक्षकही होता. अखेर शेरसिंहाला क्षमा करण्यात येऊन, बापाकडून त्याला दौलू बक्षीस म्हणून देण्यात आला.

धार्मिक वृत्ती

वैयक्तिक जीवनात महाराज रणजितसिंह फार धर्मनिष्ठ होते. त्यांनी 'ग्रंथसाहेबा'च्या वाचन-पठणासाठी राजवाड्यात खास खोली ठेवली होती. तेथे दररोज तिसऱ्या प्रहरी ते 'गुरुवाणी' श्रवणासाठी नियमाने बसत. गुरुभक्तीचे एक निदर्शक म्हणून रोज प्रार्थनेच्या वेळी ते गुरुची 'कलगी' आपल्या डोक्यावर ठेवीत. आणि ती आपल्या डोळ्यालाही लावीत. त्याचप्रमाणे ते नेहमी स्वतःच्या संकटांसाठी 'ग्रंथसाहेबा'चा शुभ कौल मागत. ऑस्बर्नने लिहिले आहे की बहुतेक प्रत्येक महत्त्वाच्या स्वारीवर निघण्यापूर्वी महाराज 'ग्रंथसाहेबा'चा असा कौल घेत असत. जेव्हा जेव्हा त्यांचे मन व्यथित, शंकाकुल व द्विधा होई, किंवा एखादा अवघड प्रश्न त्यांना गोंधळून टाकी तेव्हा तेव्हा ते 'ग्रंथसाहेबा'च्या पानामध्ये खुणा ठेवीत. पैकी एक होकाराची व दुसरी नकाराची असे. मग ते उपाध्यायाला बोलावीत; आणि त्या खुणांच्या चिठ्ठ्यांकडे न पाहता त्यांच्यापैकी एक काढून घेण्यास कोणाला सांगत. होकाराची चिठ्ठी काढली गेली तर ते स्वारीवर निघत आणि त्यांच्या मनाला यशाची बालंबाल खात्री वाटे पण तीच नकाराची चिठ्ठी काढली गेल्यास ते त्या आदेशानुसार स्वारीबद्दलचा मनातील विचार सोडून देत.

महाराज रणजितसिंह स्वतःच्या श्रद्धेनुसार निखालसपणे चालणारे गृहस्थ होते. पण त्यांची धार्मिक मते आत्यंतिक, अंध वा असहिष्णु नव्हती. इतर धर्मांबद्दल त्यांना तितकाच आदर होता. ह्याचे ठळक उदाहरण म्हणजे ज्या मुसलमान स्त्रियांशी त्यांनी विवाह केले होते त्यांना आपापल्या धर्मिक निष्ठा पाळण्याची पूर्ण मुभा महाराजांनी दिली होती. विवाह-विधीसुद्धा त्यांच्या माहेरच्या कुटुंबांत प्रचलित व रूढ असलेल्या आचार-धर्मानुसारच करण्यात आले होते. बाह्य आडंबराचा त्यांना तिटकारा होता. जे खरेखुरे, पवित्र असे त्याबद्दल त्यांना नितांत आदर होता. मग ते दुसऱ्या धर्मातलेही का असेना. अशा विचारसरणीमुळेच ते गुरुद्वारांप्रमाणे मंदिरांस व मशिदींस कोणताही भेदभाव न करता दानधर्म करीत. निरनिराळ्या धर्मांतल्या पवित्र व्यक्तींच्याकडे ते नेहमी जात व कधीकधी त्यांच्या पायावरील धूळ आपल्या दाढीने झाडीत. धर्मपीठापुढे ते स्वतःला सामान्य माणसापेक्षा यत्किंचितही जादा लेखीत नसत. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे शीखांच्या एका मूलभूत

आचारधर्माचे उल्लंघन त्यांच्याकडून झाल्याबद्दल त्यांना दोषी ठरविले गेले तेव्हा ती शिक्षा भोगण्यासाठी त्यांनी अमृतसर येथे अकाल तख्तापुढे आपली पाठ लगेच बिन तक्रार उघडी केली होती.

हिंदू, मुसलमान व शीख यांच्या सण-उत्सवांत ते सारख्याच निःपक्षपातीपणे सहभागी होत. त्याचप्रमाणे मनात कोणताही पूर्वग्रह न ठेवता त्या त्या धर्मांच्या तीर्थस्थळांना ते भेटी देत. महाराज एकवार मक्केला जाऊन आले होते असे वहीउद्दिनने म्हटले आहे. कसेही असो; मुसलमानांच्या ईद-उल्-फितर ह्या सणाच्या समारंभाला ते उपस्थित राहत. त्यांचे पुत्र व नातू मोहरमला जात. मनुष्य कोणत्याही धर्माचा असो; त्याच्याबद्दल ते सारखाच आदर बाळगीत. यामुळे त्या त्या धर्मातील लोकांनाही ते सारखेच आदरणीय वाटत. आपल्या प्रार्थनासमयी ते त्यांचे स्मरण करीत. निरनिराळ्या धर्मांची माणसे विविध प्रसंगी व ठिकाणी त्यांच्यासाठी प्रार्थना करीत. स्वारीवर निघावयाचे असो, रणक्षेत्रात विजय मिळविलेला असो; लोक महाराजांच्या नावाने जयजयकार, उद्घोष करीत. आजारातून बरे होऊन त्यांना आराम वाटावा म्हणून त्यांच्यासाठी सर्व धर्मीयांनी प्रार्थना केल्या. आणि मृत्यूनंतर प्रेतयात्रेच्या प्रसंगी हिंदू, मुसलमान व शीख ह्या तिन्ही धर्मांचे अनुयायी आळीपाळीने आपापल्या धार्मिक प्रार्थना म्हणत होते ही गोष्ट काय सुचविते?

लाहोरला फकीर कुटुंबियांजवळ असलेल्या कागदपत्रावरून महाराज रणजितसिंह यांच्या धर्मविषयक उदार मनाची व मतांची फार चांगली कल्पना येते. एकदा महाराज व अझिझुद्दिन फिरावयासाठी बाहेर गेले असता एक माणूस एका गाडीतून एक भला मोठा ग्रंथराज नेत असलेला त्यांना दिसला. त्याच्याकडे त्याबद्दल विचारता तो म्हणाला, "गाडीतला हा भला मोठा ग्रंथ म्हणजे कुराणाची हस्तलिखित प्रत आहे. सुरेख हस्ताक्षरांत महत्त्वाच्या ग्रंथांच्या नकला मी करीत असतो. आयुष्यभर खपून मी हा ग्रंथ लिहून काढला आहे व तो निझामाकडे विकण्यासाठी घेऊन जात आहे." मोबदल्याबद्दल विचारता त्याने रु. 10,000 सांगितले. सरकारी तिजोरीतून त्याला तेवढी रक्कम देण्याचा हुकूम महाराजांनी आपल्या मंत्र्याला लगेच दिला.

नंतर त्यातील वेचे आपणास वाचून दाखवावेत आणि पंजाबीत त्यांचा अनुवाद करावा असे महाराजांनी फकीर अझिझुद्दिनला सांगितले. अनुवादित भाग ऐकल्यावर महाराज त्याला म्हणाले, "तर मग 'कुराण' आणि 'ग्रंथसाहेब' यांच्यात फारच थोडा फरक आहे." त्यावर अझिझुद्दिन म्हणाला, "प्रत्येक धर्मात सांगितलेले

अंतिम ध्येय एकच आहे. फक्त त्याच्याकडे जाण्याचे मार्ग वेगवेगळे असतात इतकेच." या उत्तराने फार समाधान वाटल्यामुळे महाराजांनी ते हस्तलिखित त्याला बक्षीस देऊन टाकले.

दुसरी एक कथा अशी आहे : एकदा काही शीख एक तक्रार घेऊन महाराजांकडे गेले. त्या शीखांच्या शेजारच्या वस्तीत राहणारा एक मुल्ला दिवसातून पाच वेळा ओरडून ओरडून तेथील मुसलमानांना नमाज पढण्यासाठी बोलावीत असे. त्याच्या अशा ओरडण्याचा तेथील बिगर-मुसलमानांना फार उपद्रव होतो अशी त्या शीखांची तक्रार होती. यास्तव त्याला तसे पुकारीत राहण्याला महाराजांनी बंदी करावी अशी विनंती त्यांनी महाराजांना केली.

अझिझुद्दिनचा सल्ला घेऊन त्या शीखांना महाराजांनी असे सांगितले की त्यांनी शेजारच्या वस्तीतील मुसलमानांच्या घरी जाऊन त्यांना नमाज पढण्यासाठी बोलावणे करावे; म्हणजे त्या माणसाचे पुकारणे आपोआपच बंद पडेल. हे ऐकल्यावर ती शीख मंडळी आली तशीच परतली. कारण प्रत्येक मुसलमानाच्या घरी जाऊन नमाजाचे बोलावणे करणे हे अर्थातच त्यांना परवडण्यासारखे नव्हते. त्यापेक्षा मुल्लाचे ते मोठ्याने ओरडून हाका मारणे एक वेळ परवडले असे त्यांना वाटले.

सोळा

कर्तृत्व व इतिहासातील स्थान

महाराज रणजितसिंहांनी आपल्या चाळीस वर्षांच्या कारकीर्दीत जी कार्यसिद्धी केली व कर्तृत्व गाजविले त्याचे मूल्यमापन करताना त्यांच्या कारकीर्दीच्या आधीच्या आणि नंतरच्या परिस्थितीचे विहंगमावलोकन करणे आवश्यक आहे. ज्या प्रदेशांवर त्यांनी राज्य केले त्यांत हिंदू, मुसलमान आणि शीख प्रजाजनांचे वास्तव्य होते. ह्या प्रजाजनांत धार्मिक आणि सांस्कृतिक भेद होते. पंजाबात मोगल सत्तेचा नाश होऊन अनेक ठिकाणी छोटेछोटे नबाब-जहागिरदार अस्तित्वात आले होते. अफगाणी आक्रमकांना दिल्लीहून राज्यकारभार करण्याची व पंजाबवर सत्ता गाजविण्याची महत्त्वाकांक्षा उरलेली नव्हती. आणि अधूनमधून केल्या जात असलेल्या त्यांच्या स्वाऱ्यांना तोंड देण्यासाठी शीख सरदार एकत्र झाले होते. पण त्यांची एकी होई ती फक्त नादिरशहा किंवा अब्दाली यांच्या स्वाऱ्यांच्या प्रसंगीच. इतर वेळी ते पृथक व स्वतंत्र होते; आपल्या खेड्यातल्या किल्यात ते राहत; आणि स्वतःच्या नियंत्रणाखाली असलेल्या अमलाखाली यमुना व झेलम नद्यांमधील प्रदेश आला होता. पण त्याचे अधिपत्य शीखांच्या निरनिराळ्या वंशीय संघटनांकडे 'मिसल' होते. आणि त्यांच्यामध्ये एकवाक्यतेच्या ऐवजी बेबनाव माजला होता. अधूनमधून आपापसात त्यांचे झगडेही होत.

अशा पार्श्वभूमीवर रणजितसिंहांचा उदय झाला. आणि अल्पावधीत त्यांनी नेतृत्व व वर्चस्वही मिळविले. 1799 मध्ये लाहोर ताब्यात घेतल्यावर त्यांनी स्वतःला 'महाराज' हा किताब धारण केला; व इतर शीख संघटनांच्या पुढाऱ्यांना नामोहरम करून ते त्यांचे श्रेष्ठ नेते बनले. आणखीही प्रदेश जिंकून, खालसा करून तो त्यांनी आपल्या राज्याला जोडला आणि स्वसत्तेच्या कक्षा व स्वराज्याच्या सीमा वाढविल्या. 1809 मध्ये त्यांनी ब्रिटिशांशी एक तहनामा केला व त्यानुसार सतलज नदी त्यांच्या राज्याची दक्षिण सीमा ठरली. 1818 मध्ये त्यांनी मुलतान जिंकले, 1819 मध्ये काश्मीर घेतले व 1821 पर्यंत आपला अंमल सिंधू नदीच्या पलीकडे

पोहोचविला. पंजाबचे एकीकरण व अफगाणाच्या स्वाऱ्याना पायबंद ह्या दोन महत्त्वाच्या कामगिऱ्यांचे श्रेय महाराज रणजितसिंह यांच्याकडेच जाते. त्यांनी काश्मीर व वायव्य सरहद्द प्रांत जर पादाक्रान्त केले नसते तर दोन्ही प्रदेश अफगाणांनी आपल्या घशात घातले असते.

महाराजांच्या ह्या कामगिरीचा राजकीय अन्वयार्थ तर अधिकच महत्वाचा आहे. कारण त्यामुळे दीर्घ काळ टिकणारा परिणाम घडून आला. सुरुवातीला शीख संघटना (मिसल) बहुतांशी कट्टर धर्मवादी होत्या. खालसा ध्वज हाच त्यांना एकनेवपणे शिरोधार्य होता. महाराजांच्या आगमनाबरोबर ह्या गोष्टीला नवी दिशा प्राप्त झाली. त्या संघटनांचे वर्चस्व ऱ्हास पावू लागले. आणि महाराजांची सत्ता, शक्ती व लोकप्रियता शुक्लेंदुवत वाढत गेली. त्यामुळे शीख संघटनांचा तो कट्टर धर्मवाद कमकुवत बनला गेला. तशी महाराजांनी शीख धर्मपंथाशी फारकत कधीच केली नाही. ते शीख धर्माचे प्रामाणिक उपासक होते. पण लवकरच त्यांना उमजून आले की धर्म वा जात याच्या आधारे कसलाही भेदभाव न करता सर्व लोकांचा विश्वास संपादन करावयाचा असल्यास इतर धर्मांविषयी व त्या धर्मीयांविषयी सारखेच सहिष्णु, आस्थेवाईक राहिले पाहिजे. त्यामुळे एक शीख म्हणून मिसलदारांमध्ये सर्वांच्या पुढे असूनही हलकेहलके त्यांचा दृष्टिकोण धर्मनिरपेक्ष बनू लागला. त्यांनी आपली राजधानी, धार्मिक महत्त्व असलेल्या अमृतसरहून हलवून राजकीय महत्त्व असलेल्या लाहोरला नेली याच्यामागील हेही कारण असावे.

ह्या उत्क्रांतीत अनुस्यूत असलेला आणखी एक महत्त्वाचा दुवा म्हणजे रणजितसिंहांनी आस्तेआस्ते नष्ट केलेले 'गुरुमाते'चे स्तोम. शीख पुढारी दरसाल एकदा अमृतसरला एक बैठक भरवीत व तेथे आपले भावी मनसुबे निश्चित करीत. रणजितसिंह त्या पवित्र शहरी—अमृतसरला जात; पण गुरुमातेच्या बैठकीत भाग घेण्यासाठी नव्हे तर त्यांच्या एखाद्या लष्करी मोहिमेच्या योजनेची तयारी होई आणि त्यांना हरमंदिरातून देवाचा आशीर्वाद घ्यायचा असे तेव्हा. त्याच वेळी ते खालसांचा पाठिंबाही मिळवीत.

त्यांनी अवलंबिलेल्या नव्या धोरणाचे वैशिष्ट्य हे होते की आपल्या प्रजेतील इतर धर्मीयांनाही त्यांनी आश्रय दिला, व त्यांच्या विहित हितसंबंधाचे रक्षण केले. अर्थात त्यात हिंदू व मुसलमान यांचाच जास्त भरणा होता. सर्व लोकांना नोकऱ्यांची समान संधी देऊन त्यांनी समाजात एक समान आर्थिक जाणीव निर्माण केली. घोडदळात सामील व्हावे असे शीखांना जास्त करून वाटले; तर हिंदू व मुसलमान लोक पायदळात दाखल होत. महाराज मनाने फार उदार होते. त्याप्रमाणे

त्यांनी विविध अधिकारांच्या उच्च जागांवर निरनिराळ्या धर्मातील, पंथातील व जातींतील लायक लोकांच्या नेमणुका केल्या. त्यातही एखाद्या बड्या अमीर उमरावापेक्षा सामान्य व्यक्तीची नेमणूक करणे त्यांना अधिक पसंत असे. जमादार खुशालसिंहाची नेमणूक याची ठळक साक्ष होय. तो एका साध्या दुकानदाराचा मुलगा होता. महाराजांच्या उदार वागणुकीच्या धोरणाचा फायदा स्वतःसाठी करून घेण्याचा प्रयत्न त्यांच्या दरबारातील अनेकांनी केला. आपले गरीब नातेवाईक महाराजांकडे आणून ते त्यांना त्यांच्याकडून नोकऱ्या देववीत आणि दरबारच्या मंडळीमध्ये स्वतःच्या गटाचे प्राबल्य वाढवीत. साहजिकच महाराजांची मर्जी संपादन करण्यात अशा गटांची एकमेकांमध्ये चुरस लागे.

ही चुरस महाराजांच्या ध्यानात आली होती. दरबारातील विविध गटांच्या लोकांची संख्या व बळ ते परस्परांविरुद्ध अशा रीतीने राखीत व वापरीत की तेणेकरून त्यांच्यावर आपले नियंत्रण नीट राहावे; व त्या सर्वांचाच चांगला उपयोग दरबारच्या कामासाठी व्हावा. यामुळे त्यांनी कोणत्याही एका गटाला जादा प्रबळ होऊ दिले नाही; की त्याचे स्तोम दरबारात वाढू दिले नाही. आणि ह्या गोष्टीला त्यांनी सरदार मंडळींचाही अपवाद केला नाही. उच्चाधिकाराच्या जागेचे लोणी कोणा एकाला घेऊ न देता त्याची समान वाटणी त्या सर्वांत करण्याचे धोरण महाराजांनी आखले नसते तर त्यांनी उच्च स्थानी नेमलेल्या युरोपिअनांचा हेवा एतद्देशीयांना वाटला नसता. अलार्ड व व्हेन्टुर या दोघा फ्रेंचांचे उदाहरण या दृष्टीने उल्लेखनीय आहे. अधिकार–सता व प्रभाव–वजन यांची समान विभागणी विविध धर्म, पक्ष, गट यांच्यामध्ये केली जाई.

यातच आजच्या धर्मनिरपेक्ष व लोकशाही राज्यव्यवस्थेची सुप्त बीजे असल्याचे कळून येईल. व नवल हे की ही बीजे पेरण्याचे कार्य केले गेले कोणाकडून–? तर एका सत्ताधीश नृपाकडून! महाराज रणजितसिंहांचे हे कार्य इतिहासात अमोल ठरते. मात्र त्यांनी प्रादेशिक राष्ट्रीयत्वाचा पाया घातला असेही वाटणे शक्य आहे. तथापि त्यांनी तसे एखाद्या विशिष्ट उद्देशाने मुद्दामच केले असावे; अथवा संभाव्य परिणामांची जाणीव त्यांना आलेली असावी असे मानण्यास सबळ पुरावा नाही. त्यांनी चालू परंपरा बदलून तेथे एक नवी घडी बसविली आणि अशा रीतीने ते आपल्या सभोवतालच्या तत्कालीन समाजाच्या पुढे द्रष्टेपणाने गेले हे निःसंशय. त्यांच्या धोरण-कृतींचे सिंहावलोकन केले असता, राष्ट्राची उभारणी करणारे एक खरेखुरे, थोडे आधीचे महापुरुष होऊन गेले असे म्हणावे लागते. तथापि स्वतःच्या अपेक्षांपेक्षाही, राजवटीची अधिक चांगली घडी त्यांच्याकडून

बसविली गेली आणि त्यांच्या योजनांच्या अंमलबजावणीचे परिणाम, स्थलकालाच्या मर्यादेमध्ये, राजकीय व सामाजिक दृष्ट्या अधिक किफायतशीर ठरले असे वाटणे असंभवनीय नाही.

पण हे मूल्यमापन त्यांच्या राजवटीच्या काळापुरतेच लागू पडते. कारण त्यानंतर जे इवलेसे रोपटे कोमेजून गेले. पण स्वतःच्या हयातीत ते सत्तेवर होते तोवर त्यांनी लोकांना असे निर्मळ व उदार प्रशासन उपलब्ध केले की ज्यात भेदाभेद व पक्षपात त्यांनी जाणीवेने चार हात दूर राखले; आणि त्या प्रशासनातील आपला वाटा उचलण्यास सर्व जातींच्या लोकांना प्रमाणशीर सुसंधी दिल्या हे सत्य मात्र नाकारता येणार नाही. अमुक एका धर्माचे वा पंथाचे असल्यामुळेच आपणास अमुक फायदे, संधी वा मोकळीक उपलब्ध नव्हती अशी तक्रार तत्कालीन संमिश्र समाजाच्या कोणत्याही घटकाकडून केली गेल्याचे कोठेही नमूद नाही. उलट त्यांच्या धोरणामुळे समाधानी असल्याचेच लोकांनी उत्साहाने त्यांच्या राजवटीत सांगितले. सर्व प्रजाजनांना महाराजांबद्दल प्रेमादर वाटत होता.

याचा अर्थ असा नव्हे की आजमितीस भारतीय घटनेने नागरिकांना दिलेले सर्व हक्क त्यावेळी सुरक्षित होते. तशी तुलना, व अपेक्षाही करणे उचित ठरणार नाही. सरदार—जहागिरदारांकडे मोठ्या जमिनी असत व त्यांच्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नांवर सुखेनैव त्यांचा निर्वाह चाले; तर सामान्य नागरिकांना आपली उपजीविका सुखासमाधानाने पार पाडणे कष्टाचे ठरे. कित्येक अधिकारी जुल्मी, व जनतेला पिळून काढणारे होते. पण महाराजांनी स्वतःच्या आचरणाने आदर्शाचा कित्ता घालून दिला. आपल्या हुकुमाचे पालन न करणाऱ्यांना ते योग्य शिक्षा फर्मावीत. दुसरे असे की कायद्याच्या आधारे चालणाऱ्या ज्या प्रशासनाचा उद्‌घोष एक आदर्श म्हणून राजकीय तत्त्ववेत्ते करीत असतात तो आजमितीस, म्हणजे रणजितसिंहांच्या देहावसानानंतर 130 वर्षे गेली तरी प्रत्यक्षात कोठे आढळतो? रणजितसिंहांनी आपल्या बुद्धि-सामर्थ्याने जर काही साध्य करण्याचा प्रयत्न केला असेल तर ते म्हणजे विविध जातीधर्मांतील लोकांच्या भिन्न श्रद्धांचा समन्वय साधणे आणि जुलूम व पिळवणूक यांचा नायनाट करणे हे होय.

रणजितसिंहांच्या यशापयशाचा विचार करताना त्यांच्या यशाचे पारडे-बरेच जड आहे हे सकृत्‌दर्शनीच जाणवते. राजकीय क्षितिजावर त्यांचा उदय झाला तेव्हा अनेक छोट्या छोट्या राज्यांमध्ये पंजाबचे तुकडे पडलेले होते. त्या राज्यांत वैमनस्ये होती. व त्यामुळे वरचेवर त्यांचे झगडे होत. एकीकडून अफगाण व दुसरीकडून मराठे यांच्या कचाट्यात ती राज्ये सापडली होती. आणि संधी

मिळेल त्याप्रमाणे आपले पाय पसरण्यासाठी इंग्रजही टपून बसलेच होते. महाराजांनी प्रथम त्या छोट्या शीख 'मिसल' संघटनांच्या नेत्यांना नमविले. नंतर जहागिरीसारख्या त्यांच्या छोट्या छोट्या राज्यांचे एक मोठे, एकसंघ राज्य स्थापन केले. मुसलमान नबाबांना त्यांनी कह्यात ठेविले. आणि अफगाणांच्या स्वाऱ्या व लुटी यांनाही पायबंद घातला. अफगाणांना जरबेत आणून त्यांचे विस्तारवादी प्रयत्न जागीच थंडे केल्यावर महाराजांनी व्यवहारी धोरणाने ब्रिटिशांशी तडजोड करून स्नेहसंबंध स्थापन केले. आणि उभयतांनी एकमेकांच्या अंतर्गत व्यवहारात पडू नये असे ठरवून घेतले. नंतर त्यांनी आपली सेना शिस्तीच्या पायावर सुसंघटित केली. आपले पूर्वज व समकालीनही यांच्याप्रमाणे घोडदळावर जास्त भर न देता, पायदळ व तोफखाना यांची सुधारणा करून त्यांना बळकटी आणिली. आपल्या जवानांना त्यांनी युद्धकलेचे प्रशिक्षण दिले. त्यांच्या मृत्यूच्या वेळी शस्त्रसज्य व शिस्तबद्ध अशा 50,000 शिपायांचे खडे सैन्य, राज्याच्या संरक्षणाचा आधार म्हणून सिद्ध झाले.

तथापि लष्करी नेतृत्व आणि लढायांतले विजय हे त्यांच्या बहुविध व सर्वांगीण कर्तृत्वाचा केवळ एक भाग ठरतात. नव्या नागरी प्रशासनाची स्थापना, भिन्न जातीधर्म व त्यांचे अनुयायी यांच्याबद्दल सहिष्णुता व उदारता आणि गुणी जनांची पारख ह्या गोष्टींबद्दल महाराज रणजितसिंह यांची तुलना मोगल राजांपैकी सर्वोत्तम राजा अकबर यांच्याशीच होऊ शकते. अंगच्या गुणावगुणांनुसार कोणाला केव्हा पदोन्नती द्यावी; अथवा खालच्या पायरीवर आणावे हे ते नीट जाणत. युद्धात अथवा शांततेच्या काळात जे आपल्या गुणांमुळे चमकत त्यांना ते उत्तेजन म्हणून भरपूर पारितोषिके देऊन त्यांच्या गुणांची कदर करीत. जे सरदार जुलूम जबरदस्तीने पैका मिळवून धनाढ्य बनत अथवा ज्यांच्या हुकमतीखालची साधने त्यांना अतिमहत्त्वाकांक्षी बनवीत व त्यामुळे महाराजांच्या सर्वश्रेष्ठ सत्तेला जे आव्हान देण्याचा संभव आहेत असे वाटे, अशा सरदारांच्या जहागिरी व मान्यता काढून घेण्यास ते मागेपुढे पाहत नसत. आपली ध्येये व ईप्सिते साध्य करण्यासाठी कोणत्या साधनांचा उपयोग केव्हा व कसा करावा याचे पुरेसे व्यवहारज्ञान त्यांच्या अंगी होते. वायव्य सरहद्दीकडील टोळीवाल्यांमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी कठोर साधनांचा उपयोग करण्याची मुभा त्यांनी जनरल ॲव्हिटेबल यांना दिली होती. तर दुसरीकडे ज्या जिल्ह्यात शांतता नांदत असे तेथे महाराजांचे सरकार न्याय्य रीतीने व पुरेशा सौम्यपणे वागे. दरोडेखोरीचा बंदोबस्त ते कठोरपणे व जरबेने करीत. सत्ताधिकाराचा दुरुपयोग करणाऱ्या अधिकाऱ्यांना ते शिक्षा करीत व नेहमी

फिरतीवर राहून अधिकाऱ्यांच्या वागणुकींवर ते बारीक नजर ठेवीत. चोरी, दरोडेखोरीसाठी एखाद्या खेड्याची कुप्रसिद्धी असल्यास त्याच्यावर ते सामुदायिक कर बसवीत; आणि त्यातून चोरलेल्या, लुटलेल्या मालमत्तेची भरपाई करून देत. घोडदळातील लोक आपल्या रसदीसाठी अथवा घोड्यांच्या चंदीचाऱ्यासाठी आकस्मिक हल्ले करून लूट मिळवीत असत. तो प्रघात महाराजांनी एकदम बंद पाडला. दुष्काळ पडलेल्या ठिकाणी ते सारा सूट देत. आणि अशा प्रसंगी जात वा धर्मपंथ न पाहता सर्रास सर्वांना रोकड व साहित्य वाटून मदत देत. अशी मदत विविध कारणांस्तव केली जात असल्यामुळे ती देण्याचे प्रसंग कमी नसत.

महाराजांचे रूप अगदीच साधे होते. दुसऱ्यावर परिणाम करण्याच्या दृष्टीने त्यांच्या चेहरेपट्टीत वा व्यक्तित्वात भारदस्तपणा नव्हता. पण त्या दैवाधीन न्यूनांची जागा त्यांनी मनुष्यसाध्य गोष्टींनी भरून काढली होती. त्यांची चाल-चालणूक, वागणे-बोलणे व एकूण ढब खरोखरीच एखाद्या राजाला शोभावी अशीच होती. अझिझुद्दिनने एका इंग्रजाजवळ काढलेल्या उद्‌गारात अतिशयोक्ती वाटत नाही ती त्यामुळेच. तो म्हणाला होता, ''महाराजांच्या चर्येवर एक प्रकारचे दैवी राजतेज आहे. आणि येवढे प्रभावी आहे की त्यांच्या दोन डोळ्यांपैकी कोणता दृष्टिहीन आहे हे जवळून निरखून पाहण्याचे धार्ष्ट्य अद्याप मला एकदाही झालेले नाही.''

महाराजांना भेटलेल्या युरोपियन लोकांपैकी अनेकांनी त्यांच्याबद्दल लिहिले असून आपली मते व्यक्त केली आहेत. त्यांपैकी दोघांची प्रातिनिधिक मते अशी आहेत : ले. फेन लिहितो, ''रणजितसिंह आपल्या प्रजेचे प्रेमळ व उदार धनी होते. भारतात ज्यांनी आजवर राज्ये केली अशा राजांपैकी त्यांना एक सर्वोत्तम राजा म्हटले पाहिजे. ते एक भले, मनमिळाऊ मनुष्य होते. बालकांबद्दल त्यांना अपार प्रेम वाटे. आणि गुन्हा कितीही तिरस्करणीय व दुष्टपणाचा असला तरी त्याबद्दल देहान्ताची शिक्षा देणे त्यांनी आपल्या राज्यात बंद केले. ह्या सर्व गोष्टी त्यांच्या स्वभावावर, मतांवर व व्यक्तिमत्त्वावर स्वच्छ प्रकाश टाकतात.''

दुसरा उतारा मिस एमिली ईडन हिच्या लिखाणातील आहे. तिचाही उल्लेख ह्या पुस्तकात आधी आला आहे. ती लॉर्ड ऑक्लंडची बहीण. महाराजांच्या सहवासात फिरोजपूर, अमृतसर व लाहोर येथे ती भावाबरोबर आली होती. ती लिहिते, ''स्वकर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी राजपद मिळविले. आपल्या मोठेपणाने ते 'महाराज' झाले. बलाढ्य शत्रूंचा पराभव त्यांनी केला. अत्यंत न्यायप्रियतेने राज्यकारभार हाकला. सैन्याला शिस्त लावून ते सुसंघटित केले. कोणाचाही जीव घेतला नाही. प्रजेचे त्यांच्यावर फार प्रेम होते.''

रणजितसिंहांच्या कमकुवतपणाबद्दल पूर्वी उल्लेख केला आहे. पण त्यांच्या अंगचे काही दोष त्यांच्या गुणांतूनच निर्माण झाले होते. त्यातला एक म्हणजे भूमी जिंकीत राहण्याची, पादाक्रांत करण्याची दुर्दम्य विजिगीषा. पण त्यांच्या अंगी ही प्रेरणा नसती तर पंजाबातील शीख संघटनांची राज्ये वा जहागिरी मराठ्यांच्या, नाही तर ब्रिटिशांच्या ताब्यात गेल्या असत्या. छोट्या राजांना एकत्र आणून रणजितसिंहांनी पंजाबात एक स्वतंत्र राज्य स्थापन केले. त्याचा परिणाम असा झाला की पुढे सुमारे अर्ध शतकापर्यंत ब्रिटिशांना तेथे आपला पाय रोवता आला नाही. त्याशिवाय पंजाबात त्यांनी राष्ट्रवादाचा पाया घातला ही त्यांची एक महान कामगिरी होय. त्यांचे धोरण आणि त्या धोरणाची अंमलबजावणी निश्चितपणे धर्मनिरपेक्ष राज्याची नांदीच म्हणावी लागते.

त्यांनी एखादा प्रदेश खालसा केला की तेथून ते खंडणीही वसूल करीत. कारण लष्करी स्वाऱ्यांमुळे येणारा खर्च राजाला भागवावयाचा असतो. शिवाय खंडणी ही आपली मालकी सिद्ध झाल्याची निशाणी असते असे त्यांना वाटत असे.

आपल्या वैयक्तिक जीवनात महाराजांना मदिरा व मदिराक्षी यांचा फारच नाद होता. पण तत्कालीन मोठमोठ्या सेनानींची उदाहरणे अशीच होती. रणजितसिंह त्यांना अपवाद नव्हते. त्यांच्या ह्या आसक्तीबाबत थोडीफार समाधानाची गोष्ट एवढीच की प्रसंगाचे महत्त्व ओळखून ते ती काबूत ठेवू शकत असत, तिच्यावर नियंत्रण घालीत. कर्तव्याची हाक एकदा कानी आली की मग मदिरा त्यांना आकर्षित करण्यास असमर्थ ठरे; आणि मदिराक्षी त्यांचे पाय आपल्याकडे वळवू शकत नसे. एकदा ते एखाद्या स्वारीत गुंतले, किंवा राज्यकारभाराचे कामकाज पाहत असले म्हणजे मग इतर कोणत्याही गोष्टीची आठवण त्यांना येत नसे. एखाद्या महत्त्वाच्या बाबीचा विचार करून समजा रात्री त्यांनी निर्णय घेतला की दिवस उजाडताच त्याची अंमलबजावणी करण्यास सिद्ध असत. महाराजांच्या संपूर्ण निर्णयाच्या अंमलबजावणीचा तपशीलवार आदेश फकीर अझिझुद्दिन जाहीर करी.

आपले उद्देश व मनसुबे साध्य करण्यासाठी रणजितसिंहांनी हिंसेचा आश्रय, अथवा लबाडी-कपटाचा अवलंब केला असा एक आरोप त्यांच्यावर करण्यात आलेला आहे. पण ज्या काळी व ज्या परिस्थितीत तसा मार्ग पत्करणे हे 'व्यावहारिक रहस्य' ठरे त्या वेळी व परिस्थितीत तसे न वागणे त्यांचाच नव्हे तर अन्य कोणाचाही शुद्ध बावळटपणा, भोळेपणा ठरला असता. शठाशी शठ बनून वागण्याशिवाय त्यांना तेव्हा अन्य मार्गच नव्हता. तसेच इतर स्वरूपाचे प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर शेवटी त्यांना हिंसात्मक मार्गाने नाइलाजाने जावे लागले.

खरोखरी काही प्रसंग असे येऊन गेले की जेव्हा शांततापूर्ण व अहिंसात्मक मार्गाने जाण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. कारण त्यांचे विरोधक व प्रतिस्पर्धी यांनी त्यांच्यावर तशीच पाळी आणली होती. त्या काळी सामान्यतः प्रचलित असलेल्या साधनांचा उपयोग न करता त्यापेक्षा उच्च पातळीवरून रणजितसिंहांनी आपल्या पुढील समस्या हाताळण्यास पाहिजे होत्या अशी अपेक्षा बाळगून त्यांच्या व्यक्तित्वाचे व कार्याचे मूल्यमापन करणे हा त्यांच्यावर एक अन्याय ठरेल. आणि तरीही ते त्यांच्या समकालीनांपेक्षा किती तरी सरस, उजवे व श्रेष्ठ होते यात मुळीच शंका नाही. त्यांच्यावर उठलेल्या प्रतिस्पर्ध्यांचा प्रतिकार करतानासुद्धा त्यांनी औदार्य दाखविले आणि नमवून शरण आणिलेल्या शत्रूलाही त्यांनी मित्रासारखे वागविले. ह्या गोष्टी कशाच्या द्योतक आहेत?

पण रणजितसिंहांनी आपल्या चाळीस वर्षांच्या दीर्घकालीन कारकीर्दीत जी एक भव्य इमारत उभारली ती त्यांच्या मृत्यूनंतर अल्पावधीतच पूर्णपणे कोसळून पडली. त्यामुळे तिच्या भव्यतेत अंगच्या काही उणीवा, दोष राहून गेलेले असले पाहिजेत असे मानणे भाग पडते. सर्व प्रकारच्या सत्तेचे व अधिकारांचे केंद्रीकरण करून ते त्यांनी स्वतःच्या हाती ठेविले होते हे त्या विनाशाचे एक महत्त्वाचे, संभाव्य कारण असू शकेल. त्याबाबत एन. के. सिन्हा म्हणतात, ''महाराजांच्या मृत्यूने निर्माण झालेली पोकळी एवढी मोठी होती की तिच्यात त्यांचे संबंध सरकार सहज बुडून नाहीसे झाले.'' महाराजांच्या नंतर ज्यांनी अधिकारसूत्रे आपल्या हाती घेतली त्यांची ताकद लक्षात घेता ते सरदार, जहागीरदार कमजोर होते असे म्हणता येईल; पण खालसा सैन्य मात्र त्यांच्या मानाने जोरदार होते. त्या विनाशाला कारणीभूत ठरणारे दुसरे एक कारण असे की महाराज आपल्या ज्या सेनापतींच्या शौर्यावर अवलंबून राहू शकत असत ते दुर्दैवाने त्यांच्या आधीच मरण पावले. आणि जे मागे उरले व सत्ताधीश बनले ते कमजोर व स्वार्थी होते; व बेइमान झाले. महाराजांच्या पश्चात वारस हक्काबद्दलही वाद आणि घोटाळे निर्माण झाले. आणि तोवर संधीची वाट पाहत बसलेले ब्रिटिश संधी साधून नेमके त्या वेळी पुढे सरसावले. महाराजांच्या सैन्याच्या हालचालींना ब्रिटिशांनी पूर्वीच पूर्वेला व दक्षिणेला मर्यादा घातल्या होत्या. त्यांचा मृत्यू ओढवला आणि वारस लोकांत भांडणतंटे सुरू झाले तेव्हा छोटीछोटी भारतीय राज्ये खालसा करून ती घशात टाकण्याचे आपले धोरण लॉर्ड डलहौसीने पंजाबातही लगेच अमलात आणिले. शीख पुढारी आणि शीख सैन्य यांना त्यांच्याशी मुकाबला करता आला नाही. आणि त्यांच्या मूर्खपणामुळे महाराजांच्या मृत्यूनंतर एका दशकाच्या आतच पंजाब पूर्णपणे ब्रिटिशांच्या ताब्यात

गेला. रणजितसिंहांनी ब्रिटिशांशी केलेल्या तहनाम्यातच अशा प्रकारच्या अंताची सुप्त बीजे असावीत. त्यांना हे कळून चुकले होते की ब्रिटिशांशी मुकाबला करायला ते एकटे असमर्थ आहेत. त्यांचे नियंत्रण हटले आणि ब्रिटिश सत्ता आणि मुत्सद्देगिरी प्रभाव पाडू लागली तेव्हा त्यांचे राज्य संपुष्टात आले. तथापि त्यांच्या कार्याने व कर्तृत्वाने आपले स्पष्ट ठसे इतके ठळकपणे उमटविले होते की त्यांची सूज्ञ तत्त्वे आणि धोरणे ब्रिटिशांनी तशीच पुढे चालू ठेविली. हा एक प्रकारे त्यांच्या स्मृतीला दिलेला मान होता असेच म्हटले पाहिजे.

Lasertypeset at Ess Ess Enterprises, New Delhi-110 055
and printed at Tarang Printers. Delhi-110 092